तृतीय वर्ष कला

शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका क्र.४
भारतीय शिक्षण पध्दती
(स्वरूप आणि समस्या)

अभ्यासक्रम

तृतीय वर्ष कला - अभ्यासपत्रिका क्र.४

भारतीय शिक्षण पद्धती : स्वरुप आणि समस्या

१) भारतीय शिक्षण पद्धतीतील महत्त्वाच्या घटना (उद्दिष्ट्ये आणि स्वरुप)

स्वातंत्र्य - पूर्व काळ

i. वूडचा मसूदा / आराखडा

ii. भारतीय शैक्षणिक आयोग – १८८२

iii. राष्ट्रीय शैक्षणिक चळवळ – उद्दिष्ट्ये आणि योगदान

स्वातंत्र्योत्तर काळ

i. विद्यापीठ शैक्षणिक आयोग –१९४८

ii. माध्यमिक शैक्षणिक धोरण – १९५२

iii. शैक्षणिक धोरण – १९६४

iv. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६ व १९९२

२) पूर्व-प्राथमिक शिक्षण : ऐतिहासिक विकास, सद्यस्थिती आणि समस्या

i. पटनोंदणी (प्रवेशप्रक्रिया)

ii. अभ्यासक्रम

iii. मूल्यमापन

३) प्राथमिक शिक्षण : ऐतिहासिक विकास, सद्यस्थिती आणि समस्या

i. पटनोंदणी

ii. अभ्यासक्रम

iii. मूल्यमापन

iv. प्राथमिक शिक्षण सक्तीचे (अनिवार्य) करण्यासाठी येणारे अडथळे

v. एकशिक्षकी शाळेतील समस्या (ग्रामीण विभाग)

४) माध्यमिक आणि उच्च – माध्यमिक शिक्षण : ऐतिहासिक विकास, सद्यस्थिती आणि समस्या

i. शिक्षण आणि मानवी गरजा

ii. व्यावसायिक शिक्षणाचा विकास

iii. तांत्रिक शिक्षण

iv. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

५) अनौपचारिक शिक्षण

i. संकल्पना, आवश्यकता उद्दिष्ट्ये आणि महत्त्व

ii. ऐतिहासिक विकास आणि सद्यस्थिती

iii. प्रौढ शिक्षण

iv. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण

६) प्रात्यक्षिक कार्य :- खालीलपैकी कोणतेही एक

अ) विद्यार्थ्यांच्या गळती संदर्भात पाच शाळेच्या मुलाखती घेऊन सादर करणे.

ब) एका अनौपचारिक शिक्षण संस्थेच्या भेटीचा संपूर्ण अहवाल

❖❖❖❖

१

भारतीय शिक्षण पद्धतीतील महत्त्वाच्या घटना (उद्दिष्ट्ये आणि स्वरुप)

स्वातंत्र्य-पूर्व काळ

घटकाचे स्वरुप :

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ वूड्सच्या मसूद्याची पार्श्वभूमी (१८५४)

१.३ वूड्सच्या मसूद्याची उद्दिष्ट्ये (१८५४)

१.४ भारतीय शैक्षणिक आयोग (१८८२-८३) : पार्श्वभूमी

१.५ भारतीय शिक्षण आयोगाचे उद्दिष्ट्ये आणि शिफारशी (१८८२-८३)

१.६ स्वदेशी (राष्ट्रीय) शिक्षण : चळवळी-उद्दिष्ट्ये आणि योगदान

१.७ १९१२ नंतरच्या राष्ट्रीय शैक्षणिक (शिक्षण) चळवळी

वूड्सचा मसूदा (१८५४) :

१.० उद्दिष्ट्ये :

हा घटक पूर्ण केल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी केल्या पाहिजेत.

- आयोग आणि समिती यातील फरक.
- विविध आयोगाची उद्दिष्ट्ये आणि स्वरुप स्पष्ट करा.
- विविध शैक्षणिक आयोगांची आवश्यकता स्पष्ट करा.
- भारतीय शिक्षण पद्धतीवर आयोगांचा परिणाम स्पष्ट करा.

१.१ प्रस्तावना :

जेव्हा आपण भारतीय शिक्षणाचा इतिहास पाहतो, तेव्हा आपल्या असे लक्षात येते की भारतीय शिक्षणाचा विकास दोन भागात विभागला आहे. एक म्हणजे स्वातंत्र्य-पूर्व काळ आणि

दुसरा स्वांतत्र्योत्तर काळ. गेल्या दोन शतकापासून चालत आलेली शिक्षण पद्धती ही चिंतन, मनन, चर्चा आणि विचारांची मोठी प्रक्रिया आहे. ब्रिटिश आणि भारतीय सरकारनी नियुक्त केलेल्या विविध आयोगांमुळे आजच्या शिक्षणाला एक नवा आकार किंवा दिशा प्राप्त झाली आहे. आपण अभ्यासत असलेला प्रत्येक शैक्षणिक आयोग हा सध्याची राजकीय स्थिती मांडत असतो आणि हे आयोग देशाच्या शैक्षणिक विकासावर कसे प्रभाव टाकतात याचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे.

आयोगांची समित्यांशी तुलना करणे हे विस्तृत क्षेत्र बनले आहे. आयोग संपूर्ण शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यावर शिफारशी करण्यासाठी नियुक्त केला गेला आहे. दुसरीकडे संपूर्ण शैक्षणिक पद्धतीमधील एखाद्या विशिष्ट पैलूंचा अभ्यास करण्यासाठी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

तर आपण स्वातंत्र्यपूर्ण भारतातील आयोगांचा अभ्यास करुया.

१.२ पार्श्वभूमी आणि स्वरुप :-

ब्रिटिशकालीन भारतीय शिक्षणपद्धतीची सुरुवात इ.स. १८१३ सालाकडे घेऊन जाते जेव्हा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतीय शिक्षणाची जबाबदारी परिस्थितीनुसार स्विकारावी लागली.

१८१३ च्या चार्टर कायद्यातील (Charter Act) कलम ४३ नुसार भारतातील शिक्षित लोकांमध्ये वैज्ञानिक ज्ञान विकसित करण्यासाठी व त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कमीत कमी एक लाख रुपये प्रति वर्ष खर्च करण्यास बांधिल होती.

भारताचे प्रशासकीय अधिकारी 'लॉर्ड बेटिंक' यांनी शैक्षणिक समितीचे अध्यक्ष म्हणून 'लॉर्ड मेकॉले' यांची नेमणूक केली अधिकाराच्या कलम ४३ अन्वये विचार करुन 'मेकॉले' यांनी त्यावर सल्ला द्यावा अशी लॉर्ड बेंटिकची प्रबळ इच्छा होती. त्याचा आधार घेऊन मेकॉले यांनी कायद्याचा (अधिकाराचा) लांबलचक मसूदा तयार केला. त्या मसूद्यालाच 'मेकॉलेचं मायनूट' (Macaulay's Minute) असे म्हणतात. या मसूद्याचा मुख्य उद्देश असा होता की व्यक्तीचा अशा प्रकारचा समूह तयार करायचा जो की रक्तानी आणि रंगानी भारतीय पण त्यांची आवड (चव), विचारसरणी, नैतिकता, बुद्धीमत्ता ही इंग्लिश (ब्रिटिश) स्वरुपाची असावी. या उद्देशामुळेच मेकॉलेचा मसूदा सर्वसामान्यामध्ये प्रचलीत झाला.

अशाप्रकारे १८५३ च्या ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय अधिकाराला नवचैतन्य मिळाले. शैक्षणिक धोरणांना नवीन रुप देण्याची गरज भासू लागली. त्यामुळे 'बोर्ड ऑफ कंट्रोल' चे अध्यक्षपद 'सर चार्ल्स वूड' यांच्याकडे देण्यात आले. आणि त्यांनी बनविलेला मसूदा हा 'वूडचा मसूदा' (Woods Despatch) (१८५४) म्हणून नावारुपाला आला.

तुमची प्रगती तपासा

१) ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील शैक्षणिक घडामोडीमध्ये लक्ष का घातले ?
२) १८५४ च्या वूडच्या मसूद्याची आवश्यकता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१.३ वूड्सच्या मसूद्याची (१८५४) उद्दिष्ट्ये आणि स्वरुप :-

सर चार्ल्स वूडने तयार केलेला 'वूड्सचा मसूदा' ही शैक्षणिक योजना व्यापक (सर्वसमावेशक) ठरली. शिक्षणाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी ही पहिलीच योजना ठरली. शिक्षणाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी ही पहिलीच योजना ठरली. तिच्या या व्यापक गुणधर्मामुळे हा मसुदा (योजना) कालांतराने भारतीय इंग्रजी शिक्षणाचा 'मॅग्नाकार्टा' (Magna Carta) म्हणून ओळखली जाऊ लागली.

शिक्षणाला खूप महत्त्वाचे स्थान देऊन भारतातील लोकांना उपयुक्त (आवश्यक) ज्ञान उपलब्ध करुन देणे हे वूड्सने आपले कर्तव्य मानले आणि भारतीय शिक्षणाला आपला पूरेपूर फायदा होईल याची काळजी घेतली.

युरोपिय ज्ञानाचा प्रसार हा शिक्षणाचा मुख्य उद्देश होता. त्यामध्ये युरोपची कला, विज्ञान, तंत्रज्ञान आणि साहित्य याचा प्रामुख्याने समावेश होतो. महत्त्वाच्या उद्दिष्ट्यांपैकी काही उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

शिक्षणाचे माध्यम :-

शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषेतून असले पाहिजे पण इंग्रजी भाषेची मातृभाषेसोबत सांगड घालून शिक्षण दिले गेले पाहिजे. वूड्सच्या योजनेने प्रादेशिक भाषेला महत्त्वाचे स्थान देऊन युरोपिय ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी युरोपीय (इंग्रजी) आणि भारतीय भाषेची निवड केली व ती सर्व शाळेत राबविली जावी अशी वूड्सची धारणा होती.

आर्थिक अनुदान :-

सरकारने चालविलेल्या शैक्षणिक पद्धती खंडित करुन त्यांचा विकास करण्यासाठी त्यांना आर्थिक अनुदान दिले जावे असा मुख्य हेतू होता. पुढे चालून उच्च माध्यमिक संस्थांचे

व्यवस्थापन स्थानिक व्यक्तीच्या हातात दिले जावे आणि त्यावर राज्यशासनाचा ताबा असावा व राज्यशासनाच्या माध्यमातून संस्थांना आर्थिक अनुदान दिले गेले पाहिजे.

शासकीय संस्थांमधील ऐच्छिक धार्मिक शिक्षण :-

भारतातील लोकांच्या फायद्यासाठी ज्या शैक्षणिक संस्था स्थापन केल्या त्या एकमात्र निधर्मी (Secular) असल्या पाहिजेत. शाळा व महाविद्यालयाच्या ग्रंथालयात बायबल हे ग्रंथ ठेवण्यात यावे. जर विद्यार्थ्यांची ईच्छा झाली तर त्याचा वापर करण्यास मार्गदर्शन करावे. वूड्सच्या मतानूसार त्यांनी मांडलेली योजना (मसूदा) ही धर्मनिरपेक्ष (निधर्मी) आहे आणि धार्मिक शिक्षण हे शाळेतील वर्गापासून दूर असावे.

चार्ल्स वूडच्या योजनेनुसार, आम्हाला कोणावर निर्बंध आणावयाचे नाहीत किंवा कोणाला धैर्यहीन करावयाचे नाही. जेव्हा एखाद्या विद्यार्थ्यांला त्याच्या इच्छेनुसार ख्रिश्चन धर्माविषयी त्यांच्या गुरुकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करतील तेव्हा गुरुंनी ही माहिती किंवा स्पष्टीकरण शाळेच्या तासाव्यतिरिक्त वेळेमध्ये द्यावी. हे शिक्षण दोन्ही बाजूंनी ऐच्छिक असावे. शंका दूर करण्यासाठी किंवा धर्मांतर करण्यासाठी शासनाची मदत घेतली पाहिजे. जेणेकरुन कुठलीही पोलिसयंत्रणा यामध्ये हस्तक्षेप करणार नाही.

शिक्षक प्रशिक्षण (Training of the Teachers) :-

शिक्षक प्रशिक्षण ही संकल्पना आपल्याला ग्रेट ब्रिटन या देशाकडून मिळालेली देणगी आहे. ज्यामध्ये छात्र शिक्षक यांची निवड होते. अशा छात्र शिक्षकांना शाळेच्या वेळाव्यतिरिक्त जादा तास काम करण्यासाठी नियुक्ती करुन मानधन देण्यात येते. शिक्षकांचे प्रशिक्षण संपल्यानंतर त्या त्या कॉलेजमधून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर प्रशिक्षित विद्यार्थ्याला (शिक्षकाला) योग्य व पुरेशी पगार दिली जाईल याची हमी (ग्वाही) देणे ही सुद्धा ग्रेट ब्रिटनकडून दत्तक घेतलेली योजना आहे.

अशा प्रकारची पद्धत शासकीय शाळा व कॉलेज मध्ये चालविली जावी ज्या संस्था सरकारच्या आर्थिक अनुदानाच्या हक्कदार (हिस्सेदार) आहेत. शिक्षकांचा कार्यकाल हा भविष्यात वाढविला जावा जेणेकरुन समाजातील शिक्षण घेणाऱ्या लोकांना त्याचा फायदा होईल.

स्त्रियांचे शिक्षण (Education of Women) :-

भारतीय लोक त्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी आवड (रस) दाखवित होते. ते स्त्री शिक्षणाला पाठिंबा देण्याचे काम करत होते. सरकारने मनसोक्तरित्या रहिवाशी स्त्रीयांना शिक्षण दिले पाहिजे.

विद्यापीठाची स्थापना (Establishments of the Universities) :-

शिक्षणाचा प्रसार वेगाने होत होता. त्यामुळे भारतीय लोकांत शासकीय नोकऱ्या व स्कॉलरशिप (शिष्यवृत्ती) मिळविण्याची आवड निर्माण झाली होती. निमसरकारी संस्था व

मेडिकल कॉलेजेस मधून सुद्धा विद्यार्थी उत्कृष्टरित्या यश प्रदान करत होते. या परिस्थितीमुळेच वूड्सच्या मसूदयाला भारतामध्ये विद्यापीठे स्थापन करण्याची गरज भासू लागली.

लोकशिक्षणाचा विस्तार (Expansion of Mass Education) :-

वूड्सच्या मते, जी लोकं शिक्षण घेण्यास असमर्थ असतात अशा लोकांना उपयुक्त व प्रायोगिक ज्ञान देणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने स्वतः जातीने लक्ष घालून लोकांना प्रवृत्त केले पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक अनुदानसुद्धा मंजूर केले पाहिजे.

तुमची प्रगती तपासा

१) शिक्षणाचा मुख्य उद्देश काय आहे ?
२) वूड्सच्या मसुद्याने (डिसपॅच) सांगितलेली उद्दिष्ट्ये लिहा.
३) धार्मिक शिक्षणाबाबत वूड्सच्या मसूद्याने कोणती पावले उचलली ?
४) लोकांना शिक्षण देण्यासाठी काय केले पाहिजे ?

_____

_____

_____

_____

_____

१.४ भारतीय शैक्षणिक आयोग (१९८२-८३) : पार्श्वभूमी :

वूड्सच्या मसूद्यामुळे लंडन विद्यापीठाचा आधार घेऊन विविध कायद्यानुसार इ. स. १८५७ साली भारतामध्ये कलकत्ता, बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) या ठिकाणी विद्यापीठे स्थापन करण्यात आली. त्यामुळे शासकीय महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर महाविद्यालये आणि बहुसंख्य खाजगी (निमसरकारी) संस्था उदयाला आल्या. त्याकाळात विद्यापीठीय परीक्षा फक्त पुरुषवर्गासाठीच आहेत असं मानलं जात होतं पण इ.स. १८७७ मध्ये कलकत्ता विद्यापीठाने पहिल्यांदाच मुलींच्या दहावीपर्यंतच्या परीक्षेसाठी दालन खूले केले. आणि कालांतराने इ.स. १८८१ मध्ये अनुक्रमे मद्रास व बॉम्बे विद्यापीठाने तशा प्रकारची पद्धत आमलात आणली.

भारतामध्ये उच्च शिक्षणाकडे जास्त लक्ष व प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात आहे असा समज निर्माण झाला होता.

वूड्सच्या मसुद्याने सुचविल्याप्रमाणे शासनाने अनुदान पद्धती लागू केली गेली नव्हती. याचा जास्तीत जास्त परिणाम (पटका) धर्म प्रचारकांने चालविलेल्या शाळा व महाविद्यालयीन झाला होता म्हणून त्यांनी शासनविरुद्ध आंदोलने (चळवळी) केली पण ती आंदोलने अयशस्वी

ठरली. आर्थिक अनुदानाच्या मुद्यावर लढण्यासाठी त्यांनी इ.स. १८७८ मध्ये लंडन येथे संघटना स्थापन केली. ती संघटना 'शिक्षणाचे सर्वसामान्य प्रशासकीय मंडळ' म्हणून ओळखली जाऊ लागली.

यामुळे या आंदोलनाला प्रतिउत्तर देण्यासाठी म्हणून ३ फेब्रुवारी १८८२ साली लार्ड रिपन यांनी पहिल्या भारतीय शिक्षण आयोगाची स्थापना केली. भारतीय शिक्षण आयोगाचे अध्यक्ष 'सर विल्यम हंटर' होते व या व्यतिरिक्त इतर २० सदस्यांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होता. विल्यम हंटर यांनी भारतीय शिक्षण आयोगाचे अध्यक्षपद भूषविल्यामुळे हा आयोग 'हंटर आयोग (कमिशन)' म्हणून ओळखला जाऊ लागला.

भारतीय शिक्षण आयोगाचा उद्देश खालील दोन बाबींची चौकशी करण्याचा होता.

१) परिस्थिती - ज्यामध्ये वूड्सचा मसूदा आंमलात आणला गेला.
२) पुढील शैक्षणिक धोरणे आंमलात आणण्यासाठी उपाय सूचविणे.

यावरील कारणामुळे हंटर आयोगाला खालील दोन समस्यांना तोंड द्यावे लागले.

१) वूड्सने सूचविल्याप्रमाणे धर्मप्रचारकांनी चालविलेल्या शैक्षणिक योजना किंवा उपक्रमापासून शासनाने माघार घेतली पाहिजे का ?
२) धार्मिक शिक्षणामध्ये शासनाचे धोरण कसे असले पाहिजे ? शाळेमध्ये ते राबविले जावे किंवा नाही जर ते शाळेत राबविले जावे तर ते कोणत्या स्वरुपात आणि कोणत्या विषयाद्वारे ? कोणत्या अटीद्वारे धार्मिक शिक्षणाला परवानगी दिली जावी ?

तुमची प्रगती तपासा

१) १८५४ च्या वूड्सच्या धोरणाचे उच्च शिक्षणावरील परिणाम कोणते होते ?
२) धर्माप्रचारकाने आंदोलने (चळवळी) का केली होती ?
३) भारतातील शिक्षणाचे सर्वसामान्य प्रशासकीय मंडळाच्या स्थापनेमागील कारणे स्पष्ट करा.
४) हंटर आयोग कोणी स्थापन केला ?
५) हंटर आयोगाचे स्वरुप लिहा ?
६) हंटर आयोग कशाची चौकशी करणार होते ?
७) हंटर आयोग यांनी अभ्यासणाऱ्या दोन मुख्य समस्या स्पष्ट करा ?

_____

_____

_____

_____

_____

१.५ भारतीय शिक्षण आयोगाचे उद्दिष्ट्ये आणि शिफारशी (१८८२-८३):

स्थानिक शिक्षणाला उत्तेजन :-

वूड्सच्या धोरणाने सध्याच्या शिक्षणाचा अभ्यास केला आणि असे आढळून आले की, भारतात दिले जाणारे शिक्षण हे कमी दर्जाचे किंवा कनिष्ट प्रतीचे होते म्हणून स्थानिक संस्थाना प्रोत्साहन देण्याची त्यांना गरज भासू लागली.

प्राथमिक शिक्षण :-

जनतेला सोपे प्राथमिक शिक्षण देणे, त्यावर तरतूदी, प्रसार व त्यावर सुधारणा करणे ही त्या-त्या राज्यशासनाची जबाबदारी आहे. प्राथमिक शिक्षण शैक्षणिक पद्धतीचा एक हिस्सा असून त्यावर खूप कठीण परिश्रम करायला पाहिजे असे भारतीय शिक्षण आयोगाचे उद्दिष्ट्ये होते.

माध्यमिक शिक्षण :-

ज्या ठिकाणच्या लोकांना एखादी शाळा (शैक्षणिक संस्था) काढणे शक्य नसेल तर अशा ठिकाणी काही जिल्ह्यामध्ये शासन माध्यमिक शाळेची स्थापना करु शकते. शिक्षण आयोगाने सूचविल्याप्रमाणे माध्यमिक शिक्षणाची दोन भागात विभागणी केली पाहिजे.

१) विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रिया
२) दुसऱ्या बाजूला प्रयोगक्षेत्र-ज्यामध्ये तरुणांना व्यापारविषयक व साहित्यिक क्षेत्राचा अभ्यास असतो.

उच्च शिक्षण :-

संस्थेची कार्यक्षमता, कर्मचाऱ्यांची संख्या, संस्थेसाठी येणारा खर्च (मेंटेनंन्स) तसेच स्थानिक विभागाची आवश्यकता लक्षात घेऊन आर्थिक मदत दिली गेली पाहिजे.

स्त्री - शिक्षण :-

आयोगानुसार आतासुद्धा स्त्री-शिक्षणाची खूप बिकट (वाईट) परिस्थिती आहे. आणि ती सुधारण्यासाठी अत्यंत आवश्यकता आहे. मुलींच्या आणि मुलांच्या शाळांना मदत करण्यासाठी किंवा सहकार्य करण्यासाठी योग्य प्रमाणात लोकांकडून सार्वजनिक निधी (Public Fund) आकारले गेले पाहिजेत.

भारतीय शिक्षणामध्ये शासन आणि धर्मप्रचारकांच्या धोरणांच्या भूमिका :-

शिक्षण आयोगाने स्पष्टपणे नमूद केले होते की उच्च शिक्षण हे धर्मप्रचारकांच्या स्वाधीन करु नये किंवा हातात दिले जाऊ नये. तसेच ज्या संस्था राज्यशासनाच्या अधिपत्याखाली

आहेत. त्यासुद्धा धर्मप्रचारकांच्या हवाली करु नयेत. त्यांना त्यांचे स्वतंत्र्य असे कायदे (Cource) करण्यास परवानगी द्यावी ज्यावर राज्यशासनाचे नियंत्रण असायला पाहिजेत.

भारतामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यवाहिनीची (Agencies) आवश्यकता आहे आणि त्यांच्या माध्यमातून सर्वांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

आर्थिक अनुदान :-

आयोगाचे खाजगी संस्थेबाबत असे स्पष्ट मत होते की, खाजगी संस्थांच्या संस्थापकांना (व्यवस्थापकांना) शैक्षणिक धोरणामध्ये समाविष्ट करुन त्यांनी चालविलेल्या शाळा व राष्ट्रीय अधिपत्याखालील शाळांमधील फरक दूर करण्याचा प्रयत्न केला होता. दोन्ही प्रकारच्या शाळेतील विदयार्थ्यांना प्रवेश देणे, प्रमाणपत्र देणे व शिष्यवृत्या देणे हे एकसारखेच होते.

अनुदान हे आवश्यकतेनुसार दिले जावे. आर्थिक अनुदानाला कार्यालयीन योग्य प्रतिसाद दिला गेला पाहिजे एखाद्या संस्थेला आर्थिक अनुदान नको असेल तर तशाप्रकारचे कारणही शासनाला दाखवावे लागते. या धोरणानुसार आर्थिक अनुदानासंबंधातील कायदे (Rules) हे भारतीय भाषेमध्ये भाषांतरित व्हावेत आणि ते खाजगी व अनुदानित संस्थाच्या संस्थापकांना (व्यवस्थापकांना) कळविण्यात यावे तसेच शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी स्वत:हून मदत निधी देण्यास तयार आहेत अशाही व्यवस्थापकांना कळविण्यात यावे.

पात्र भारतीयामधून शाळेची चौकशी करण्यासाठी शाळा निरीक्षकाची (School Inspector) ची सुद्धा नियुक्ती करण्यात येते.

धार्मिक शिक्षण :-

राज्यशासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या शाळा धार्मिक शिक्षणात तटस्थ भूमिका बजावल्या पाहिजेत.

तुमची प्रगती तपासून पहा

१) तुमच्या मते, खरोखरच शिक्षणाबाबत आयोगाचा निधर्मी दृष्टीकोन आहे काय ?
२) भारतीय शैक्षणिक आयोगानुसार सर्वात महत्त्वाचे शिक्षण कोणते होते ?
३) स्त्री-शिक्षणावरील सूचना (उपाय) (Suggestion) लिहा.
४) धर्मप्रचारकांना शाळा चालविण्यासाठी आयोगाने संमती दिली का ?
५) शिक्षणातील भेदभाव थांबला पाहिजे हे कोण-कोणत्या शिफारशीवरुन समजते ?

_____

_____

_____

_____

१.६ स्वदेशी (राष्ट्रीय) शिक्षण : चळवळी-उद्दिष्ट्ये आणि योगदान :

स्वदेशी (राष्ट्रीय) शिक्षण पद्दती ही इ.स. १८९० मध्ये घेऊन जाते. जेव्हा 'गुरुदास बॅनर्जी' हे उपकुलगुरु या पदावर होते. त्याकाळी त्यांनी शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावे असे सूचविले होते.

त्याच काळामध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी असे सूचविले होते की सध्याचे म्हणजेच ब्रिटिश काळातील शिक्षण पद्धती ही अपूरी होती. बंगाली भाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे अशी त्यांनी विनंती केली.

'द डॉन' (१८९७-१९१३) चे संपादक सतीश चंद्रा मुखर्जी यांच्या मते, विद्यापीठीय शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीला समाधानी करण्यास असमर्थ ठरले होते.

प्रा. हरिदास मुखर्जी यांनी यांनी इ.स. १९०२ मध्ये 'मेट्रो-पोलिटन इन्स्टिट्युट' या नावाने शैक्षणिक संस्था सुरु केली ज्याचे उद्दिष्टय बंगाली तुरुंगामध्ये नैतिक व बौद्धिक उत्क्रांती घडविण्याचे होते.

तसेच शिक्षणाद्वारे तरुणांना राजकीय क्षेत्रात क्रांती घडवून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा होता.

इ. स. १९०५ मध्ये झालेली 'बंगालची फाळणी' ही अशाप्रकारच्या अनेक आंदोलनाला कारणीभूत होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा खूप मोठा सहभाग होता.

१ जून १९०६ मधील १८६० च्या कायद्याच्या २१ वीसाव्या कलमानुसार 'राष्ट्रीय शिक्षण संघटना' नोंदणीकृत झाली.

शिक्षण देणे हा राष्ट्रीय शिक्षण संघटनेचा (मंडळाचा) मुख्य उद्देश होता. राष्ट्रीय पातळीवरील साहित्यिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक त्याचबरोबर प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणापासून दूर राहून त्यावर ताबा ठेवणे हा उद्देश होता.

राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून अन्य गोष्टीसुद्धा सुचित केल्या पाहिजेत. त्या पुढीलप्रमाणे :-

१) इंग्रजी विषय हा सक्तीचा करुन चांगल्या बोलीभाषेततील पुस्तके तयार करणे.

२) भौतिक, नैतिक शिक्षणाबरोबरच धार्मिक शिक्षण पुरविणे तसेच देशावर प्रेम आणि देशहितासाठी कार्य करण्यास प्रवृत्त करणे.

३) देशाच्या शिक्षणाला वेगळे महत्त्व देऊन त्याच्या जोडीला साहित्य, इतिहास आणि तत्त्वज्ञान या विषयाची जोड देऊन चांगले आदर्श आणि विचार विद्यार्थ्यांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४) विज्ञान, कला आणि औद्योगिक शाखांच्या माध्यमातून वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षण देणे.

५) वैज्ञानिक शिक्षणामध्ये वैज्ञानिक सत्य समाविष्ट असते जे पौर्वात्य (Oriental) आणि वैद्यकीय (Medical) शिक्षणाद्वारे पटवून दिले जाते. वैज्ञानिक सत्य हे आर्युवेदिक आणि हाकिमी पद्धतीमध्ये पाहायला मिळते. उच्च स्तरीय ज्ञान (कुशलता) मिळविण्यास चालना देणे.

ब) देशाची परंपरा चांगली ठेवण्यासाठी (टिकवून ठेवण्यासाठी) वेगवेगळ्या समाजातील धार्मिक रुढी व परंपरा यांची शिस्तबद्धता पाळली पाहिजे.

इ.स. १९१०-१२ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी गोपाळ कृष्ण गोखले यांनी कायद्याचा मसूदा तयार केला त्यालाच गोखलेंचा मसूदा (Gokhale's Bill) असे म्हणतात. त्यांनी खूप प्रयत्न करुन प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यास शासनाला भाग पाडले. विधान सभेतील दोन दिवसाच्या चर्चेनंतर (वादविवादानंतर) हा मसुदा विधानसभेत ना मंजूर (नाकारण्यात) करण्यात आला. शासनाने या मसूद्याला पूर्णपणे मान्यता दिली नाही. पण वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षणाच्या मागणीकडे शासनाला दुर्लक्षही करता आले नाही.

तुमची प्रगती तपासा

१) पहिल्या भारतीय उपकुलगरुने काय सुचविले.
२) मेट्रोपोलियन (शहरी) संस्थाचे उद्देश स्पष्ट करा.
३) राष्ट्रीय शिक्षणाचे दोन उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.
४) गोखलेंच्या मसूदयाचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

_____

१.७ १९१२ नंतरच्या राष्ट्रीय शैक्षणिक (शिक्षण) चळवळी :

इ.स. १९२० च्या दरम्यान बंगालच्या फाळणीला जी गती प्राप्त झाली होती ती समाप्त होऊन बंगालचे पूनर्मिलन (एकत्रीकरण) झाले होते. इ.स. १९२०-२२ च्या दरम्यान दूसरी क्रांती झाली. पंजाबमधील भयानक असा लष्करी कायदा (Material Law) आणि मॉन्ट फोर्ड्सच्या अपूऱ्या सुधारणा (१९१९) यामुळे राष्ट्रीय भावना संपूर्ण देशभर पसरली. याच क्षणाला महात्मा गांधी यांनी असहकार चळवळ सुरु केली. इ.स.१९२० मध्ये नागपूर येथील काँग्रेस अधिवेशनामध्ये एक ठराव पास झाला त्यामध्ये असे सुचित करण्यात आले होते की, शासनाने अनुदान दिलेल्या किंवा शासकीय शाळेतून / महाविद्यालयांमधून मुलांना काढण्यात

येवून त्याठिकाणी विविध प्रांतामध्ये राष्ट्रीय शाळा व महाविद्यालयाची स्थापना करावी. या ठरावाच्या चार महिन्यांनंतर मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय शाळांची व महाविद्यालयाची स्थापना झाली आणि विद्यार्थी संख्या हजारोंनी वाढली. राष्ट्रीय शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिल्यामुळे हे शक्य झाले.

आपण असे म्हणून शकतो की, राष्ट्रीय शिक्षण चळवळीने तीन गोष्टींना (मुद्यांना) महत्त्व दिले. त्या गोष्टी खालीलप्रमाणे :

१) शिक्षणावर भारतीयांचे नियंत्रण (कंट्रोल)
२) मातृभूमीवर प्रेम करणे.
३) पाश्चात्यांचे अनुकरण न करणे.

ॲनी बेझंट यांनी सुद्धा भारतातील राष्ट्रीय शिक्षण कसे असले पाहिजे यासाठी त्यांनी वरील विचारांनाच प्राधान्य (दूजोरा) दिला आहे.

राष्ट्रीय शिक्षणाबाबत ॲनी बेझंट यांचे विचार :-

देशभक्ती आणि देशाविषयी अभिमान असेल तरच तशा वातावरणामध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा विस्तार झाला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणासाठी वातावरण ताजेतवाणे असले पाहिजे व भारतीय साहित्य, भारतीय इतिहास, विज्ञानातील प्रगती, राजकीय कला, युद्ध, वसाहतीकरण, व्यापार आणि दळणवळण इत्यादिंच्या अभ्यासाच्या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षणाला बळकट केले पाहिजे.

राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय प्रवृत्ती अनुभवल्या पाहिजेत आणि त्यातूनच राष्ट्रीय प्रवृत्तीचा (चारित्र्याचा) विकास झाला पाहिजे. भारताला इंग्लंडपेक्षा छोटे किंवा महानही बनायचे नाही पण भारताला महान बनविण्यासाठी मोलाचा हातभार लावला पाहिजे. ब्रिटिशांचे आदर्श ब्रिटनसाठी चांगले होते पण भारताचे आदर्श हे भारतालाच चांगले आहेत. हे स्पष्ट करण्याची वेगळी आवश्यकता नाही.

राष्ट्रीय शिक्षणावर भारतीयांचेच नियंत्रण असले पाहिजे, त्याला भारतानेच आकार दिला पाहिजे व ते भारतानेच चालविले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणाने एकनिष्ठ प्रेमाचा आदर्श, बुद्दीमत्ता आणि नैतिकता या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे.

थोडक्यात आपण खालील मुद्यांद्वारे राष्ट्रीय शिक्षण चळवळींचे योगदान स्पष्ट करु शकतो.

- भारतीयांनी त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याचे कार्य केले.
- स्वातंत्र्य चळवळींसाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार केली.
- देशभक्तीची (स्वदेशाभिमान) भावना जागृत केली.

- भारतीयांना स्वत:चा आदर करण्यास आवाहन केले आणि असे निर्णय घेण्यास त्यांना समर्थ बनविले.
- स्वदेशी शिक्षणाचा पुरस्कार केला.

तुमची प्रगती तपासा

१) शिक्षणावरील असहकार चळवळीचे परिणाम कोणते होते ?
२) राष्ट्रीय शिक्षण चळवळीने कशाला महत्त्व दिले होते ?
३) राष्ट्रीय शिक्षरावरील ॲनी बेझंटचे विचार कोणते होते ?

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

१अ

स्वतंत्र भारतातील शिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटना

घटकाचे स्वरुप :

१अ.० उद्दिष्ट्ये
१अ.१ प्रस्तावना
१अ.२ विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८)
१अ.३ माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३)
१अ.४ शिक्षण आयोग (१९६४-६६)
१अ.५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)
१अ.६ सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९९२)

१अ.० उद्दिष्ट्ये :-

हा घटक (पाठ) अभ्यासल्यानंतर आपल्याला खालील बाबींची उत्तरे देता आली पाहिजेत.

- भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटना ओळखणे.
- शैक्षणिक आयोग स्थापन करण्याची आवश्यकता समजून घेणे.
- शैक्षणिक आयोगाने सूचित केलेली उद्दिष्ट्ये किंवा ध्येये सांगणे.
- शैक्षणिक आयोगाने सूचित केलेल्या उद्दिष्ट्यांवर चर्चा करणे व ती समजून घेणे.
- शैक्षणिक आयोगाने सूचित केलेल्या विविध स्तंभावरील शिक्षण पद्धती सांगणे.
- शैक्षणिक आयोगाने सांगितलेल्या शिक्षणपद्धतीबाबत चर्चा करुन त्या पद्धती समजून घेणे.

१अ.१ प्रस्तावना :-

"According to E. W. Thomas, Education is no exotic in India."

एफ. डब्ल्यू. थॉमस यांच्या मते, "भारतामध्ये शिक्षण हे अनोखे (अपरिचित) नाही." असा (भारतासारखा) कोणताही देश नाही ज्यामध्ये शिक्षणाची आवड खूप लवकर निर्माण झाली आणि परिणामकारकरित्या दीर्घकाळ टिकून राहिली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षण पद्धतीमध्ये, अभ्यासक्रमात, त्याची ध्येये, उद्दिष्ट्ये यामध्ये प्रामुख्याने बदल करणे आवश्यक झाले. स्वातंत्र्योत्तर काळात जसजशी राजकीय विचारसरणी बदलत गेली तस तसा राष्ट्रीय उद्दिष्टांमध्ये सुद्धा बदल करण्यात आला. एक तातडीची गरज म्हणजे अशा प्रकारचे नागरिक तयार करावयाचे जे लोकशाहीप्रधान राष्ट्रात राहू शकतील, त्या देशाचा सामाजिक, आर्थिक विकास साधू शकतील त्याचप्रमाणे विविधतेत एकता निर्माण करण्यात यशस्वी होतील. शिक्षण हे असे एक शक्तीशाली साधन म्हणून ओळखले जाऊ लागले ज्याद्वारे सर्व राष्ट्रीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यात येतील. समाज हा गतिमान आहे. लोकांच्या गरजा, त्यांच्या ईच्छा (अपेक्षा), आकांक्षा बदलत गेल्या की समाजाच्या गरजा आपोआप बदलतात. म्हणूनच शासनाने बदलत्या समाजाच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षणाच्या स्वरुपात,त्यांच्या उद्दिष्टांमध्ये आणि अभ्यासक्रमात विशिष्ट व वेळोवेळी योग्य बदल घडवून आणण्यासाठी विविध शिक्षण आयोग आणि अनेक समित्यांच्या स्थापना केल्या आहोत.

शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवून आणलेल्या काही आयोगांचा अभ्यास आपण पुढीलप्रमाणे करणार आहोत.

१अ.१ विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९) :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करण्यास व ती पुनर्रचित करण्यास गती मिळाली होती. इ. स. १९४८ मध्ये विद्यापाठ शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्या आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे होते. ऑक्सफॉर्ड विद्यापीठातील पौवात्यधर्म आणि नीतिशास्त्र या विषयाचे ते विद्वान होते. व बनारस विद्यापीठाचे माजी कुलगुरु म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता. विद्यापीठ शिक्षण आयोगांनी केलेल्या सूचना नंतर भारतातील विद्यापीठीय शिक्षणाचा विकास करण्यास कारणीभूत ठरल्या. या आयोगाची सुरुवात डिसेंबर १९४८ मध्ये झाली आणि त्याचा अहवाल ऑगस्ट १९४९ मध्ये दाखल झाला.

१अ.१.१ शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

१) जीवनाला अर्थ आहे हे शिकविणे.

२) चांगले जीवन जगण्यासाठी बौद्धिक विकासाबरोबरच सुप्तगुणांना (जन्मजात गुण) जागृत करणे.

३) सामाजिक तत्त्वज्ञानाची ओळख करुन देणे जेणेंकरुन शिक्षणाबरोबरच राजकीय व आर्थिक क्षेत्राच्या व्यवस्था पाहता येईल.

४) नेतृत्वगुण आणि लोकशाही मूल्यांचे प्रशिक्षण देणे.

५) स्वत:चा विकास करण्यासाठी प्रशिक्षण देणे.

६) निर्भिडपणा, प्रामाणीकपणा, कर्तव्याची जाणीव (कर्तव्यनिष्ठा) इत्यादी मूल्यांचा विकास करणे.

७) सांस्कृतिक वारसा यांच्या नवचैतन्याची (उन्नतीची) ओळख करुन देणे.

८) शिक्षण ही दीर्घकाळ (आजन्म) टिकणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षणविषयक माहिती करुन घेण्यास समर्थ बनविणे.

९) वर्तमानाबरोबर भूतकाळ समजून घेण्यास मदत करणे.

१०) व्यावसायविषयक आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

१अ.१.२ शिक्षण पद्धती :-

शैक्षणिक अभ्यासाची बारा वर्षे पूर्ण केल्यानंतर (बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर) विद्यापीठीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला गेला पाहिजे.

- कला आणि विज्ञान शाखेतील पदवीचा अभ्यासक्रम हा तीन वर्षाचा असेल.
- अभियांत्रिकी (engineering) या पदवीचा कालावधी हा चार वर्षाचा असेल आणि तो कालावधी इयत्ता बारावी उत्तीर्ण झाल्यानंतचा असेल. विज्ञानशाखेमध्ये प्रशिक्षणाच्या कामाचे तास वगळता त्या शाखेतील कार्यकाल हा पाच (५) वर्षाचा असतो आणि सराव हा एक अभ्यासाचा भाग म्हणून केला जातो.

अशाप्रकारे स्वतंत्र भारतात उच्च शिक्षणाच्या विकासासाठी नवीन प्रथा किंवा योग्य गती देणारा आयोग म्हणून विद्यापीठ आयोग ओळखला जातो.

तुमची प्रगती तपासून पहा.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) विद्यापीठ शिक्षण आयोगाने सूचित केलेली शिक्षणाची उद्दिष्ट्ये सांगा.

२) विद्यापीठ शिक्षण आयोगाने सांगितलेल्या शिक्षणपद्धतीविषयी थोडक्यात टिपा लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१अ.३ माध्यमिक शिक्षण आयोग (मूदलियार आयोग) (१९५२-५३) :-

ऑक्टोबर १९५२ मध्ये मद्रास विद्यापीठाचे उपकुलगुरु असलेले (त्याकाळी) डॉ. ए. एल. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची नेमणूक (स्थापना) करण्यात आली. या आयोगाने त्यावेळच्या प्रचलित (अस्तित्त्वात) असलेल्या शिक्षणपद्धतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यानंतर असे आढळून आले की, ती पद्धत फक्त पुस्तकी ज्ञानावर आधारलेली होती. म्हणून मुदलियार आयोगाने आधुनिक भारतातील शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये काही मुख्य शिफारशी (सुधारणा) केल्या.

१अ.३.१ शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

माध्यमिक शिक्षण आयोगानुसार शिक्षणाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.
- व्यावसायिक कार्यक्षमतेमध्ये सुधारणा घडवून आणणे.
- व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.
- नेतृत्वगुणांचा विकास करणे.

लोकशाही नागरिकत्वामध्ये शिक्षणाची भूमिका :-

लोकशाही नागरिकत्व ही खूप आव्हानात्मक जबाबदारी आहे. ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला खूप काळजीपूर्वक प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. यामध्ये बुद्धिमत्ता, सामाजिक आणि नैतिक गुणांचा समावेश होतो. या गुणांचा विकास नागरिकांनी स्वतः घडवून आणणे हे अपेक्षित नसते. माध्यमिक शिक्षण आयोगामुळे औपचारिक शिक्षणाचा शेवट करण्यासाठी बहुतेक नागरिकांना योग्य असे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामध्ये पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे खालील गोष्टींचा विकास करणे.

- चांगले विचार आणि नवीन कल्पना ग्रहण करण्याच्या क्षमतेचा विकास करणे.
- भाषण आणि लेखन यामध्ये स्वच्छता (नीटनेटकेपणा) आणणे.
- व्यक्तिचा सर्वांगीण व्यक्तीमत्त्वाचा विकास करणे.
- शिस्त, सहकार्य, सामाजिक संवेदनशिलता आणि सहिष्णूता इत्यादी गुणांना आत्मसात करण्यासाठी मदत करणे जेणेकरुन त्यांचे जीवन सुखदायी व आरामदायी होईल.
- स्वदेशाभिमानाची जाणीव निर्माण करणे.
- राष्ट्रीय नागरिकत्वाबरोबर जागतिक नागरिकत्त्व तेवढेच महत्त्वाचे आहे याची जाणीव निर्माण करणे.

व्यावसायिक कार्यक्षमतेमध्ये सुधारणा :-

जर एखादी शिक्षणपद्धती अशाप्रकारचे नागरिक तयार करण्यास समर्थ नसेल जे स्वत:ला मदत करु शकतनाहीत किंवा स्वत:चे आधार बनू शकत नाहीत तर अशाप्रकारची शिक्षणपद्धती ही अयशस्वी असेल. शिक्षणाचा मुख्य हेतू उदरनिर्वाह करण्यासाठी किंवा उपजीविकेची साधने निर्माण करणे हा होय. म्हणूनच या आयोगाने खालील गोष्टी सूचित केल्या आहेत.

- प्रत्येक व्यक्तीला पैसा कमावण्याची (आर्थिक कार्यक्षमता) कार्यक्षमता असली पाहिजे.
- शिक्षणाने व्यावसायिक कौशल्यावर भर दिला पाहिजे.

- शिक्षणाने श्रमप्रतिष्ठा निर्माण केली पाहिजे.
- शिक्षणाला श्रेष्ठता आणि परिपूर्णता यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास करता आला पाहिजे. आणि कोणतेही कार्य विश्वासाने पूर्णत्वास नेण्यास त्यांनी शिकले पाहिजे.
- तांत्रिक कौशल्य आणि प्रत्येक क्षणाला (प्रत्येक बाबतीत) विद्यार्थ्याला कार्यक्षम बनविण्यास शिक्षणाने हातभार लावला पाहिजे जेणेकरुन औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रशिक्षित आणि कर्तृत्ववान व्यक्ति म्हणून विद्यार्थी आपले नाव कमावतील किंवा नावारुपाला येतील.

व्यक्तिमत्त्व विकास :-

शिक्षणाचे हे तिसरे महत्त्वाचे कार्य आहे ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

- विद्यार्थ्यामध्ये नवनिर्मिती करण्याची शक्ती (क्षमता) निर्माण केली पाहिजे जेणेकरुन ती निर्मितीक्षमता नवनिर्मिती करणाऱ्याला आनंद आणि समाधान प्राप्त करुन देईल.
- विद्यार्थ्यांच्या भावनिक जीवनाबाबत माहिती करुन देणे. (पुरविणे)
- विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक वारसा यांचा आदर करण्यास शिकवून ते आत्मसात करण्यास सक्षम बनविले पाहिजे.
- विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि सुप्त गुणांचा विकास करणे.

नेतृत्त्वगुणाचा विकास :-

भारतासारख्या लोकशाही राष्ट्रामध्ये प्रत्येक व्यक्तिला काही हक्क आणि कर्तव्य पार पाडावी लागतात. आपले हक्क समजून घेऊन कर्तव्य पार पाडण्यासाठी ती व्यक्ति जबाबदार किंवा कर्तव्यदक्ष असली पाहिजे.

जबाबदार नागरिकाजवळ दोन गुणांची आवश्यकता आहे. ते पुढीलप्रमाणे :

१) शिस्त
२) नेतृत्त्वगुण आणि त्यासाठी या आयोगाने खालील गोष्टी सूचित केल्या आहेत.

- प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्तबद्ध कार्याची क्षमता रुजविली पाहिजे. जेणेंकरुन ते चांगले अनुयायी (शिष्य) बनू शकतात.
- जे विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापेक्षा जास्त शिक्षण घेतले नाहीत. अशा विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्त्वगुणाचा विकास करुन त्यांच्यामध्ये उच्च माध्यमिक (११ वी व १२ वी) शिक्षणाविषयी आवड निर्माण केली पाहिजे.
- ज्यांनी विद्यापीठीय शिक्षण घेतले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांमध्ये जीवनाच्या प्रत्येक वाटेवर (परिस्थितीमध्ये) किंवा प्रत्येक क्षणाला नेतृत्त्वगुण वाढीस लागला पाहिजे.

१अ.३.२ शिक्षण पद्धती :-

- प्राथमिक किंवा पूर्व प्राथमिक शिक्षणाची चार ते पाच वर्षे.
- माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ स्तरावरील शिक्षण ज्यांनी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण केलेला असला पाहिजे.
- उच्च माध्यमिक स्तर ज्यांनी चार वर्षाचा कालावधी पूर्ण केला पाहिजे.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) माध्यमिक शिक्षण आयोगाने सूचित केलेली शिक्षणाची उद्दिष्ट्ये सांगा.

२) माध्यमिक शिक्षण आयोगाने सूचविलेल्या लोकशाही नागरिकत्वामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

३) माध्यमिक शिक्षण आयोगाने सूचविल्याप्रमाणे व्यावसायिक कार्यक्षमता मिळविण्यात (प्राप्त करण्यात) शिक्षणाच्या भूमिकेची चर्चा करा.

४) माध्यमिक शिक्षण आयोगाने सूचविलेल्या व्यक्तिमत्त्व विकासामधील शिक्षणाचे कार्ये लिहा.

५) नेतृत्वगुण विकासाबाबत माध्यमिक शिक्षण आयोगाने कोणत्या शिफारशी केल्या आहेत ?

६) शिक्षण पद्धतीबाबत माध्यमिक शिक्षण आयोगाने कोणत्या शिफारशी केल्या आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

१अ.४ शिक्षण आयोग (१९६४-६६) किंवा कोठारी आयोग (१९६४-६६) :-

प्रसिद्ध वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली इ.स.१९६४ मध्ये शिक्षण आयोगाची स्थापना झाली.

पूर्वीच्या आयोगाप्रमाणेच शिक्षणाच्या कोणत्याही पैलूची चौकशी करण्यास मर्यादा नसाव्यात असे या आयोगाचे वैशिष्ट्ये होते. या आयोगाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या आयोगानुसार शिक्षण हे राष्ट्रीय विकासासाठी खूप शक्तीशाली साधन (यंत्र) आहे. म्हणूनच या आयोगाच्या अहवालाला (शिफारशीला) 'शिक्षण आणि राष्ट्रीय विकास' असे नाव देण्यात आले.

आयोगाच्या अहवालातील सुरुवातीच्या ओळी शिक्षणाबाबत असून त्या राष्ट्रीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यास महत्त्वाच्या आहेत. ते म्हणतात, "भारताच्या स्वप्नांना आकार वर्गखोल्यामध्ये प्राप्त होतो."

शिक्षणातील खूप महत्त्वाची व तातडीची गरज म्हणजे त्यात आवश्यक बदल करणे होय. शिक्षणाचा जीवनाशी, लोकांच्या गरजा व त्यांच्या अशा अपेक्षांशी सांगड घालण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे होते. अशाप्रकारे सामाजिक बदल करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन होय.

१अ.४.१ शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

या आयोगाने शिक्षणाची महत्त्वाची चार राष्ट्रीय उद्दिष्ट्ये सांगितलेली आहेत ती पुढीलप्रमाणे :-

१) उत्पादकतेसाठी शिक्षण

२) सामाजिक राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण

३) आधुनिकीकरणासाठी शिक्षण

४) सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यासाठी शिक्षण

१) उत्पादकतेसाठी शिक्षण :-

शिक्षणाला जास्त उत्पादनक्षम बनविणे असे या आयोगाने शिफारस केली आहे. ती पुढीलप्रमाणे :

- शाळेच्या आणि उच्च शिक्षणाच्या प्रत्येक पायरीमध्ये विज्ञानाची ओळख करुन देणे ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यास मदत होते. आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगवाद व चौकशीला चालना मिळते.
- शिक्षणाचाच एक भाग म्हणून कार्यानुभव या विषयाची ओळख करुन देणे. हस्तलिखित आणि बौद्धिक कामातील आंतर कमी करणे. शाळेत केलेल्या कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये परिपूर्णता येते.
- माध्यमिक शिक्षणामध्ये व्यवसाय मार्गदर्शन दिले जाते. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेचा विकास होतो आणि प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविले जाते.
- वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षणामध्ये सुधारणा करणे, विज्ञानाच्या मदतीने शेतीला विशिष्ट महत्त्व देणे, जेणेंकरुन शेतीचे उत्पादन काढण्यास आणि ग्रामीण भाग सुधारण्यास मदत होईल.

२) सामाजिक-राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण :-

सामाजिक-राष्ट्रीय एकात्मतेसाठी आयोगाने खालील बाबींना (शिफारशींना) प्राधान्य दिले आहे.

- सामान्य शाळापद्धती सर्वांसाठी खूली असावी ज्यामध्ये उपजत बुद्धीच्या आधारावर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जावा म्हणजेच शिक्षणाचा १०+२+३ हा आकृतिबंध भारतीय भाषा शिकण्यासाठी सर्व भारतभर विकसित व्हावा.

- सामाजिक आणि राष्ट्रीय सेवा हा शिक्षणाचा अविभाज्य भाग बनवून राष्ट्रीय कार्यात व सामाजिक कार्यात भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन द्यावी.
- भाषा विकसित करण्याचे धोरण :-
  १) मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे.
  २) प्रादेशिक भाषा ही राज्यातील प्रशासनाची भाषा असली पाहिजे.
  ३) प्राथमिक स्तरापासून जोडभाषा म्हणून इंग्रजी ही भाषा शिकविली जावी जेणेंकरुन लोकांना एकमेकाशी संवाद साधता येईल.
  ४) हिन्दी हे देशाची राष्ट्रीय भाषा असली पाहिजे.
- राष्ट्रीय जाणीवेचा विकास करणे :-

  राष्ट्रीय जाणीवेचा विकास करण्यासाठी खालील शिफारशी करण्यात आल्या आहेत.
  १) विविधतेतून एकता निर्माण करणे.
  २) लोकशाही मूल्यांचा विकास करणे उदा. देशभक्ती, चांगली विचारसरणी, विविध चर्चासत्रांवर विश्वास, तर्कशक्ती इत्यादि.
  ३) सांस्कृतिक वारसा या मूल्याचे पुन्हा मूल्यमापन करुन त्यामध्ये योग्य तो बदल घडवून आणणे.
  ४) राष्ट्रीय संस्कृतीचा अभिमान असणे, जसे राष्ट्रीय वनस्पती आणि प्राणी, राष्ट्रीय चिन्ह, राष्ट्रीय मुद्रा इत्यादि.
  ५) बंधुता आणि जागतिक शांततेचा प्रसार करुन आंतरराष्ट्रीय सांमजस्याचा विकास करणे.

३) आधुनिकीकरणासाठी शिक्षण :-

- शिक्षणाचा आणखी एक महत्त्वाचा विषय म्हणजे ज्ञान हे प्रगतीशील व आधुनिक पद्धतीचे (काळानुसार बदलणारे) असले पाहिजे.
- निष्क्रीयरित्या ज्ञान ग्रहण न करता ज्ञानाचा सक्रीय पद्धतीने शोध घेतला पाहिजे.
- शिक्षणामध्ये योग्य ती क्रांती होणे आवश्यक आहे म्हणजेच नवीन उद्दिष्ट्ये, नवीन शिक्षण पद्धती आणि शिक्षक प्रशिक्षणामध्ये बदल करणे आवश्यक आहेत.
- समाजाच्या बदलाबरोबरच शिक्षणपद्धतीमध्ये बदल होणे आवश्यक आहे.
- उत्सुकता, आवड, वर्तणूक, विविध कौशल्याचा विकास, स्वंयअध्ययन पद्धती, विचार आणि परीक्षण करण्याची समर्थता इ. गुण जागृत करण्याचे काम शिक्षणाने केले पाहिजे.
- शिक्षणाने कौशल्यपूर्ण नागरिक निर्माण केले पाहिजेत.
- समाजाच्या प्रत्येक स्तरातून निवडलेल्या स्त्री आणि पुरुषांचा समावेश बुद्धिमान (प्रतिभावंत) लोकांमध्ये झाला पाहिजे.
- व्यावसायिक शिक्षणावर जास्तीत जास्त भर दिला गेला पाहिजे.
- देशामध्ये काही मुख्य विद्यापीठांच्या स्थापना करणे खूप आवश्यक आहे.

४) सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक मूल्यासाठी शिक्षण :-

- विद्यापीठीय शिक्षण आयोगाने सूचविल्याप्रमाणे केंद्रिय आणि राज्य शासनाने सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक मूल्य शिक्षणाची ओळख करुन देण्याचे उपाय सूचविले पाहिजेत.
- खाजगी संस्थानीसुद्धा वरील प्रमाणे धोरण आवलंबिले पाहिजे.
- शालेय वेळापत्रकात काही तासिका मूल्यशिक्षण या विषयासाठी राखीव ठेवल्या पाहिजेत. अशाप्रकारच्या तासिका विशिष्ट विषय शिक्षकाने शिकविण्यापेक्षा कोणत्याही सामान्य शिक्षकांना द्याव्यात.
- शिक्षक प्रशिक्षण संस्थानी यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.
- परिणामकारकरित्या मूल्यशिक्षण हा विषय शिकविला जावा यासाठी विद्यापीठामध्ये स्वतंत्र्य विभाग कार्यरत असला पाहिजे.
- या आयोगानेसुद्धा विद्यापीठीय शिक्षण आयोग आणि श्री. प्रकाश समिती (Sri Prakasa Committee) प्रमाणेच धार्मिक आणि नैतिक शिक्षणाला मान्यता दिली.
- जगातील विविध धर्मांचा सामान्य अभ्यास ज्यामध्ये धार्मिक नेत्यांचे जीवन, तत्वज्ञान आणि धर्मातील समस्या इत्यादि अभ्यासक्रमाचा समावेश पदवीच्या अभ्यासक्रमात करावा.
- विद्यार्थ्यांना चिंतनासाठी प्रोत्साहन द्यावे.
- शाळेची सुरुवात सकाळी प्रार्थनेने करावी.
- शाळेमध्ये क्रीडा, खेळ आणि चिंतन इत्यादि. सक्तीचे करावे.
- शाळेमध्ये संताच्या जीवनाचा इतिहास, विविध धर्माचे तत्त्वज्ञान शिकविले गेले पाहिजे.

१अ.४.२ शिक्षण पद्धती :-

इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने सूचविलेले शैक्षणिक स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

- पूर्वशाळेच्या स्तरामध्ये १ ते ३ वर्षाचा वयोगट असावा.
- प्राथमिक शिक्षणाच्या पायरीमध्ये ७ ते ८ वर्षाचा वयोगट असावा व प्राथमिक शिक्षणाची विभागणी दोन पायऱ्यामध्ये करावी.
- निम्न प्राथमिक (Lower Primary) स्तरातील शिक्षणामध्ये ४ ते ५ वर्षांचा वयोगट असावा. यामध्ये इयत्ता १ ली ते ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी या वर्गाचा समावेश असावा.
- शिक्षणातील उच्च प्राथमिक स्तर हा ३ वर्षाच्या कालावधीचा असावा म्हणजेच यामध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी या वर्गाचा समावेश असावा.
- शिक्षणाचा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेचा स्तर याचा कालावधी तीन किंवा दोन वर्षाचा असावा म्हणजेच यामध्ये इयत्ता आठवी ते दहावी किंवा नववी ते दहावी या वर्गांचा समावेश असावा. किंवा एक ते तीन वर्षाचा कालावधी हा व्यावसायिक शिक्षणांसाठी असावा.

- उच्च माध्यमिक स्तरातील शिक्षणाचा कालावधी हा दोन वर्षाचा असावा म्हणजेच यामध्ये इयत्ता ११ वी व १२ वी या वर्गाचा समावेश असावा.
- व्यावसायिक शिक्षणासाठी १ ते ३ वर्षाचा कालावधी असावा व उच्च माध्यमिक स्तरानंतर ३ वर्षाचा पदवी कोर्स असावा. त्याचबरोबर संशोधन पदवीसुद्धा असावी.
- उच्च शिक्षण :- यामध्ये व्यावसायिक पदवी (B.E., M.B.B.S., B.T., L.L.B, B.Ag) इत्यादिंचा समावेश असावा.
- सामान्य पदवी :- यामध्ये व्यावसायिक पदव्याव्यतिरिक्त इतर सर्व पदव्यांचा समावेश होतो.
- पदवी पूर्ण न झालेले शिक्षण :- यामध्ये पदवी कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाचा समावेश होते.
- पदव्युत्तर पदवी :- यामध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त झालेल्या सर्व पदव्या ज्या पहिल्या पदवीनंतर प्राप्त करता येते. (B.Edवगळता सर्व पदव्युतर पदव्यांचा समावेश होतो.)

तुमची प्रगती तपासन पहा :-

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने सूचित केलेली शिक्षणाची उद्दिष्ट्ये लिहा.

२) इ.स. १९६४ च्या आयोगाने उत्पादनक्षमता वाढविण्याच्या दृष्टिने सूचविलेल्या शिफारशींवर चर्चा करा.

३) इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने सूचविलेल्या सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता मिळविण्यात शिक्षणाच्या भूमिकेबाबत चर्चा करा.

४) आधुनिकतेबाबत शिक्षण आयोगाचा प्रस्ताव सविस्तर लिहा.

५) नैतिक, सामाजिक आणि अध्यात्मिक मूल्यांचा विकास करण्यासाठी इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने सूचविलेल्या शिफारशी कोणत्या ?

६) शिक्षण पद्धतीबाबत इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाच्या शिफारशी कोणत्या ?

_____

_____

_____

_____

_____

१अ.५ १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-

माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३), शिक्षण आयोग (१९६४-६६) आणि शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण (१९६८) इत्यादिंमध्ये शिक्षणाच्या सुत्रीकरणाचा आणि शिक्षणाचा आणि

शिक्षणाच्या प्रस्तावांचा समावेश होता. परंतू त्यावर जास्त कोणी भाष्य केले नाही. (विचार केले नाही आणि याची अंमलबजावणीही झाली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे देण्यात येणाऱ्या सवलतीमधील समस्या, गूण, प्रमाण, उपयुक्तता आणि आर्थिक समस्या हे होय. म्हणून भारत सरकारने जानेवारी १९८५ मध्ये देशामध्ये नवे शैक्षणिक धोरण जाहिर केले. ऑगस्ट १९८५ मध्ये त्या धोरणाच्या मसुद्याला 'शिक्षणाचे आव्हान' (Challenges of Education) असे नाव देऊन त्यावर जनेतेची मते घेण्यात आली. मे १९८६ मध्ये शासन शिक्षणावरील धोरण जाहिर केले आणि त्यालाच 'शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण' असे नाव देण्यात आले. ऑगस्ट १९८६ मध्ये शासनाच्या माध्यमातून या धोरणाच्या प्रती प्रकाशित झाल्या. त्यालाच (Programme of Action) 'कृतीयुक्त कार्यक्रम' असे नाव देण्यात आले. ही दोन्ही प्रकाशित कागदपत्रे एकत्रित करुन त्याला 'नवे शैक्षणिक धोरण' असे नाव देण्यात आले.

१अ.५.१ शिक्षणाची राष्ट्रीय पद्धत :-

यामध्ये विद्यार्थ्यांच्या जाती, धर्म, वंश, स्थळ किंवा लिंग अशा गोष्टींना प्राधान्य न देता सर्वांना चांगल्या प्रतिचे शिक्षण मिळावे यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले. राष्ट्रीय अभ्यासक्रमावर शिक्षण पद्धती आधारित असावी ज्यामध्ये एक सर्वसाधारण गाभाघटक असावा.

अभ्यासक्रमाचा गाभा :-

सर्वसाधारण गाभाघटकामध्ये भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या (राष्ट्रभक्ती राष्ट्रीय एकात्मता), राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय, भारतीय सामाजिक सांस्कृतिक वारसा, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, स्त्री-पुरुष समानता, समानतावाद-लोकशाही-धर्मनिरपेक्षता, पर्यावरण संरक्षण, वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक, लहान कुटुंबाचा आदर्श, सामाजिक अडसरांचे निर्मूलन इ. दहा गाभा घटकांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

१अ.५.२ शिक्षणाचे उद्दिष्ट्ये :-

- सर्वांसाठी शिक्षण
- तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण
- व्यावसायिक शिक्षणाला विशिष्ट महत्त्व देऊन शिक्षणाला प्रोत्साहन
- समानतेसाठी शिक्षण

सर्वांसाठी शिक्षण :-

- प्राथमिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान (अग्रस्थान) देऊन भारतातील निरक्षरता या समस्येला सोडविण्याचा प्रयत्न १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने केला आहे.
- खडू-फळा मोहिमेला (Operation Black-Board) मान्यता देऊन आवश्यक त्या सुविधा प्राथमिक शाळांना पुरविणे हा हेतू असून आवश्यक खेळणी, फळा, नकाशे, तक्ते आणि दोन शिक्षक ज्यामध्ये एक स्त्री-शिक्षिका असावी.

- अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्राचे आयोजन करावे ज्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाचा प्रसार होईल.
- लहान बालकाची काळजी आणि त्यांच्या शिक्षणाला महत्त्व (Early Childhood Care & Education) ECCE :- ज्याला मानवी विकासातील महत्त्वाचा टप्पा मानले जातो अशासाठी प्राथमिक शिक्षणाला भक्कम बनविण्याचे कार्यक्रम, मागास समाजातील कामकरी स्त्रियांना मदत पुरविली जावी.
- डे केअर सेंटरची स्थापना करावी. (दिनसुरक्षा केंद्राची स्थापना करावी)
- गती निर्धारक शाळांची स्थापना करावी. (नवोदय विद्यालय)

तांत्रिक आणि व्यावस्थापकीय शिक्षण :-

- पदवी (Degree) आणि पदविका (Diploma)या दोन्ही स्तरावर तांत्रिक शिक्षणाचा विस्तार करणे.
- राष्ट्रीय विकासातील विविध क्षेत्राच्या मागण्या पूर्ण करणे व तसेच तांत्रिक शिक्षणामध्ये गुणवत्ता आणण्याचा प्रयत्न करणे.
- संगणक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला असून शिक्षणामध्ये संगणकाचे प्रशिक्षण देणे.
- तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थामध्ये संशोधन आणि त्याच्या विकासाला प्रोत्साहन देणे.
- नवीन ज्ञानाचा प्रसार करणे.

व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देऊन उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देणे :-

- शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणानुसार उच्च शिक्षण हे गतिमान असले पाहिजे. यामध्ये अध्यापनात व संशोधनात नाविन्यता आणण्याची जबाबदारी असली पाहिजे. आणि ही गोष्ट विविध संस्थांची स्थापना, शिक्षकांना प्रशिक्षण, नवीन प्रकारचे कोर्सेस्, संशोधनाला प्रोत्साहन देऊन साध्य करता येते.
- प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमात कार्यानुभव हा विषय समाविष्ट करावा आणि सामाजिकदृष्ट्या उपयोगी असे उत्पादित कार्य हे विषय शाळेच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावे या विषयाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, जेणेंकरुन व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे किंवा थेट कार्याच्या क्षेत्रात विद्यार्थी प्रवेश करतील.
- वरील विषय (कार्यानुभव आणि समाजसेवा) माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांना व्यावासायिक कार्यक्रमात भाग घेण्यास समर्थ बनवितात.
- उच्च माध्यमिक स्तरांवरील व्यावसायिक कोर्सेस्ना जीवनाचा एक वेगळा व्यावसायिक काळ समजला जातो.

समानतेसाठी शिक्षण :-

अनुसुचित जाती (S.C.)/अनुसुचित जमाती (S.T.) आणि इतर मागासवर्गीयांसाठी नोकरी आणि आर्थिक विकासात समानसंधी पुरविणे.

- अपंग विद्यार्थ्यांसाठी शिक्षणात खास सुविधा पुरविणे.
- मुलींच्या शिक्षणासाठी खास तरतूदी करणे.
- सामाजिकदृष्ट्या मागासवर्गासाठी वसतिगृहाची सुविधा पुरविणे.
- बालवाडीची स्थापना करणे.
- प्रौढ शिक्षण केंद्राची स्थापना करणे.
- भटक्या जमातीच्या लोकांसाठी (त्याच्या भाषेसाठी) अभ्यासक्रम आणि शैक्षणिक साहित्य पुरविणे.
- प्रौढ शिक्षण पूर्ण करणे आणि प्रसारमाध्यमाद्वारे शिक्षण चालू ठेवणे.

१अ.५.३ शिक्षण पद्धती :-

१९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सूचित केलेल्या शिक्षण पद्धतीचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यावर १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने नवीन पद्धती सूचित केली ती म्हणजे शिक्षणाचे समान स्वरुप (१०+२+३ आकृतिबंध) हे जगभर स्विकारण्यात आले. आताही बऱ्याचशा राज्यात (१०+२+३) या पद्धतीचा अवलंब केला गेला आहे. शिक्षणाच्या पहिल्या १० वर्षात ५ वर्षे प्राथमिक, ३ वर्षे उच्च प्राथमिक आणि २ वर्षे माध्यमिक शिक्षणाचा समावेश होतो.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सूचित केलेली उद्दिष्ट्ये लिहा.

२) अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले गाभाघटक कोणते ते लिहा.

३) सर्वांसाठी शिक्षण या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सूचविलेल्या १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या शिफारशींवर चर्चा करा.

४) उच्च शिक्षणाबाबत १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या शिफारशीवर चर्चा करा.

५) समान दर्जाचे शिक्षण या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या शिफारशी लिहा.

६) तांत्रिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या शिफारशी कोणत्या ?

७) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सूचविलेल्या शिक्षण पद्धतीवर टिपा लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१अ.६ १९९२ चे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने देशाच्या शैक्षणिक विकासामध्ये मोलाची भर टाकून महत्त्वाचा ठसा उमटवला. इ.स.१९९०-९२ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे खोलवर समालोचन किंवा परीक्षण करण्यासाठी CABE ही समिती नेमण्यात आली होती. या धोरणाचा अभ्यास केल्यानंतर CABE या समितीने विकासाच्या दृष्टीकोनातून काही बदल सूचविले. CABE या समितीने सुचविलेले बदल ७ मे १९९२ रोजी संसदेमध्ये मांडण्यात आले आणि यालाच १९९२ चे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण असे म्हणतात.

या सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये दोन नवीन परिच्छेद (परिशिष्ट) समाविष्ट करण्यात आले आणि याचे ३४ परिच्छेदामध्ये बदल करण्यात आले.

१अ.६.१ परिवर्तन – (बदल) :-

१९९२ च्या सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने खालील क्षेत्रामध्ये बदल सूचविले आहेत.

- शिक्षणाची राष्ट्रीय पद्धत
- समानतेसाठी शिक्षण
- विविध स्तरांवर शिक्षणाची पुनर्रचना
- तांत्रिक व्यवस्थापन शिक्षण
- शिक्षणाचे व्यवस्थापन
- उपलब्ध साधने आणि परीक्षण

१९९२ च्या सुधारित शैक्षणिक धोरणाने कृतिशील कार्यक्रमाच्या (Programme of Action) च्या मदतीने खालील क्षेत्रात परिवर्तन करण्याचे सूचविले.

शिक्षणाची राष्ट्रीय पद्धत :-

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या जात, वंश, धर्म, स्थळ, किंवा लिंगाचा विचार न करता चांगल्या प्रतीचे (दर्जाचे) शिक्षण उपलब्ध करुन देणे यासाठी खालील उपचार सूचविण्यात आले.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविल्याप्रमाणे शिक्षणाचे समान स्वरुप संपूर्ण देशात असले पाहिजे म्हणजे १०+२+३ हा आकृतिबंध संपूर्ण देशात कार्यरत (विकसित) असला पाहिजे.

समानतेसाठी शिक्षण :-

१) स्त्री-समानतेसाठी शिक्षण

२) अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती तसेच इतर मागासवर्गीयासाठी शिक्षण.

३) अल्पसंख्यांकासाठी शिक्षण

४) अपंगासाठी शिक्षण

५) प्रौढ शिक्षण आणि निरंतर शिक्षण

विविध स्तरावर शिक्षणाची पुर्नरचना :-

१) बालपणाची काळजी आणि शिक्षण.

२) जागतिक उपयोगितेनुसार शिक्षण आणि नावनोंदणी, शिक्षणातील सुधारणा आणि १४ वर्षापर्यंत शिक्षणाची धारणा.

३) भारतातील मुक्त शाळा आणि राष्ट्रीय मुक्त विद्यापीठांना सक्षम (सामर्थ्यवान) बनविणे.

तांत्रिक आणि व्यवस्थापन शिक्षण :-

१) आखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळ (AICTE) या कायद्याने दिलेल्या त्याच्या भूमिकेत खालील गोष्टी साध्य करण्यास समर्थ राहील.

- योग्य प्रमाण आणि दर्जा व्यवस्थित ठेवण्याची खात्री
- अधिकार
- इमारत निधी (अग्रस्थानच्या जागेला निधी पुरविणे)
- विद्यांर्थी प्रतिनिधी (प्रमुख) आणि मूल्यमापन

२) संशोधनाला आणि शिक्षणातील विकासाला शैक्षणिक निधी देऊन प्राधान्य देणे आणि UGC, AICTE पासून मान्यता घेणे.

- शिक्षणाचे व्यवस्थापन :- शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर शैक्षणिक साधनांना प्राधान्य देणे.
- उपलब्ध साधने आणि परिक्षण :- १९६४-६६ च्या शिक्षण आयोग आणि १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्यानुसार भारतीय समाजाचे समानतावादी उद्दिष्ट्ये आणि प्रायोगिक विकास हे शिक्षणामध्ये गुंतवणूक केल्यानंतरच साध्य करता येतील. आठव्या पंचवार्षिक योजनेपासून राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% पेक्षा जास्त हिस्सा (भाग) शिक्षणावर केला जाईल.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) शिक्षणाच्या राष्ट्रीय पद्धतीवर टिपा लिहा.

२) १९९२ च्या सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने कोणत्या क्षेत्रात बदल केला आहे ?

३) शैक्षणिक स्वरुपाच्या पुनर्रचनेबाबत १९९२ च्या सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने काय सूचित केले आहे ?

४) तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी कोणते उपाय केले आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

२

पूर्व-प्राथमिक शिक्षण
(ऐतिहासिक विकास, सद्यस्थिती आणि समस्या)

घटकाचे स्वरुप :-

२.० उद्दिष्ट्ये

२.१ ऐतिहासिक विकास

२.२ सद्यस्थिती

२.३ प्रवेशप्रक्रिया (पटनोंदणी)

२.४ पूर्व - प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम

२.५ मूल्यमापन

२.६ शाळापूर्व शिक्षणातील समस्या

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.० उद्दिष्ट्ये :-

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही खाली गोष्टी केल्या पाहिजेत.

- पूर्व प्राथमिक शाळेच्या ऐतिहासिक विकासाबाबत चर्चा करणे.
- सद्यस्थितीबाबत चर्चा करणे.
- पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाविषयी चर्चा करणे.
- पटनोंदणी किंवा प्रवेशप्रक्रियेविषयी चर्चा करणे.
- मूल्यमापन प्रक्रियेविषयी चर्चा करणे.
- पूर्व प्राथमिक शिक्षणातील समस्येविषयी चर्चा करणे.

२.१ ऐतिहासिक विकास :-

गेल्या तीस वर्षापासून पूर्व प्राथमिक शिक्षण लोकांना परिचित आहे. १८ व्या व १९ साव्या शतकामध्ये युरोप हा शैक्षणिक विचारांचा स्त्रोत होता. युरोपियन शैक्षणिक विचार पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या अध्यापन पद्धतीतील सुधारणांसाठी प्रोत्साहन देणारे ठरले. रुसोच्या

मते, "मूल हे छोटं, तरुण आणि प्रौढ नसून खरेतर त्याला जीवनाच्या विशिष्ट अशा पायरीमधून पुढे जावे लागते म्हणजेच बालपण हे वाढत जाणारे आणि न उलगडणारे वय असते." खूप अशा महान लोकांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या बालपणाची काळजी आणि त्यांच्या शिक्षणावर मोलाची कामगिरी बजावली आहे ज्यामुळे पूर्वशाळा शिक्षणाचे स्वरुप आणि कार्यावर त्यांचा प्रभाव पडला आहे.

या महान व्यक्तीमध्ये - खालील व्यक्तीचा समावेश आहे (होतो).

१) जॉन. ए. कामेनियस (सतरावे १७ वे शतक)

२) जीन. के. रुसो (१८ वे शतक)

३) जॉन. पेस्टॉलॉजी (१८ वे व १९ वे शतक)

४) जे. ड्युई, मारिया माँटेसरी, जी स्टॅनली हॉल (१९ सावे आणि २० सावे शतक)

५) थॉर्न डाईक, पीयाजेट, एम. के. गांधी, आर. टागोर (२० वे शतक)

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व प्राथमिक शाळेच्या विकासाबाबत सविस्तर चर्चा करा.

_____

_____

_____

_____

_____

विसाव्या शतकात बहुतेक किंडरगार्टन शाळा मिशिन यांनी स्थापन केलेल्या संस्थेशी जोडल्या गेल्या कालांतराने त्याना भारतीय स्वरुप प्राप्त झाले ते बालवाडी किंवा शिशूविहार या नावाने.

इ.स. १९०१-०२ मध्ये भारतामध्ये पहिली किंडरगार्टन शाळा महाराष्ट्र राज्यातील सोलापूर या ठिकाणी स्थापन करण्यात आली असून तेथे प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. ब्रहमविद्याविषयक समाजाचे अध्यक्ष डॉ. ॲनी बेझंट यांनी इ.स. १९०७ मध्ये मूलांसाठी खूप शाळेची स्थापना केली. इ.स. १९२० मध्ये गिजाबाई भेडका यांनी भारतामध्ये पहिली माँटेसरी शाळा स्थापना केली. त्या पाठोपाठ इ.स. १९२६ मध्ये नुतन बालशिक्षण संघ गुजरात आणि महाराष्ट्रात स्थापन झाला. ताराबाई मोडक आणि गिजाबाई भडेका यांचे पूर्वप्राथमिक शिक्षणात मोलाचे योगदान लाभले. त्या या शाळांच्या पहिल्या संशोधक होत्या.

ग्रामीण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी (विद्यार्थ्यांसाठी) अंगणवाडी व बालवाडी या शाळा आहेत. ग्रामीण आणि शहरी भागात पूर्व-प्राथमिक शाळांना मदत करण्यासाठी बऱ्याचशा अनौपचारिक संस्था पुढे सरसावल्या आहेत.

तुमची प्रगती तपासा :-

१) भारतातील पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या संशोधक कोण होत्या ?

२) पूर्व प्राथमिक अनौपचारिक शाळेची काही नावे लिहा.

२.२ सद्यस्थिती :-

भारतामध्ये पूर्व प्राथमिक शाळेचे विविध प्रकार आहेत. मार्गारेट मॅकमिलन ह्या नर्सरी शाळेच्या (बालवाडी) पुरस्कर्त्या होत्या. मुळात अशा शाळा पाश्चिमात्य देशात कष्टकरी मातांना मदत करण्यासाठी झोपडपट्टी विभागातील मुलांकरिता सुरु झाल्या. पण भारतात अशा प्रकारच्या शाळेची मुलांना ओळख होण्यासाठी ह्या शाळा स्थापन करण्यात आल्या आणि या शाळा प्रचंड शुल्क घेतात आणि विविध प्रकारचे कृतीशील शिक्षण पुरवितात.

दुसऱ्या प्रकारची शाळा म्हणजे किंडरगार्टन होय. भारतातील बऱ्याचशा पूर्व-प्राथमिक शाळेत किंडरगार्टन या प्रकारच्या शाळा चालू आहेत. किंडरगार्टन या शाळेचा संस्थापक फ्रोबेल हा होता.

भारतातील तिसऱ्या प्रकारची पूर्व प्राथमिक शाळा म्हणजे माँटेसरी होय जी मॅडम माँटेसरी यांनी स्थापन केली. यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज आहे. शाळेचे यश हे त्या - त्या शिक्षकांवर अवलंबून आहे म्हणूनच मारिया माँटेसरी मॅडमनी यासाठी खूप प्रयत्न केले. आणि भारतामध्ये खूप प्रमाणात माँटेसरी शाळा प्रचलित आहे.

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व-प्राथमिक शिक्षणातील शाळांचे विविध प्रकार लिहा.

२.३ प्रवेशक्रिया (पटनोंदणी) :-

शाळेच्या प्रकारानुसार आणि अभ्यासक्रमानुसार प्रत्येक (विविध) शाळेची प्रवेशप्रक्रिया ही वेगळी असते. काही शाळेमध्ये विद्यार्थी व पालक या दोघांच्याही मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. काही शाळेत फक्त विद्यार्थ्यांच्या (मुलांच्या) मुलाखती घेतल्या जातात आणि काही शाळेत विद्यार्थी व पालक या दोघांच्याही मुलाखती न घेता प्रवेशप्रक्रिया पूर्ण होते.

साधारणत: सर्वच शाळेमध्ये प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना एक शाळेचा अर्ज (Application) देऊन त्याकडून सविस्तर माहिती गोळा करुन प्रवेश दिला जातो. पूर्वप्राथमिक शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची किमान वर्यामर्यादा $३\frac{१}{२}$ वर्षे असावी लागते. परंतू ही वयोमर्यादा सर्व शाळेत सारखी नसते. $२\frac{१}{२}$ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयोमर्यादा असणाऱ्या बालकाला नर्सरी शाळेत प्रवेश दिला जातो.

म्हणून पूर्वप्राथमिक शाळेमध्ये गणवेश हा बंधनकारक नसून त्यासाठी शैक्षणिक शुल्क आकारले जात नाही. आणि त्या ठिकाणी विशिष्ट अभ्यासक्रमही घेतला जात नाही व पाठ्यपुस्तकाचेही बंधन नाही. कधी-कधी पूर्व-प्राथमिक शिक्षणासाठी नर्सरी, छोटा शिशू, मोठा शिशू हे तीन वर्ग असतात तर काही शाळेमध्ये दोनच वर्ग असतात त्यामध्ये पहिला वर्ग छोटाशिशू आणि दुसरा वर्ग मोठा शिशूचा असतो.

ग्रामीण, शहरी, शाळेचा प्रकार, सभोवतालचा परिसर यानुसार पूर्व-प्राथमिक शाळेची प्रवेशप्रक्रिया वेगवेगळी असते. त्यावर केंद्रशासन व राज्यशासन यांचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसते. म्हणून अशा प्रकारच्या शाळा संस्थापकाच्या इच्छेनुसार चालविल्या जातात.

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व - प्राथमिक शिक्षणाची प्रवेशप्रक्रिया कोणती आहे ?

_____

_____

_____

_____

_____

२.४ पूर्व - प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम :-

अ) प्रस्तावना :-

पूर्व-प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमामध्ये शाळेमध्ये केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या कृती समाविष्ट करण्यात आल्या आहेत. पूर्व-प्राथमिक शाळेतील मुले त्यांच्या आवडीच्या कृतीमध्ये

(कार्यक्रमामध्ये) आणि उत्साहित कार्यक्रमामध्ये भाग घेतात. म्हणून पूर्व-प्राथमिक शाळेनी विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांसाठी योग्य ती वातावरण निर्मिती करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. मूलांकडून केवळ प्रश्नाची उत्तरे न स्विकारता अनुकरण करण्यास स्वयंअध्ययन करण्यास, कृतीशील बनण्यास पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून समर्थ केले पाहिजे. योजनाबद्ध (नियमबद्ध) अभ्यासक्रमात ३$\frac{१}{२}$ ते ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या मुलांनी संपादन केलेल्या यशाला ग्राह्य धरले पाहिजे. म्हणून अध्ययन आणि विकासाच्यादृष्टिकोनातून शैक्षणिक तत्त्वांचे पालन केले पाहिजे.

मूलांसाठीचा अभ्यासक्रम हा मानवी संसाधनावर आधारित असावा जेणेंकरुन त्यांना आत्मसात करणे, संप्रेषण, प्रेम, निर्णयक्षमता, माहिती घेणे, आयोजन करणे आणि नवनिर्मिती करणे इ. गोष्टी शिकण्यास मदत होईल. थोडक्यात पूर्व प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम हा अनुभवांवर आधारलेला असला पाहिजे.

'राष्ट्रांच्या स्वप्नांना वर्गखोल्यामधून आकार प्राप्त होतो' असे कोठारी आयोगाने मत मांडलेले आहे याची स्विकृती ही नियोजित अभ्यासक्रमाचा प्रकार आणि शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावरील त्याची अमंलबजावणी यावर आधारित आहे.

अभ्यासक्रमाचे उपघटक :-

- अध्ययन - अध्यापन पद्धतीनुसार उद्दिष्ट्ये
- घटक
- अध्ययन अनुभूती (अध्ययन अनुभव)
- मूल्यमापनाची साधने आणि तंत्रे

अभ्यासक्रमाने काही तत्त्वे पाळली पाहिजेत जसे लवचिकता, समर्पकता, कार्यक्षमता आणि उत्पादनक्षमता इत्यादि.

तुमची प्रगती तपासा :-

१) अभ्यासक्रम काय आहे ?

२) अभ्यासक्रमातील घटक लिहा.

३) अभ्यासक्रमाची तत्त्वे लिहा.

_____

_____

_____

_____

_____

ब) कार्यक्रम :-

विद्यार्थ्यांच्या भौतिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, भाषिक, बौद्धिक आणि आरोग्य इ. च्या विकासासाठी खालील कतींचा किंवा कार्यक्रमांचा शालेय अभ्यासक्रमांत समावेश करण्यात आला आहे.

१) आरोग्य तपासणी

२) मुक्त संभाषण

३) कथा कथन

४) यमक (कविता)

५) सर्जनशील कार्यक्रम (निर्मितीक्षम)

६) कार्यक्षमतेची तयारी (तत्परता)

वरील दैनंदिन कार्यक्रमाशिवाय इतर गोष्टींचासुद्धा यामध्ये समावेश होतो. जसे. निसर्गाचा फेरफटका, सण साजरे करणे, पालकांशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे इत्यादि. कधी-कधी विज्ञान आणि समाजशास्त्रातील घडामोडींचा अभ्यास हा एक अभ्यासक्रमाचा भाग म्हणूनही ठेवला जातो.

क) नियोजनात्मक कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :-

१) कार्यक्रम लवचिक असावा.

२) संघ कार्यक्रम आणि व्यक्तिगत कार्यक्रमात समतोल असावा.

३) मुक्तक्रीडा आणि मार्गदर्शनात्मक कार्यक्रम.

४) सकर्मक खेळ आणि आकर्मक खेळ (मैदानी खेळ आणि घरातील खेळ)

५) ते कार्यक्रम अर्थपूर्ण आणि कार्यक्षम असले पाहिजेत.

नियोजनबद्ध कार्यक्रमाची तत्त्वे :-

पूर्व - प्राथमिक शाळेतील मुलांचा (विद्यार्थ्यांचा) अनुभव हा बऱ्याच घटकावर अवलंबून असतो त्यापैकी काही घटक खालीलप्रमाणे :-

१) शिक्षक-विद्यार्थी प्रमाण

२) शाळेचा कालावधी

३) पायाभूत सुविधा

४) शाळेचे स्थान (ग्रामीण) शहरी

५) शाळेची आर्थिक स्थिती.

प्रत्येक विद्यार्थ्यांला त्याच्या प्रगतीला गती असते म्हणून त्यानुसार नियोजन केले पाहिजे.

सूचित केलेले कार्यक्रम हे अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ठेवला पाहिजे आणि तो शाळेत पूर्ण केला पाहिजे. अभ्यासक्रम हा नेहमी सत्य आणि प्रात्यक्षिक अनुभवावर आधारित असला पाहिजे.

ड) पूर्व-प्राथमिक शाळेतील समतोल अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :-

१) चांगला अभ्यासक्रम पूर्व-प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या संधी पुरविते जसे आकलनक्षमता, परिणामकारकता आणि बौद्धिक कौशल्य.

२) अध्ययन अनुभूतींना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास व त्यांना आशावादी बनण्यास समर्थ असली पाहिजे.

३) आत्मविश्वास हा विद्यार्थ्यांमध्ये परिस्थितीनुसार निर्माण झाला पाहिजे.

४) अभ्यासक्रमात खूप अशा कृतींचा समावेश असावा जेणेंकरुन विद्यार्थ्यांना त्यांचा सर्वांगीण विकास करण्यास मदत होईल.

५) लवचिकता, कृतीशीलता, अनुभव, सत्यता आणि उपयोगिता या तत्त्वांवर अभ्यासक्रम अवलंबून असावा.

६) अभ्यासक्रमाविषयक कार्यक्रम हा खेळ, प्रकल्प आणि कृतिशील पद्धतीवर अवलंबून असावा.

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व प्राथमिक शाळेच्या समतोल अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२.५ मूल्यमापन :-

विद्यार्थ्यांच्या विकासाचे सातत्यपूर्ण केले जाणारे मूल्यमापन म्हणजेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन होय.

मूल्यमापनाच्या माध्यमातून गुणात्मक व संख्यात्मक प्रगती मोजता येते. विकासात्मक मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांची अध्ययनातील प्रगती कळते. विद्यार्थ्यांची प्रगती योग्य दिसून आली नाही तर त्याना अधिक प्रगतीशील बनविते. शिक्षकांना आपल्या अध्यापनातील उणेपणा लक्षात येतो. त्यामुळे त्यांना प्रत्याभरण मिळते व अध्यापनात सुधारणा घडवून आणण्यास हे मूल्यमापन मदत करते. या प्रकारच्या मूल्यमापनामधून विद्यार्थ्यांच्या प्रक्रियाचा (प्राविण्याचा), क्षमतांचा, प्रगतीचा अंदाज घेता येईल. म्हणूनच चाचण्या उपयुक्त आहेत. या विकास चाचण्यामुळे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करणे सुलभ होऊन परीक्षेवरील ताण कमी करता येईल. शिवाय परीक्षेतील इतर दोषही दूर करता येतील.

मूल्यमापनाची तंत्रे :-

विद्यार्थ्याने एखाद्या विषयाचे अध्ययन कितपत केले आहे हे आपणास विविध प्रकारच्या प्रश्नोत्तराच्या साहाय्याने पाहता येते. परंतू विद्यार्थ्यांमध्ये कोणते गुण विकसित झाले आहेत हे पाहण्यासाठी लेखी परीक्षेचा फायदा होत नाही म्हणून त्यासाठी वेगळ्या साधनांचा वापर करावा लागतो. त्यालाच मूल्यमापन तंत्रे असे म्हणतात.

मूल्यमापन तंत्रे खालीलप्रमाणे :

१) पदनिश्चयन श्रेणी

२) पडताळा सूची

३) प्रासंगिक नोंदी

४) मूलाखत

५) परीक्षण (सर्वेक्षण)

६) अनौपचारिक चाचण्या

सहा वर्षाखालील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांनी पेन्सिल आणि पेपर (लेखी चाचणी) चाचण्यांच्या वापरावर मर्यादा ठेवली पाहिजे. त्याऐवजी शिक्षकांनी अनौपचारिक मूल्यमापन तंत्रांचा वापर केला पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन अनुभूतीच्या मूल्यमापनामध्ये उजळणी आणि योग्य प्रतिसाद यांचा समावेश होतो. उजळणी ही विद्यार्थ्याला धड्याचे (पाठाचे) ज्ञान किती प्रमाणात झाले आहे याची असते तर प्रतिसाद हे शेवटचे मूल्यमापन असते जे शिक्षकाचे अध्यापन झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून उत्तराच्या रुपाने घेतले जाते. म्हणजेच शिकविलेला मुद्दा विद्यार्थ्यांना किती प्रमाणात समजला आहे आणि आकलन न झालेला मुद्दा कसा अभ्यासावयाचा यावर अवलंबून असते. मूल्यमापन हे विकासात्मक आणि अंतिम मूल्यमापन या दोन्ही प्रकारे केले जाते.

विद्यार्थ्याचा सातत्याने कितपत विकास होत आहे याचे अध्ययन चालू असताना हे मूल्यमापन केले जावे पण अंतिम मूल्यमापन हे अध्यापन पद्धतीच्या शेवटी केले जाणारे मूल्यमापन होय. अध्ययन-अध्यापनाच्या शेवटी विकास किती होतो आहे हे आजमाविण्यासाठी याचा उपयोग होतो.

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व - प्राथमिक विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाची तंत्रे कोणती आहेत ?

२) पूर्व - प्राथमिक शाळेतील शिक्षणाच्या समस्या

_____

_____

_____

_____

२.६ पूर्व - प्राथमिक शाळेतील शिक्षणाच्या समस्या :-

पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या संस्थेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या संस्थांना समाजाच्या उत्पन्नाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या संस्थाना समाजाच्या उत्पन्नाचा स्त्रोत मानतात. अभ्यासक्रमाचे नियोजन आणि प्रशिक्षणातील अर्धवट ज्ञानामुळे पूर्व-प्राथमिक शाळेच्या शिक्षणात बऱ्याच प्रमाणात समस्या उद्‌भवल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे :

१) पूर्व-प्राथमिक शाळेतील अकार्यक्षम आणि अप्रशिक्षित शिक्षक.

२) संस्थामधील शिक्षकांना अपूरे (कमी) मानधन दिले जाते.

३) प्रतिकूल वातावरणाचा फैलाव.

४) शिक्षक-विद्यार्थ्यातील उच्च प्रमाण म्हणजेच 1:70 (१:७०)

५) कमी दर्जाची संरक्षणयंत्रणा.

६) शाळेतील शिक्षकांना कायमस्वरुपाच्या नोकरीची हमी दिली जात नाही म्हणून गुणवंत शिक्षकांचे नूकसान.

७) विद्यार्थ्यांच्या विकासात्मक पद्धतीला समजून घेण्यात कमतरता.

८) केंद्र किंवा राज्यशासनाकडून पुरेशा प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळत नाही.

९) शैक्षणिक शुल्कामध्ये भरमसाठ वाढ. अल्प उत्पन्न धारकांना त्यांच्या मुलांना शिक्षण देणे सहज शक्य नाही.

१०) ग्रामीण भागात खूप कमी प्रमाणांत पूर्व-प्राथमिक शाळा चालविल्या जातात.

११) शासनाचे नियंत्रण नाही.

१२) शै. साधनांचा अभाव.

१३) मनोरंजनात्मक शैक्षणिक साधनाचा अभाव.

१४) अभ्यासक्रम कृतीशिलतेला कमी स्थान. ५० ते ७०% मूल्यमापन हे ज्ञानावर आधारित प्रश्नोत्तरावर आधारित असते.

१५) टिकात्मक विचारसरणी, कृतीशिलता आणि कुतहल इत्यादि गोष्टींना कमी वाव दिला जातो आणि भाषा, गणित, विज्ञान, समाजशास्त्र या विषयांवर जास्त भर दिला जातो.

१६) खूप प्रमाणात गृहपाठ आणि अभ्यासक्रमाचा बोझा विद्यार्थ्यांच्या दफ्तराचे वजन हे त्याच्या वजनाच्या $\frac{१}{५}$ एवढे असते.

१७) संस्था सूचनांचे पालन करीत नाहीत.

१८) पूर्व-प्राथमिक शाळेत संशोधनाचा अभाव आणि संशोधन केले तर त्याचे खूप कमी प्रमाण असते.

१९) अस्पष्ट आणि चूकीची प्रवेश प्रक्रिया.

तुमची प्रगती तपासा :-

१) पूर्व-प्राथमिक शाळेतील समस्या कोणत्या आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

२.७ सारांश :-

एकोणिसाव्या शतकामध्ये पूर्व-प्राथमिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त होण्यास सुरुवात झाली. त्यासाठी महान व्यक्तींनी खूप मोलाचे योगदान दिले. त्यामध्ये जे. कॉमेनियस, रुसो, जॉन ड्युई, मारिया माँटेसरी, फ्रोबेल, महात्मा गांधी, रविंद्रनाथ टागोर, ताराबाई मोडक, आणि गिजाबाई बडेका इत्यादिंचा समावेश होतो.

यामध्ये किंडरगार्टन, नर्सरी आणि माँटेसरी अशा विविध प्रकारच्या शाळेच्या समावेश होतो. अंगणवाडी आणि बालवाडी या शाळांचा समावेश अनौपचारिक शिक्षण पद्धतीत होतो.

विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम हा लवचिक आहे. शक्यतो अभ्यासक्रम हा कृतिशिलतेवर आधारित असतो. मूल्यमापनाची तंत्रे प्रत्येक शाळेनुसार वेगवेगळी असतात. म्हणूनच प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम, आणि कायदे यामध्ये खूप समस्या असतात.

२.८ प्रश्न :-

१) पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या ऐतिहासिक विकासावर चर्चा करा.

२) पूर्व-प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती कोणती आहे ?

३) पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सविस्तर स्पष्ट करा.

४) अभ्यासक्रमाचे नियोजन करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत ?

५) पूर्व-प्राथमिक शाळेच्या मूल्यमापनाची कोणती तंत्रे वापरली जातात ?

६) पूर्व-प्राथमिक शाळेत मूल्यमापन का आवश्यक आहे ?

७) पूर्व-प्राथमिक शिक्षण पद्धतीतील काही समस्या ओळखा.

संदर्भ :-

१) शैक्षणिक मूल्यमापन :- डॉ. ह. ना. जगताप फडके प्रकाशन
प्रा. सच्चिदानंद मोकाशी

२) शालेय व्यवस्थापन व शैक्षणिक मूल्यमापन :-
प्रा. व्हि. के. देवरे
प्रा. रंजना देवरे

❖❖❖❖

३

प्राथमिक शिक्षण :
ऐतिहासिक विकास, सद्यस्थिती आणि समस्या

घटकाचे स्वरुप :-

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ प्राथमिक शिक्षण

३.३ ऐतिहासिक विकास

३.४ प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप - प्रवेशप्रक्रिया, अभ्यासक्रम

३.५ सद्यस्थिती

३.६ आवश्यक (अनिवार्य) शिक्षण आमलात आणण्यासाठी येणारे अडथळे

३.७ प्राथमिक शिक्षणाचे मूल्यमापन

३.८ एकशिक्षकी शाळा (ग्रामीण भाग)

३.९ सारांश

३.१० प्रश्न

३.० उद्दिष्ट्ये :-

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी केल्या पाहिजेत.

- प्राथमिक शिक्षणाचा अर्थ याविषयी ज्ञान प्राप्त करणे.
- ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
- प्रवेशप्रक्रिया अभ्यासक्रम आणि मूल्यमापन प्रक्रिया स्पष्ट करणे.
- प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती समजून घेणे.
- अनिवार्य प्राथमिक शिक्षण आमलात आणण्यासाठी येणाऱ्या समस्यांचे परीक्षण करणे.
- ग्रामीण भागातील एकशिक्षकी शाळेतील समस्यांचे वर्णन करणे.

३.१ प्रस्तावना :-

इ.स. १९७६ पूर्वी शिक्षणाची जबाबदारी राज्यशासनावर होती. तांत्रिक शिक्षणातील उच्च शिक्षणातील करारीपणा आणि त्यातील समन्वय इत्यादि बाबतीत केंद्रशासनाचा सहभाग होता. इ.स. १९७६ च्या राज्यघटनेतील सुधारणांमुळे शिक्षण ही राज्यशासन व केंद्रशासन यांची संयुक्त जबाबदारी बनली.

अशाप्रकारे, शिक्षण हे न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा हिस्सा बनला. विद्यापीठीय आणि तंत्रशिक्षणामध्ये केंद्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. आणि माध्यमिक शिक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका राज्यशासनाची असते. शिक्षणाचे स्वरुप व संघटन यावर निर्णय देणे हे राज्यशासनाचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. अशाप्रकारे शिक्षणाचा दर्जा व वैशिष्ट्ये ठरविणे ही केंद्रशासनाची जबाबदारी आहे.

गेल्या ५७ वर्षापासून (स्वातंत्र्यानंतरच्या) केंद्र व राज्यशासन चांगले व दर्जेदार शिक्षण पुरविण्याचे कार्य करत आहे. त्यामध्ये चांगली शाळा, पक्या इमारती, प्रशिक्षित शिक्षक, पुस्तकपेढी योजना (मोफत पाठ्यपुस्तके), शिष्यवृत्ती, गणवेश, मध्यंतराचे, जेवण इ. गोष्टी आणि प्रा. शिक्षण सक्तीचे करण्यात राज्यशासनाचा खूप मोठा हातभार आहे.

३.२ प्राथमिक शिक्षण :-

भारतातील शिक्षणपद्धती चार भागात विभागलेली आहे. त्यामध्ये पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा समावेश होतो. पायाभूत शिक्षणासाठी प्राथमिक शिक्षणावर जास्त भर देण्यात आलेला असून १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यामध्ये विविध कौशल्याचा विकास झाला पाहिजे. त्यामध्ये वाचन, लेखन, आकलनक्षमता, पृथ्थकरण,तर्क, सामाजिक कौशल्य इत्यादीचा समावेश होतो जेणेंकरुन हे विद्यार्थी राष्ट्राच्या आर्थिक सामाजिक आणि राष्ट्रीय विकासामध्ये भाग घेऊ शकतील. म्हणून भारतीय राज्यघटनेनुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे आवश्यक आहे.

प्राथमिक शिक्षणाविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली पाहिजे.

३.३ ऐतिहासिक विकास :-

स्वातंत्र्यपूर्व काळात वासहतवाल्यांनी जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवले होते. शिक्षणाचा ऐतिहासिक विकास पुढीलप्रमाणे :

- १८३८ – विल्यम ॲडम यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यास भाग पाडले.
- १८७२ – सक्तीचे (अनिवार्य) शिक्षणाचा कायदा केला.
- १९१८ – मुंबईमध्ये अनिवार्य (सक्तीचे) शिक्षणाचा कायदा संमत करण्यात आला.

१९४६-४७ पटेल कायदा :-

अनिवार्य शिक्षणातील कायदे करण्यात प्रगती झाली.

- १९४६-४७ - हा कायदा १७६ ग्रामीण विभागातील ११ हजार ७७९ एवढ्या गावी लागू करण्यात आला.
- १९५० - राज्यघटनेतील ४५ व्या कलमानुसार १४ वर्ष वयोगटाखालील मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षण देण्यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असावे.

३.४ प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप, प्रवेशप्रक्रिया व अभ्यासक्रम :-

अ) प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप :-

वीस राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये प्राथमिक शिक्षणाची पायरी ही इयत्ता पहिली ते पाचवी (पाच वर्ष) पर्यंतची आहे. उच्च प्राथमिक स्तरामध्ये इयत्ता सहावी ते आठव्या वर्गाचा समावेश होतो पण गुजरातमध्ये प्राथमिक स्तर हा इयत्ता (१ ली ते ८ वी) पहिली ते आठवीपर्यंतचा आहे.

प्राथमिक शिक्षणाचा वयोगट सहा ते दहा (६ ते १०) वर्षाचा आहे आणि उच्च प्राथमिक स्तर हा वयोगट ११ ते १४ वर्षाचा आहे. बहुतांश राज्यामध्ये उच्च प्राथमिक स्तर हा इयत्ता आठव्या वर्गापर्यंतचा आहे.



ब) प्राथमिक शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया :-

प्रवेशासाठी वयोमर्यादा :-

इयत्ता १ ली मध्ये प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्याचे वय साधारण ५ किंवा ६ वर्षे एवढे असावे. १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेण्यासाठी वयोमर्यादा ५ वर्षापेक्षा अधिक असावे आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये हे वय ६ वर्षापेक्षा अधिक असावे. २ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये प्राथमिक शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे वयाचे बंधन नाही.

शिक्षणाचे माध्यम :-

बहुतांश राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये प्राथमिक शिक्षणाचे माध्यम त्या त्या राज्यातील भाषा किंवा मातृभाषा आहे. अभ्यासाचे माध्यम हे प्रादेशिक भाषेपेक्षा मातृभाषा असणे आवश्यक आहे.

क) प्राथमिक शिक्षणाची अभ्यासक्रम पद्धती :-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने ठरविलेल्या मतानुसार अभ्यासक्रमाचा विकास हा अखंडित असून तो विद्यार्थ्यांच्या वाढत्या अध्ययन गरजांशी जुळला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत असे मूल्ये, कौशल्य आणि ज्ञान हा अभ्यासक्रमाचा गाभा असावा.

इयत्ता ५/६ वी – ७ वी/८वी :-

१) भाषा

२) गणित

३) इतिहास, नागरिकशास्त्र आणि भूगोल

४) विज्ञान

५) कला (संगीत, नृत्य, चित्रकला)

६) समाजोपयोगी उत्पादक कार्य (कार्यशिक्षण) आणि समाजसेवा

७) खेळ, शारिरीक शिक्षण, आणि पर्यवेक्षण अभ्यास

प्राथमिक शिक्षणाचे जागतिकीकरण (सार्वत्रिकीकरण) :-

लोकशाही बळकट करण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे ही पहिली गरज आहे. भारतासारख्या विकसनशील देशात पायाभूत शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे. १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाने पायाभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी समजूतदारपणाची भूमिका घेतली. शिक्षणाचा दर्जा आणि गुणात्मक वाढ यांचा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामध्ये समावेश असतो.

अशाप्रकारे भारतामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे महत्त्वाचे उद्देश बनले आहे. शिक्षण वयोगट ६ ते १४ वर्षे इयत्ता पहिली ते ८ वी साठी आहे.

राज्यघटनेने ठरविलेल्या ध्येयानुसार इ.स. १९६० पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण स्क्तीचे आणि मोफत दिले जावे असे ठरविण्यात आले होते. पण फाळणीनंतरचे पुनर्वसन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव या समस्येमुळेते पूर्ण होऊ शकले नाही. याचाच परिणाम म्हणून इ.स. १९७०, इ.स. १९७६ आणि इ.स. १९९० पर्यंत वाढविण्यात आली. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्याची मुद्दत १९९५ पर्यंत वाढविण्यात आली आणि नंतर १९९२ च्या सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ही मुदत २१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या उंबरठ्यावर येऊन पोचली.

सार्वत्रिकीकरणाचे तीन पैलू :-

१) शाळा ही विद्यार्थ्यांच्या घरापासून चालत जाणाऱ्या अंतरावर असावी.

२) यामध्ये वयोगट ६ ते १४ वर्षोतील विद्यार्थ्यांचा समावेश असावा.

३) वयाच्या ६ व्या वर्षी प्राथमिक शाळेत प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला कमीतकमी इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण घेणे हे बंधनकारक आहे.

सार्वत्रिकीकरणामध्ये सारख्या संघटना आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचा समावेश असून नियोजन अंमलबजावणी, जबाबदारी व मूल्यमापन इ. बाबत त्यांचे मोलाचे योगदान लाभलेले आहे.

विकेंद्रीकरणामुळे शासनांच्या योजना आणि लोकांच्या गरजा यामध्ये सहसंबध साधणे शक्य झाले. नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पायाभूत सेवेत लोकांचा सहभाग असावा असा उल्लेख केला आहे. यामुळे खालील चार उद्दिष्ट्य साध्य करण्यास मदत झाली आहे.

कार्यक्षमता (Efficiency)

परिणामकारकता (Effectiveness)

अधिकारक्षमता (Empowerment)

निपक्षपातीपणा (Equity)

तुमची प्रगती तपासा :-

१) शिक्षण ही सहकालिक (त्या त्या काळी घडणार) यादीमध्ये मोडते – समर्थन करा.

२) शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे अर्थ आणि महत्त्व स्पष्ट करा.

३) भारतातील प्राथमिक शिक्षणाच्या स्वरुपाचे केंद्रस्थान सिद्ध करा.

४) भारतीय शिक्षणातील पायाभूत शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील समाविष्ठ विषयाची माहिती लिहा.

_____

_____

_____

_____

_____

३.५ सद्यस्थिती :-

पायाभूत शिक्षणातील वाढत्या शैक्षणिक सुविधामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे. शिक्षणाच्या जागतिकीकरणासाठी राज्यघटनेमध्ये करण्यात आलेला बदल हा आवश्यक आहे.

पायाभूत शिक्षणाचा उद्देश साध्य करण्यासाठी खालील सद्यस्थिती व योजना राबविण्यात आल्या.

खडू-फळा मोहिम :-

इ.स. १९८७-८८ मध्ये खडू-फळा मोहिम सुरु करण्यात आली. या मोहिमेची प्रमुख उद्दिष्ट्ये, वर्गाचे वातावरण सुधारणे ज्यामध्ये भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, शैक्षणिक साधने इ. पुरविले जाते हे आहेत. या योजनेच्या माध्यमातून शैक्षणिक साधनांसाठी ५,२३,००० प्राथमिक शाळांना आणि १,२७,००० उच्च प्राथमिक शाळांना निधी पुरविला जातो. एकशिक्षकी प्राथमिक शाळांकरिता १,५०,००० शिक्षकांची भरती या मोहिमेअंतर्गत करण्यात आली, ७६,००० शिक्षक उच्च प्राथमिक शाळेसाठी आणि ८३,००० शिक्षकांची पदे भरण्यात आली.

जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प (DPEP) (District Primary Education Programme) १९९४ :-

या प्रकल्पाची स्थापना १९९३-९४ मध्ये करण्यात आली यासाठी जागतिक बँक, (युरोपियन आयोग), आंतरराष्ट्रीय विकास विभाग, (युनायटेड किंगडम, नेदरलँड), युनिसेफ यांच्या साहाय्याने याची स्थापना करण्यात आली. या प्रकल्पाला युनिसेफचे आर्थिक साहाय्य लाभले आहे. या प्रकल्पाचा उद्देश शिक्षणाचे जागतिकीकरण करणे असे ज्या राज्यात स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी आहे तेथे सर्वशिक्षा अभियान सार्वत्रिकीकरणास सुरु केल्यामुळे जागतिकीकरणास आवश्यक वातावरण लाभत आहे. शिक्षाकर्मी आणि लोकजंबी प्रकल्पाच्या माध्यमातून राजस्थानमध्ये पायाभूत शिक्षण पुरविले जात आहे. या दोन्ही प्रकारच्या प्रकल्पाद्वारे जागतिकीकरणाचा उद्देश दूर्गम भागात आणि अदिवासी भागात बऱ्याचशा प्रमाणात साध्य होत आहे. उद्देश साध्य करण्यास या प्रकल्पात बरेचशे अडथळे निर्माण होत आहेत त्यामध्ये शिक्षकांची अनुपस्थिती, मुलांची गळती, बालकामगार, नीरस अध्यापन पद्धती, शैक्षणिक साधनांचा अभाव, इ.

मध्यप्रदेश, ओरिसा, आसाम, हरयाना, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, व केरळ, या ८ राज्यातील ४३ जिल्ह्यांमध्ये प्राथमिक शाळांच्या इमारतीचे बांधकाम शैक्षणिक साहित्य निर्मिती, शिक्षण प्रशिक्षण यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

मध्यंतराचे जेवण :-

प्राथमिक शिक्षणाचा पोषणविषयक राष्ट्रीय कार्यक्रमाच मध्यतंराचे जेवणाचा कार्यक्रम म्हणतात. हा कार्यक्रम इ.स. १९९५ मध्ये सुरु करण्यात आला. प्राथमिक शिक्षणाच्या जागतिकीकरणाला / सार्वत्रिकीकरणाला आधार देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे ज्यामध्ये पटनोंदणीत वाढ, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या सुदृढतेमध्ये सुधारणा होण्यास मदत झाली. शिजवलेल्या अब्जातून प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये १०० ग्रॅम कॅलरी उर्जा गहू किंवा तांदळाच्या माध्यमातून दिली जाते. या कार्यक्रमाचा श्रेय तामिळनाडू या राज्याला दिला जातो.

सर्वशिक्षा अभियान :-

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी खडू-फळा मोहिम, अनौपचारिक शिक्षण, शालेय पोषण आहार, जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प अशा अनेक

नाविण्यपूर्ण योजना होती घेण्यात आल्या. तरीही सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट्य साध्य होऊ शकले नाही म्हणून भारत सरकारने सर्वशिक्षा मोहिम हा कालबद्ध कार्यक्रम आखला असून या योजनेची कालमर्यादा २०१० अशी ठरविण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि प्राथमिक शिक्षण ही केंद्र आणि राज्य शासनाची महत्त्वाची संयुक्त जबाबदारी आहे. या महत्त्वपूर्ण घटनादुरुस्तीमुळे केंद्रशासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेसाठी सर्व शिक्षा अभियान ही योजना आखली आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टिने अभियानाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) सर्व शिक्षा मोहिमेद्वारे सन २०१० पर्यंत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना उपयुक्त आणि दर्जेदार शिक्षणाची सुविधा पुरविणे.

२) समाजाच्या, वस्तीच्या आणि स्थानिक लोकांच्या शालेय व्यवस्थापनातील सक्रीय सहभागाद्वारे सामाजिक, प्रादेशिक आणि लिंगभेदभाव कमी करणे.

३) इ.स. २००३ पूर्वी ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले शाळेत शिक्षण हमी केंद्रात, पर्यायी शाळेत अथवा शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.

४) इ.स. २००७ पूर्वी सर्व मुलांना ५ वर्षाचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे.

५) इ.स. २०१० पूर्वी सर्व मुलांना ८ वर्षाचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे.

६) समाधानकारक, दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठीच्या शिक्षणावर भर देणे.

७) इ.स. २००७ पूर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरावरील उणीवा दूर करुन सामाजिक तसेच लिंगभेद दूर करण्यात येतील. लिंगभेद व समाजाच्या विविध घटकातील दरी इत्यादी सन २००७ पर्यंत भरून काढणे आणि इ.स. २०१० पर्यंत प्राथमिक शिक्षणाची समान पातळी निर्माण करणे.

८) इ.स. २०१० पर्यंत सर्व मुलामुलींना शाळेत टिकवून ठेवणे.

अनौपचारिक शिक्षण :-

६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना शाळेत दाखल करणे व त्यांना प्राथमिक शाळेत टिकविणे हे शासनाने व आपण सर्वांनी ठरविले आहे. पण प्राथमिक स्तरावर १००% पटनोंदणीचे उद्दिष्ट आपण साध्य करु शकलो नाही. त्याची कारणे अनेक आहेत. ६ ते १४ वर्षे वयोगटातील ३० ते ३५ लाख मुले अजूनही शाळेबाहेर आहेत. अशा शालाबाह्य मुलांसाठी अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग, स्ववेळ शाळा, वस्तीशाळा, शिक्षण हमी योजना इ. योजना शासनाने हाती घेतल्या आहेत. थोडक्यात ही मुले शाळेकडे आली नाहीत, तर शाळेने त्यांच्या सोयीच्या वेळेस, सोयीच्या ठिकाणी जावे, त्यांना त्याच्या सवडीने शिकवावे अशी भूमिका त्यामागे आहे. सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट्य केवळ मुलांना औपचारिक शाळेतच दाखल केल्याने साध्य होईल असे नाही तर अनौपचारिक शाळेतच दाखल केल्याने साध्य होईल असे नाही तर अनौपचारिक शिक्षण देऊन त्यांना प्राथमिक शिक्षणाची संधी दिली पाहिजे. यातूनच काही नव्या योजना, प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत.

दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) :-

प्राथमिक शिक्षणाच्या इ.स. २०१० पर्यंत जागतिकीकरण (सार्वत्रिकीकरण) करण्याचे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन दहावी पंचवार्षिक योजना बनविलेली आहे. प्राथमिक शिक्षणामधील पटनोंदणी वाढविण्यासाठी मुलांचे प्रमाण १:१२ टक्के व मुलींचे प्रमाण ४:१६ टक्के अशी वाढ झाली पाहिजे. उच्च प्राथमिक स्तरावर पटनोंदणी वाढविण्यासाठी मुलांचे प्रमाण ४:६२% व मुलींचे प्रमाण ८.०३% आवश्यक आहे.

पायाभूत (प्राथमिक) शिक्षणाबाबतीत दहाव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्य – सार्वत्रिक दृष्टिकोन :-

- ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा ह्या घरापासून जवळ म्हणजेच घरापासून चालत जाणे शक्य व्हावे एवढ्या अंतरावर असाव्यात.
- ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांचा शिक्षण केंद्र आणि आरागय केंद्राद्वारे शिक्षण विषयक जागतिक दृष्टिकोन वाढवावा.
- उच्च प्राथमिक शाळेतील सोयी सुविधा आवश्यकतेनुसार असाव्यात. दोन प्राथमिक शाळेपैकी किमान एक शाळा उच्च प्राथमिक असावी.
- प्राथमिक शिक्षणातील भौतिक सुविधामध्ये शाळेची इमारत, स्वच्छालय, पिण्याचे पाणी, वीज, खेळाचे मैदान, फळा, आणि अन्य सुविधा इ. असाव्यात. प्राथमिक स्तरावर एका वर्गासाठी एका शिक्षणाची नियुक्ती करावी.

पटनोंदणी :-

- सर्व विद्यार्थ्यांसाठी पटनोंदणी.
- इ.स. २००७ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिक्षणातील ५ वर्षे पूर्ण केली पाहिजेत.

गृहीतके :-

- इ.स. २००७ पर्यंत प्राथमिक शिक्षणाची गृहीतके पूर्ण झाली पाहिजेत.
- इ.स. २००७ पर्यंत प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण (इयत्ता ६वी ते ८वी) १० टक्क्यांनी कमी झाले पाहिजे.

फलश्रुती (साध्य करणे) :-

- पायाभूत (प्राथमिक) स्तरावर, साक्षरता, विविध कौशल्यामध्ये अध्ययन-अनुभूती साधली जात आहे.
- अनुसूचित जाती / जमाती, बालकामगार, अल्पसंख्यांक मुले, दारिद्य रेषेखालील मुले, स्थलांतरित मुले इ. साठी शिक्षणविषयक खास योजना राबविण्यात आल्या.

तुमची प्रगती तपासा :-

१. खालील विधाने पूर्ण करा.

१) विद्यार्थ्यांचा पौष्टिक दर्जा सुधारण्यासाठी इ.स. १९९५ मध्ये _____ ही योजना सुरु करण्यात आली.

२) जि. प्रा. शि. प्र. (DPEP) म्हणजे _____.

३) सर्वशिक्षा अभियानाची सुरुवात इ.स. _____ च्या शेवटी झाली.

२. टीपा लिहा.

१) सर्वशिक्षा अभियानाची उद्दिष्ट्ये.

२) दहावी पंचवार्षिक योजना.

३) मध्यंतराच्या जेवणाचे महत्त्व

४) पायाभूत शिक्षणाच्या दर्जा सुधारण्यासाठी सद्यस्थितीचे टिकात्मक मूल्यमापन करा.

_____

_____

_____

_____

_____

३.६ अनिवार्य प्राथमिक शिक्षण अमलात आणण्यासाठी येणाऱ्या अडचणी:-

१) प्राथमिक शिक्षणाचा कमी दर्जा.

२) शैक्षणिक संधीमध्ये असमानता.

३) समाजातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे कमी प्रमाण.

४) विशिष्ट वर्गातील गळती व स्थगिती.

५) मुलींच्या पटनोंदणीचे कमी प्रमाण.

६) पालकांची उदासिनता आणि गरीबी.

७) सदोष अभ्यासक्रम (उणीव असलेला अभ्यासक्रम)

८) रटाळ अध्यापन पद्धती.

९) शैक्षणिक साधनांचा अभाव.

१०) शिक्षक नियुक्त्यांमध्ये पारदर्शकतेच्या अभाव.

११) अपुरे, अर्धवट प्रशिक्षण मिळालेले प्रशिक्षणार्थी.

१२) स्थगिती व गळती कमी करण्यात आलेले अपयश.

१३) सर्वच घटकांमध्ये मिशनरी वृत्तीचा अभाव.

१४) शिक्षकांच्या वारंवार होणाहया बदल्या.

१५) पटनोंदणी वाढविण्यात आलेले अपयश.

१६) अनाकर्षक आणि अपुऱ्या वर्गखोल्यांच्या शालेय इमारती.

१७) विद्यार्थ्यांचा कुपोशिस्तपणा.

१८) मोठ्या प्रमाणात अपुऱ्या प्राथमिक शाळांचे अस्तित्त्व.

१९) लोकसंख्या विस्फोट.

सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी खालील तीन आव्हाने सांगता येतील.

१) शिक्षणापासून वंचित असणाऱ्या व सामाजिक घटकांतील सर्व लोकांपर्यंत पायाभूत (प्राथमिक) शिक्षण पोहचविणे.

२) अध्ययन – अध्यापनामध्ये दर्जात्मक सुधारणा करणे.

३) प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे.

३.७ पायाभूत (प्राथमिक) शिक्षणाचे मूल्यमापन :-

इ.स. १९५०-५१ मध्ये पायाभूत (प्राथमिक) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फक्त ३२% होते. परंतु आज त्यामध्ये अमुलाग्र बदल होऊन ती संख्या ८०% पर्यंत पोहचली आहे. इ.स. १९४७ पासून साक्षरता आणि हे पायाभूत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे राष्ट्राचे उद्दिष्ट्ये बनले आहे. भारतीय राज्यघटनेने १४ वर्षे वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची तरतूद केलेली आहे.

प्राथमिक शिक्षणाचा विस्तार :-

स्वातंत्र्यापासून प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारामध्ये बरीच प्रगती झाली आहे. प्राथमिक शाळांचे प्रमाण १५ पटीने वाढले. प्राथमिक स्तरावरील पटनोंदणी ५.९ पट वाढली. मुलीचे शिक्षणातील प्रमाण ९.५ पट वाढले. पायाभूत शिक्षणाचे खऱ्या अर्थाने सार्वत्रिकीकरण हे उद्दिष्ट्ये साध्य करावयाचे असेल तर केवळ संख्यात्मक वाढीकडे लक्ष न देता गुणात्मक वाढीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

पायाभूत स्तरावर दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी काही बाबतीत सुधारणा होणे आवश्यक आहे. जसे कृतीशील शिक्षण, प्रोत्साहन, शिक्षकांची नियुक्ती, सुधारित पाठ्यपुस्तके आणि इमारतीच्या सोयीसुविधा तसेच शिक्षण हे समाजातील गरजानुसार दिले जावे. प्राथमिक शिक्षण ही राज्यशासानातील जिल्हा स्तरीय व तालुकास्तरावरील शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे.

अशाप्रकारे आपण असे म्हणू शकतो की, भारतातील पायाभूत शिक्षण यशस्वी झाले तर संपूर्ण तरुण पिढीचे विविध कौशल्य, उत्पादन क्षमता, जन्मप्रमाण, दारिद्र्य, इ. मध्ये नक्कीच सुधारणा होईल. एवढेच नव्हे तर समाजातील जाती, धर्म, लिग यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल.

३.८ एकशिक्षकी शाळा :-

एकशिक्षकी शाळा पद्धत ही भारतातील सर्वात जूनी शिक्षण पद्धती आहे. छोट्या गावी एका वर्गात ४० विद्यार्थी असतात आणि शैक्षणिक विभागाच्या कायद्यानुसार विद्यार्थी संख्येनुसारच शिक्षकाची नेमणूक करण्यात येते. शक्यतो ही परिस्थिती प्राथमिक स्तरावर आढळते (इयत्ता १ली ते ५ वी).

पण इ.स. १९२१ पर्यंत एक शिक्षकी शाळेचा दर्जा खालावला गेला कारण एका शिक्षकाने एका वेळी अनेक वर्ग हाताळणे शक्य नसे. परंतु स्वातंत्र्यानंतर सक्तीचे प्राथमिक केल्यामुळे एकशिक्षकी शाळांमध्ये वाढ झाली.

एकशिक्षकी शाळांच्या समस्या :-

१) शिक्षकांच्या नेहमी होणाऱ्या बदल्या त्यामुळे शिक्षकांना अशा शाळांमध्ये काम करण्यास इच्छा नव्हती.

२) रजेची मान्यता :- शिक्षक रजेवर असताना एखादी शाळा बंद असते.

३) प्रशिक्षण केंद्र :- एकशिक्षकी शाळांमधील शिक्षकांना अशा प्रकारची प्रशिक्षण केंद्रे सुविधा पुरवित नाहीत कारण त्यांना एकावेळी अनेक कौशल्ये शिकवावी लागतात म्हणून त्यांच्या अध्ययनात समस्या (अडथळे) निर्माण होतात.

४) अपुऱ्या सोयी सुविधा

५) अभ्यासक्रम पूर्ण करणे अशक्य होते.

६) कधी-कधी एकावेळी अनेक वर्ग एकत्रित करुन अध्यापन करावे लागते.

वरील समस्यांमध्ये सुधारणा केली पाहिजे शासनाने चांगल्या योजना राबविल्या तर वरील समस्यांवर मात करता येते.

एका शिक्षकी शाळेचे काही चांगले सुद्धा परिणाम आपल्याला दिसून येतात ते असे की शिक्षक हा गावातील विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांकडे जातीने लक्ष देऊ शकतात. शिक्षकाची त्या विद्यार्थ्यांसोबत वागणूक कुटुंबप्रमुख किंवा पालकांप्रमाणे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरीक व बौद्धिक विकास होण्यास मदत होते. आपल्या कृषीप्रधान देशामध्ये अशा प्रकारच्या शाळा असणे आवश्यक आहे.

तुमची प्रगती तपासा :-

१) शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी त्यातील आव्हानाविषयी व सुधारणाविषयी माहिती लिहा.

२) एकशिक्षकी शाळेची संकल्पना स्पष्ट करा.

३) प्राथमिक शिक्षणाच्या यशस्वितेसंबंधी मूल्यमापन करा.

_____

_____

_____

_____

३.९ सारांश :-

प्राथमिक आणि उच्च प्राथमिक म्हणजे पायाभूत शिक्षणाच्या महत्त्वविषयी माहिती मिळवली. स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतीय शिक्षणपद्धतीचा ऐतिहासिक विकास बघितला. राज्यघटनेच्या धोरणानुसार ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी १००% प्रयत्न करण्यात आले. आपण प्राथमिक शिक्षणाच्या सद्यस्थितीविषयी अभ्यास केला. शेवटी एकशिक्षकी शाळेचे महत्त्व त्यातील समस्या आणि आजच्या युगातही त्याची गरज अभ्यासली.

३.१० प्रश्न :-

१) पायाभूत शिक्षण म्हणजे काय ? राष्ट्रच्या विकासासाठी त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

२) प्राथमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

३) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले ?

४) महत्त्व स्पष्ट करा.

अ) खडू-फळा मोहिम

ब) सर्वशिक्षा अभियान

५) दहाव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

६) एक शिक्षणी शाळेचे महत्त्व काय आहे ?

७) पायाभूत शिक्षण अंमलात आणण्यासाठी येणारे अडथळे कोणते आहेत ?

❖❖❖❖

४

भारतातील माध्यमिक शिक्षणाचा ऐतिहासिक विकास

घटकाचे स्वरुप :-

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये

४.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास

४.४ स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास

४.५ सारांश

४.६ प्रश्न

४.१ प्रस्तावना :-

माध्यमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण यांना जोडणारा दुवा आहे. उच्च शिक्षणाचा पाया माध्यमिक शिक्षणामुळेच घातला जातो. मानसशास्त्रीयदृष्ट्या माध्यमिक शिक्षणाच्या काळात विद्यार्थी कुमारावस्थेतअसतो. हा काळ विद्यार्थ्यांच्या दृष्टीने वादळी अशांततेचा काळ असतो. हा काळ विद्यार्थ्यांच्या दृष्टीने वादळी अशांततेचा काळ असतो. याच काळात विद्यार्थ्यांचे आयुष्यातील विविध गोष्टींकडे बघण्याचे दृष्टिकोनही तयार होत असतात. संपूर्ण आयुष्यासाठी लागणारी विविध कौशल्य विद्यार्थी याच काळात आत्मसात करीत असतात. या सर्व गोष्टींमुळेच माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

माध्यमिक शिक्षणाच्या व्याख्या :-

१) "माध्यमिक शिक्षण म्हणजे कुमारावस्थेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिले जाणारे सर्वसामान्य तांत्रिक, व्यावसायिक अगर विशेष शिक्षण होय." - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ (कायदा क्र XLI, १९६५)

२) "प्राथमिक शिक्षण आणि विद्यापीठीय शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. - रेना फॉय."

३) "प्राथमिक शिक्षणानंतर लगेच दिले जाणारे आणि भारतीय कायद्यान्वये निर्माण झालेल्या विद्यापीठांकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या शिक्षणापूर्वी मिळणारे शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण होय." - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, कायदा क्र XLI, १९६५)

४) "भावनात्मकदृष्ट्या बाल्यावस्थेतील प्रेम आणि प्रौदत्वातील सभ्यता यांच्यामधील स्फोटक व अस्थिर असा कुमारावस्थेचा काळ म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा काळ होय." - रेना फॉय.

वरील व्याख्यांचे विश्लेषण केल्यास आपल्याला माध्यमिक शिक्षणाबाबत खालील बाबी लक्षात येतात.

१) माध्यमिक शिक्षणातून कुमारावस्थेच्या सर्वसामान्य तांत्रिक, व्यावसायिक अगर विशेष गरजा पुऱ्या झाल्या पाहिजेत.

२) याच काळात विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अचूकता आणि संघटन निर्माण झाले पाहिजे.

३) माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास समाजात प्रभावीपणे वापरता आले पाहिजे.

४) ज्यांना पुढे उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांचीही तयारी माध्यमिक शिक्षणाद्वारे झाली पाहिजे.

४.२ माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. लोकशाही नागरिकत्व, उत्पादनक्षमतेचा विकास, सांस्कृतिक पुनरुज्जीवन या देशापुढील महत्त्वाच्या गरजा विचारात घेऊन मुदलियार आयोगाने माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.

२) व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास करणे.

३) व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास साधणे.

४) नेतृत्व विकास करणे.

त्यानंतर १९६४ साली स्थापन केलेल्या कोठारी आयोगाने शिक्षणाचा राष्ट्रीय विकासाशी संबंध जोडतना संपूर्ण शिक्षण प्रक्रियेच्या संदर्भात बदलती परिस्थिती लक्षात घेऊन माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्य पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) शिक्षणाद्वारे आधुनिकीकरणाची गती वाढविणे.

२) शिक्षणातून उत्पादनक्षमता वाढविणे.

३) शिक्षणातून सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता साधणे.

४) शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांवर सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे.

माध्यमिक शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) जीवन जगण्यास आवश्यक ती ज्ञानसाधना करणे. एखाद्या अवगत कलेत हस्तकौशल्य प्राप्त करणे.

२) उत्पादक व्यवसायाची निवड करुन त्याद्वारे उत्पादनक्षमतेचा विकास घडवून आणणे.

३) श्रमप्रतिष्ठा, समाजसेवा, विज्ञान आवड या गुणांचा विद्यार्थ्यांमध्ये परिपोष करणे.

४) विद्यार्थ्यांचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे.

५) नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन देणे.

६) सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करणे व संस्कृती संवर्धन करणे.

७) स्वयंअध्ययनाची सवय व कौशल्य संपादित करणे.

८) जीवनातील वास्तवता लक्षात घेऊन सभोवतालच्या कार्यजगाची ओळख करुन देणे.

९) सभोवतालच्या परिसराचे ज्ञान करुन देऊन त्यांना समाजाभिमुख बनविणे.

१०) जाती, धर्म, पंथ, भाषा या मर्यादित कल्पनाहून श्रेष्ठ अशा राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व लोकशाही मूल्यांद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगी बाणविणे.

४.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास :-

आजच्या माध्यमिक शिक्षणामध्ये ज्या काही चांगल्या बाबी व उणिवा दिसून येत आहेत. यामागे स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजतागायत या संदर्भात ज्या विविध घटना घडून आल्या आहेत. त्या प्रामुख्याने जबाबदार असलेल्या दिसून येतात. त्यामुळे येथे भारतातील माध्यमिक शिक्षणाच्या इतिहासातील प्रमुख घटनांची नोंद करणे हे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्यपूर्व काळ :-

भारतात इंग्रज येण्यापूर्वी भारतामध्ये औपचारिकरित्या माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था अस्तित्वात नव्हती. त्यावेळी प्रामुख्याने सर्वत्र मक्ताब व पाठशाळा अस्तित्त्वात होत्या. आजच्या माध्यमिक शिक्षणाची सुरुवात खऱ्या अर्थाने एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस तत्कालीन शिक्षणपद्धतीचे ब्रिटीश सरकारने जे सर्वेक्षण केले त्यावेळेपासून झाली. माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक वाटचाल समजून घेण्यासाठ आपणास खालील घटना लक्षात घेतल्या पहिजेत.

१) वूडचा खलिता :-

इ.स. १९५४ साली वूडचा खलिता जाहिर झाला. या खलित्यामुळे भारतात माध्यमिक शिक्षणाच्या विकासास अधिकच प्रेरणा मिळाली वूडच्या खलित्यामधील शिफारशीनुसार प्रत्येक राज्यात शिक्षण विभागाची स्थापना झाली. या खलित्यामधील शिफारशीनुसारच भारतात सन १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास व मुंबई या ठिकाणी विद्यापीठाची स्थापना झाली. वूडच्या खलित्यामध्ये मोठ्या प्रमाणात माध्यमिक शाळांची स्थापना करण्यात यावी अशीही शिफारस होती. मात्र माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, कालमर्यादा व व्याप्ती ठरविण्याचा अधिकार विद्यापीठांना अभ्यासक्रम, कालमर्यादा व व्याप्ती ठरविण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आल्याने माध्यमिक शिक्षण हे स्वयंपूर्ण होण्याऐवजी विद्यापीठीय शिक्षणाकडे नेणाा कालखंड असे त्याला दुय्यम स्थान प्राप्त झाले. अगदी अलीकडील काळापर्यंतही या शिक्षणाला 'दुय्यम शिक्षण' असे संबोधले जात असे.

सन १८५४ ते १८८२ या कालावधीत मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम या बाबींकडे दुर्लक्ष झाले. माध्यमिक शिक्षणाचे अभ्यासक्रम पुस्तकी व जीवनाशी प्रत्यक्ष संबंध नसणारे असे

निश्चित करण्यात आले. त्यामध्ये व्यावसायिक व तांत्रिक विषयाचा समावेश केला गेला नाही. त्यामुळे हे शिक्षण स्वयंपूर्ण होऊ शकले नाही. या काळात मात्र माध्यमिक शिक्षणाचा विस्तार व्हावा म्हणून साहाय्यक अनुदानाची प्रथा अस्तित्त्वात आणली गेली. सन १८८२ पर्यंत भारतात माध्यमिक शाळांची संख्या ३९१६ इतकी वाढली गेली.

२) भारतीय विद्यापीठ आयोग :-

शिक्षणातील दोष घालविण्यासाठी सन १८८२ मध्ये हंटर कमीशनची स्थापना करण्यात आली. या कमीशनने माध्यमिक शिक्षणाबाबत तीन महत्त्वाच्या शिफारशी केल्या होत्या. माध्यमिक शिक्षण स्तरावर विविधतापूर्ण अभ्यासक्रमाची सोय करावी. सरकारने माध्यमिक शाळा चालविण्याची जबाबदारी न घेता त्या चालविण्यासाठी साहाय्यक अनुदान द्यावे सरकारने फक्त प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी आणि माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी खाजगी शिक्षण संस्थावर सोपवावी. परंतू दुर्देवाने या चांगल्या शिफारशींची त्यावेळी सरकारने अथवा खाजगी शिक्षणसंस्थांनी दखल घेतली नाही. त्यामुळे या चांगल्या शिफारशी अमलात येऊ शकल्या नाहीत. स्वातंत्र्योनंतर मुदलियार व कोठारी आयोगाने माध्यमिक स्तरावर विविधता पूर्ण अभ्यासक्रमाची शिफारस केलेली होती. या गोष्टी पाहता हंटर आयोगाची अभ्यासक्रमाबाबतची सूचना किती महत्त्वाची होती हे समजून येते. साहाय्यक अनुदानाची शिफारस तर माध्यमिक शिक्षणाच्या विकासाची मुहूर्तमेढच होती. या काळात माध्यमिक शिक्षणाचा विस्तारत चालूच होता. सन १९०२ पर्यंत भारतात माध्यमिक शाळांची संख्या ५१२४ इतकी झाली होती.

भारतीय विद्यापीठ कायदा (१९०४) अन्वये विद्यापीठांना माध्यमिक शाळांना मंजूरी देण्याचे व आपल्या कक्षेत माध्यमिक शाळा स्थापन करण्याचे अधिकार देण्यात आले. यामुळे ज्या माध्यमिक शाळांना विद्यापीठाची मान्यता नाही अशा माध्यमिक शाळा बंद झाल्या. तसेच याचा आणखी एक जो परिणाम झाला तो म्हणजे माध्यमिक शिक्षणाला स्वयंपूर्णता प्राप्त होण्याऐवजी त्याला आणखीच दुय्यम स्थान प्राप्त झाले.

कलकत्ता विद्यापीठ आयोग - १९१७ :-

कलकत्ता विद्यापीठ आयोगाची स्थापन 'सॅडरलर' यांनी केल्यामुळे याला 'सॅडरलर कमिशन' असेही म्हणतात. १९१७ साली नेमलेल्या कलकत्ता विद्यापीठ आयोगाने माध्यमिक शिक्षणातील दोषांचा विचार करुन या संदर्भात काही प्रमुख शिफारशी केल्या. त्या पुढीलप्रमाणे :

१) मॅट्रीकऐवजी इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश मिळावा.

२) इंटरमीजिएट कॉलेज या नावाची एक स्वतंत्र संस्था स्थापना करुन ती काही निवडक शाळांना जोडावी.

३) माध्यमिक स्तरावर बहुमुखी अभ्यासक्रमाची सोय करण्यात यावी.

४) समाजाच्या नव्या गरजा लक्षात घेऊन माध्यमिक शाळा व इंटरमीजिएट स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात यावी.

भारतातील बऱ्याच विद्यापीठांनी या आयोगाच्या शिफारशीची अमलबजावणी केली. बऱ्याच प्रांतामध्ये माध्यमिक शिक्षण व इंटरमीजिएट शिक्षणासाठी स्वतंत्र मंडळे स्थापन झाली. मोठ्या संख्येने इंटरमीजिएट कॉलेजस स्थापन झाली.

माउंटफोर्डच्या सुधारणापासून (१९२१) स्वातंत्र्यापर्यंत (१९४७) :-

हर्टाग समिती (१९२९) :-

सन १९२९ मध्ये नेमलेल्या हॅर्टाग समितीने हंटर कमिशनने केलेली बहुमुखी अभ्यासक्रमाची शिफारस पुन्हा एकदा उचलून धरली. इयत्ता आठवीनंतर विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम निवडता येण्याची तरतूद माध्यमिक शिक्षणात असावी असे मत या समितीने मांडले.

सप्रू समिती (१९३४) :-

सन १९३४ मधील सप्रू समिती म्हणजे माध्यमिक शिक्षणाच्या इतिहासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा होय. या समितीने माध्यमिक स्तरावर विविधांगी अभ्यासक्रमाची सोय करण्यात यावी असे सांगितले. इंटरमीजिएट स्तर नाहीसा करुन माध्यमिक शिक्षणाचा कालावधी एक वर्षाने वाढविण्यात यावा. एकूण शालेय स्तर ११ वर्षाचे असावे, त्यामध्ये ५ वर्षाचे प्राथमिक शिक्षण आणि ६ वर्षाचे माध्यमिक शिक्षण असावे. (३ वर्षे निम्न माध्यमिक व ३ वर्षे उच्च माध्यमिक) निम्न माध्यमिक शिक्षणापर्यंतचा एकूण कालावधी हा ८ वर्षाचा असावा. निम्न माध्यमिक शिक्षणानंतर म्हणजे इयत्ता ९ वी पासून मुलांना व्यावसायिक शिक्षण दिले जावे. पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम हा तीन वर्षाचा असावा. अशा बहुमुल्य शिफारशी केल्या. परंतु दुर्देवाने या चांगल्या शिफारशी अमलात न आणल्या गेल्याने सर्व परिस्थिती पूर्ववतच राहिली.

ॲबॉट व वूड समिती (१९३६-३७) :-

सन १९३६-३७ मध्ये ॲबॉट व वूड या दोन तज्ज्ञांना ब्रिटिश सरकारने शिक्षणाची पुनर्रचना आणि विशेषतः व्यावसायिक शिक्षणातील समस्या संदर्भात सल्ला देण्यासाठी निमंत्रित केले. या समितीने सर्वसाधारण शिक्षण देणाऱ्या संस्थाना समांतर अशी विविध स्तरांवर व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करण्यात यावी. अशी शिफारस केली. या शिफारशीचा परिणाम म्हणून तंत्रनिकतने (Polytechniques) तसेच तांत्रिक, कृषी व वाणिज्य विद्यालये अस्तित्त्वात आली. यामुळे व्यावसायिक शिक्षणाला थोडीफार प्रतिष्ठा प्राप्त झाली.

सार्जंट अहवाल (१९४४) :-

इ.स. १९४४ मध्ये सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील शैक्षणिक विकासासंदर्भात अहवाल सादर केला माध्यमिक शिक्षणांसंदर्भात या आयोगाने केलेल्या प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१) माध्यमिक शिक्षणाचा कालावधी हा सहा वर्षाचा असावा या स्तरांवरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे वय ११ वर्षे असावे.
२) शैक्षणिक व व्यावसायिक अशी दोन प्रकारची विद्यालये असावीत.
३) माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना निवड तत्त्वाच्या आधारे प्रवेश देण्यात यावा.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारने फक्त विविध समित्या नेमून त्यांचे अहवाल प्रसिद्ध केले. मात्र या अहवालात केलेल्या शिफारशी आमलात आणण्याचे कसोशीने प्रयत्न केले नाहीत. किंबहुना त्यांना भारतातील शिक्षणाचा विकास होऊ द्यायचा नव्हता. जर विविध समित्यांच्या आणि विशेषत: हंटर कमीशनच्या शिफारशी अंमलात आणल्या गेल्या असत्या तर स्वातंत्र्यपूर्व काळातच माध्यमिक शिक्षणाचे स्वरुप पालटले गेले असते. मात्र तसे झाले नाही.

४.४ स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विस्तार :-

सन १९४७ मध्ये भारतात एकूण १२,६९३ एवढ्या माध्यमिक शाळा होत्या व त्यात अंदाजे ३० लाख विद्यार्थी शिक्षण घेत होते. ही वाढ सहजासहजी झालेली नव्हती. जनतेमधील जागृती व माध्यमिक शिक्षणाचे आकर्षण ही या प्रगतीमागील कारणे होती.

स्वांतत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न काही महत्त्वाच्या समित्यांनी हाताळला. त्यामध्ये सुरुवातीच्या व अलीकडच्या काळातील महत्त्वाच्या समित्या व आयोग पुढीलप्रमाणे :

१) ताराचंद समिती (१९४८)
२) डॉ. राधाकृष्णन् आयोग (१९४८)
३) मुदलियार आयोग (१९५२-५३)
४) कोठारी आयोग (१९६४-६६)
५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९६८)
६) ईश्वरभाई पटेल समिती (१९७७)
७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)
८) शालेय शिक्षण-राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा समिती (२००१)

ताराचंद समिती (१९४८) :-

स्वातंत्र्योत्तर लगेचच सन् १९४८ मध्ये नेमलेल्या ताराचंद समितीने सध्याच्या माध्यमिक शाळांबरोबरच बहुउद्देशीय शाळा स्थापन केल्या जाव्यात तसेच पब्लीक स्कुलची पद्धती विकसित करण्यात यावी अशा शिफारशी केल्या.

माध्यमिक शिक्षण आयोग किंवा मुदलियार शिक्षण आयोग (१९५२-५३) :-

केंद्रीय सल्लागार मंडळाच्या जानेवारी १९४८ रोजी झालेल्या बैठकीत माध्यमिक शिक्षणविषयक विचार करण्यास आणि त्याच्या समस्या सोडविण्यास भारत सरकारकडे स्वतंत्र आयोग स्थापन करण्यासाठी मागणी करण्यात आली. त्यात माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये व कार्य करण्यासाठी आयोग नेमण्याची विनंती केली. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. विद्यापीठीय शिक्षण आयोगाने आपल्या अहवालात म्हटले होते की, उच्च शिक्षणाच्या विकासासाठी, माध्यमिक शिक्षणाची पुर्नरचना करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु केंद्रीय शिक्षण

सल्लागार मंडळाच्या १९४८ रोजी केलेल्या विचारांची दखल घेण्यात आली नाही. म्हणून इ.स. १९५१ रोजी पुन्हा माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन करण्याविषयी विचार विनिमय करण्यात आला. यावेळी मात्र केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या सूचनेच्या विचार करुन भारत सरकारने २३ सप्टेंबर १९५२ मध्ये मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अलादी लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांचे अध्यक्षतेखाली 'माध्यमिक शिक्षण आयोगा'ची स्थापना करण्यात आली. त्यांच्या नावावरुनच हे आयोग 'मुदलियार शिक्षण आयोग' म्हणून नावारुपास आले आहे.

माध्यमिक शिक्षण आयोगाने माध्यमिक शिक्षण विषयक पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

१) तीन वर्षाचे माध्यमिक व चार वर्षाचे उच्च माध्यमिक शिक्षण द्यावे.
२) पदवी अभ्यासक्रम तीन वर्षाचा करावा.
३) बहुउद्देशीय शाळांची स्थापना करावी.
४) विद्यानिकेतने सुरु करावीत.
५) अध्यापनाचे माध्यम मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा करावे.
६) शिक्षणामध्ये कृतियुक्त पद्धतीचा अवलंब करावा.
७) प्रशिक्षित मार्गदर्शन अधिकारी व समुपदेशक नेमावे.
८) विद्यार्थ्यांचा संकलित अभिलेख ठेवणे.
९) सेवाशर्तीमध्ये सुधारणा कराव्यात.
१०) प्रत्येक राज्यात माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करावे.

मुदलियार आयोगाने माध्यमिक शिक्षणाच्या आकृतिबंधाविषयी खालील शिफारशी मांडल्या.

१) माध्यमिक शिक्षणाचा कार्यकाल सहा वर्षाचा करावा.
२) माध्यमिक शिक्षणानंतर तांत्रिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु कराव्यात.
३) सार्वजनिक शाळा स्थापन कराव्यात.
४) माध्यमिक शिक्षण ११ ते १७ वयांच्या मुलांसाठी असावे.
५) माध्यमिक शिक्षणाचे दोन स्तर करावे.
६) पदवी अभ्यासक्रम तीन वर्षाचा करावा.
७) निवासी शाळा स्थापन कराव्यात.
८) मुलींच्या स्वतंत्र शाळा असाव्यात.
९) बहुउद्देशीय शाळांची स्थापना करावी.
१०) समस्याप्रधान मुलांसाठी स्वतंत्रशाळा असाव्यात.
११) शिक्षकांची शाळेत पर्याप्त संख्या असावी.
१२) माध्यमिक शाळेत शिष्यवृत्तीची सोय असावी.
१३) ग्रामीण शाळेत शेतकी, लघुउद्योग, कुटीरोद्योग, पशुपालन यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था असावी.
१४) अभ्यासक्रमात इंटरमीजिएटचे एक वर्ष अंतर्भूत असावे.

भारतीय शिक्षण आयोग किंवा कोठारी शिक्षण आयोग (१९६४-६६) :-

भारत सरकारने डॉ. डी. एस. कोठारी यांचे अध्यक्षतेखाली १४ जुलै १९६४ रोजी एका शिक्षण आयोगाची नेमणूक केली. ते त्यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष होते. शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक हे भारतीय शिक्षण आयोगाचे सचिव होते. शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी भारतीय शिक्षण आयोगाची नेमणूक करण्यात आली. आयोगाचे अध्यक्ष डॉ. कोठारी असल्यामुळे या शिक्षण आयोगास 'कोठारी शिक्षण आयोग' असेही म्हणतात. भारताचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता शिक्षणासारखे दुसरे माध्यम नाही. राष्ट्रीय शिक्षणाचा आकृतिबंध, शिक्षणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि सर्व स्तरावर शैक्षणिक विकासाचे धोरण याविषयी शासनास शिफारस करावी अशी शासनाने आयोगाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.

कोठारी आयोगाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

१) शिक्षणाचा प्राथमिक स्तर ७ ते ८ वर्षाचा असावा.

२) पूर्व प्राथमिक शाळांची स्थापना प्रायोगिक तत्वावर करुन ते शिक्षण १ ते ३ वर्षाचे असावे.

३) शिक्षण वयाच्या तीन ते सहा वर्षापर्यंत ऐच्छिक असावे.

४) उच्च माध्यमिक स्तरामध्ये दोन वर्षाचे सामान्य शिक्षण दिले जावे त्यामध्ये एक ते तीन वर्षाचे व्यावसायिक शिक्षणाचा समावेश असावा.

५) गणित व विज्ञान हे विषय सक्तीचे करावे.

६) ११ ते १३ वर्षे वयातील मुलींना (शाळेत न जाणाऱ्या) अंशकालीन शिक्षणाची सोय करावी.

७) प्रत्येक स्त्रोत व जिल्ह्यात पूर्व प्राथमिक शिक्षणाचे विकासकेंद्र सुरु करावे.

८) निम्न प्राथमिकक शिक्षण न घेणाऱ्यांना अंशकालीन स्ववेळ अभ्यासक्रम सुरु करावा.

९) अभ्यासक्रमामध्ये समाजसेवा व समाजविकास कार्य यांची तरतूद करावी.

१०) अदिवासी भागातील शिक्षकांना अधिक पगार देऊन त्याच्या निवासाची व्यवस्था करावी.

अभ्यासक्रम :-

अभ्यासक्रमाबाबत कोठारी आयोगाने पुढीलप्रमाणे शिफारशी मांडल्या.

१) अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणाचा मोठा सहभाग करावा.

२) अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी शाळांची असावी.

३) अभ्यासक्रमात व्यावसायिक अंशवेळ व्यावसायिक शिक्षणाची सोय करावी.

४) अभ्यासक्रम सामान्य व प्रगत पातळ्यावर करावे.

५) शाळासुधार कार्यक्रम राबवावा.

६) वेळापत्रकात नैतिक मूल्याची तरतूद करावी.

७) व्यावसायिक कोर्सेसमध्ये २०% व पूर्व माध्यमिक स्तरावर ५०% पटनोंदणी वाढवावी.

८) अभ्यासक्रमात कार्यानुभावाची व्यवस्था करावी.

शैक्षणिक संधीचा एकसूत्रीपणा :-

- पूर्व माध्यमिक शिक्षण मोफत केले पाहिजे.
- गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण दिले पाहिजे.
- संस्थेचे स्थळ हे नियोजनाद्वारे निश्चित झाले पाहिजे.
- मार्गदर्शन आणि निरीक्षण हे सक्तीचे केले पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसूदा (१९७९) :-

- १२ वर्षे कालावधीचे शालेय शिक्षण.
  - माध्यमिक शिक्षणाची विभागणी व्यावसायिक आणि शैक्षणिक विभागात केली जावी.
- माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण.
  - शिक्षणामध्ये त्रिसूत्री भाषेचा अवलंब केला गेला पाहिजे. यामध्ये प्रादेशिक भाषा, मातृभाषा आणि हिंदी किंवा इंग्रजीचा समावेश असावा.
  - अभ्यासक्रम अशाप्रको निश्चित करावा की जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा व ज्ञानाचा त्यांना भविष्यात उपयोग होईल.

माध्यमिक शिक्षणाचा विस्तार :-

पटनोंदणी (दशलक्षमध्ये) १४ ते १७ वयोगटातील मुलांची टक्केवारी

वर्ष	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण
१९५०-५१	१.०२	०.९	१.२१	८.८	१.७	५.४
१९५५-५६	१.६५	०.३३	१.९८	१३.०	२.८	८.०
१९६०-६१	२.४७	०.५६	३.०३	१७.५	४.३	११.१
१९६५-६६	४.०८	१.२०	५.२८	२५.६	७.९	१७.०
१९६८-६९	५.०९	१.७४	६.८३	२९.०	१०.०	२०.०
१९७३-७४	६.१६	२.३४	८.५०	३१.०	१२.०	२२.०
१९७८-७९	८.०४	३.१७	११.२१	३६.०	१५.०	२६.१
२०००-०१	१०.०४	-	२०.५०	-	४२.००	-

४.५ सारांश :-

१) व्यक्तीच्या जीवनात संपूर्ण शिक्षण पद्धतीमधील माध्यमिक शिक्षण हा महत्त्वाचा टप्पा आहे.

२) माध्यमिक शिक्षणाचा इतिहास ५ काळात विभागला आहे.

अ) ब्रिटिशापासून ते वूड्सच्या खलिता यापर्यंत (१८५४).

ब) वूड्सच्या खलिताया पासून भारतीय विद्यापीठ आयोगापर्यंत.

क) भारतीय विद्यापीठ आयोगापासून माँटफोर्डच्या सुधारणापर्यंत.

ड) स्वातंत्र्यापासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत.

३) माध्यमिक शिक्षणातील समस्या व त्यावर योग्य उपाय करण्याची आवश्यकता.

४.६ प्रश्न :-

१) स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शिक्षणाच्या विकासाबाबत चर्चा करा.

२) माध्यमिक शिक्षणाच्या विकासातील महत्त्वाच्या पैलूंची चर्चा करा.

३) इ.स. १९५१ ते २००१ मधील शैक्षणिक विस्ताराची तुलना करा.

संदर्भ ग्रंथ :-

१) माध्यमिक शिक्षण – डॉ. मोहन जाधव, प्रा. आरती भोसले.

२) भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या – डॉ. के. यु. घोरमोडे.

❖❖❖❖

४अ

उच्च माध्यमिक शिक्षणाचा ऐतिहासिक विकास

घटकाचे स्वरुप :-

४अ.१ उच्च माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

४अ.२ १०+२+३ या आकृतिबंधाचे तत्वज्ञान आणि आवश्यकता

४अ.३ १०+२+३ या आकृतिबंधाचे मुख्य वैशिष्ट्ये

४अ.४ शिक्षणपद्धतीचे फायदे

४अ.५ शिक्षणपद्धतीच्या मर्यादा

४अ.६ प्रश्न

४अ.१ उच्च माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भारतीय शिक्षणपद्धती ही अतिप्राचीन अशी शिक्षणपद्धती आहे. वैदिक काळापासून आजअखेर तिच्या स्वरुपात, आशयात आमूलाग्र बदल झाले आहेत. राष्ट्राची उद्दिष्ट्ये, जनमानसाच्या आशाआकांक्षा व देशातील आव्हाने यातील बदल लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीमध्ये कालानुरुप पुर्नरचना करणे क्रमप्राप्त ठरत असते. तसेच गुणवत्तेच्या दृष्टीने भारतीय शिक्षण इतर कोणत्याही देशांतील शिक्षणापेक्षा कमी ठरणारा नाही हाही विचार पुनर्रचनेत अंतर्भूत असतो. शिक्षणविषयक पुनर्रचनेमध्ये शिक्षणाची उद्दिष्ट्ये, शिक्षणाचा आकृतिबंध, अभ्यासक्रम, मूल्यमापन पद्धती या व अशा इतर महत्त्वाच्या बाबींच्या पुनर्रचनेला महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणविषयक पुनर्रचनेत सर्वप्रथम शिक्षणाच्या उद्दिष्टांना अग्रक्रम द्यावा लागतो. मात्र शिक्षणाच्या उद्दिष्टांचा व ध्येयांचा विचार केल्यानंतर ही ध्येये व उद्दिष्टांचा व ध्येयांचा विचार केल्यानंतर ही ध्येये व उद्दिष्ट्ये किती वर्षात साध्य करावयाची, याचा विचार करावा लागतो. शिक्षणाच्या आकृतिबंधाचा विचार सुरु होतो. उच्च माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट होते.

आकृतिबंधातील बदलांचा ऐतिहासिक मागोवा - कलकत्ता विद्यापीठ आयोग :-

आज संपूर्ण भारतात १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध स्विकारण्यात आला आहे. मात्र याचे मूळ स्वातंत्र्यापूर्वीच्या कलकत्ता विद्यापीठ आयोगाच्या (सॅडलर कमीशन) १९१७-१९ च्या शिफारशीमध्ये आढळते. १०+२+३ या आकृतिबंधाची कल्पना ही या आयोगाची मानली जाते. त्यावेळी १० ते १२ वर्षाचे शालेय शिक्षण पुढे इंटरमीजिएट कॉलेजची दोन वर्षे आणि त्यानंतर पदवी परीक्षेसाठी दोन वर्षे १०/१२+२+३ असा असा आकृतिबंध अस्तित्त्वात होता. शालेय शिक्षण काही ठिकाणी १० वर्षाचे, काही ठिकाणी ११ वर्षाचे व काही ठिकाणी १२ वर्षाचे

होते. शालेय शिक्षणाच्या अखेरीस मॅट्रीक्युलेशनची परीक्षा घेतली जाते. दोन वर्षाच्या इंटमीजिएच्या कोर्सच्या अखेरीसही इंटरमीजिएट परीक्षा सार्वत्रिकरित्या घेतली जात असे. मॅट्रिक्युलेशन, इंटरमीजिएट व पदवीसाठीची परीक्षा विद्यापीठामार्फत घेतली जात असे.

राधाकृष्णन् आयोग (१९४८-४९) :-

स्वातंत्र्यानंतर भारतीय शिक्षणप्रणालीचा विचार करण्यासाठी अनेक आयोग व समित्या नेमल्या गेल्या. सन १९४८ मध्ये नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन आयोगाने पुन्हा एकदा १०+२+३ या आकृतिबंधाची शिफारश केली. शिवाय व्यावसायिक शिक्षणाचीही त्यामध्ये भर घातली. परंतु चर्चेशिवाय काहीही निष्पन्न झाले नाही.

शैक्षणिक आयोग किंवा कोठारी आयोग (१९६४-६६) :-

सन १९६४-६६ च्या कोठारी आयोगाने संपूर्ण शैक्षणिक पुन्हा एकदा अवलोकन केले. शिक्षण व राष्ट्रविकास यात दुवा साधण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाचा एकूण कालावधी व प्रत्येक टप्प्याचा कालावधी याचा प्रत्येक स्तरावर दिल्या जाणाऱ्या शिक्षणाशी जवळचा संबंध आहे आहे हे लक्षात घेऊन संपूर्ण देशासाठी एक समान असा १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध सुचविला.

१० वर्षाचे शालेय शिक्षण ₹ २ वर्षाचे माध्यमिक शिक्षण ₹ ३ वर्षाचे पदवी शिक्षण असा हा आकृतिबंध होता.

कोठारी आयोगाच्या शिफारशीवरुन जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ मध्ये निश्चित करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १९६८ साली एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. या पत्रिकेत पुढील १५ ते २० वर्षाच्या कालावधीसाठी राज्याच्या शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा तयार केला. या आराखड्यावर राज्यभर चर्चा घडवून आणली. त्यानंतर १९७० साली महाराष्ट्र शासनानो महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्रचनेसाठी धोरणविषयक निवेदन प्रसिद्ध केले. त्यातील कलम ५.३ मध्ये असे म्हटले आहे की, "संपूर्ण महाराष्ट्राकरिता विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणाचा एक समान आकृतिबंध असावा. भारतातील सर्व राज्यात १०+२+३ असा इयत्ताक्रम ज्यावेळी सुरु होईल. त्यावेळी महाराष्ट्रातही १०+२+३ असा इयत्ताक्रम सुरु करण्यात येईल."

केंद्रीय सल्लागार मंडळ आणि UGC (United Grants Commssion) यांनी वरील शिफारशींचा अवलंब केला. परंतू फार काळापर्यंत हे टिकू शकले नाही.

४अ.२ नवी शिक्षणपद्धती (१०+२+३) तत्त्वज्ञान आणि आवश्यकता :-

कोठारी आयोगाच्या (१९६४-६६) शिफारशीवरुन सन १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात आले आणि देशातील सर्वच राज्यात शिक्षणाचा एकच समान आकृतिबंध असणे आवश्यक आहे असे स्पष्ट करण्यात आले. काही राज्यात प्रथम पदवीपर्यंतच्या शिक्षणाचा कालावधी १५ वर्षे, काही राज्यात १६ वर्षे तर काही राज्यात १४ वर्षे होता. माध्यमिक शिक्षणाच्या कालावधीतही असमाना होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत होते.

कोठारी आयोगाच्या शिफारशीवरुन (भारतीय शिक्षण आयोग) १९६८ मध्ये जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विकसित झाले त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १९६८ साली एक श्वेतपत्रिका तयार (प्रसिद्ध) केली. त्यामध्ये राज्याच्या शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा देण्यात आला. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विद्यालयीन व महाविद्यालयन शिक्षणाचा एकसमान आकृतिबंध असावा असे उद्‌गार काढले व भारतामधील सर्व राज्यात १०+२+३ हा आकृतिबंध सुरु करण्यात येईल असे सांगितले.

म्हणून २४ ऑगस्ट १९७१ रोजी महाराष्ट्र शासनाने १०+२+३ हा आकृतिबंध तत्त्वतः मान्य केला. आणि १९७२-७३ च्या शैक्षणिक वर्षात ८ वी वर्गास नवीन आकृतिबंध लागू केला. १९७५ मध्ये या आकृतिबंधानुसार पहिली माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) घेतली गेली. सन १९७२ सालापासून चार वर्षाचे प्राथमिक शिक्षण व सहा वर्षाचे माध्यमिक शिक्षण असा दहा वर्षाचा शालेय शिक्षणाचा आकृतिबंध अस्तित्त्वात आला. नव्या आकृतिबंधानुसार माध्यमिक शिक्षणाचे एक वर्ष कमी झाले तसेच महाविद्यालयीन शिक्षणाचा कालावधी १ वर्षाने कमी झाला. व या दोन वर्षाच्या कालावधीला उच्च माध्यमिक शिक्षण असे संबोधण्यात येऊ लागले. या आकृतिबंधानुसार १९७७ साली पहिली उच्च माध्यमिक शालांत परीक्षा घेण्यात आली.

समान आकृतिबंधाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व विभागात समान अभ्यासक्रम तयार झाले व त्यामुळे शैक्षणिक असंतुलन दूर होण्यास मदत झाली.

या आकृतिबंधामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यास मदत होईल त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करण्यास मदत होईल. यामुळे शालेय शिक्षणाला तात्विक बैठक प्राप्त होण्यास मदत होईल. भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये एक समान आकृतिबंध स्विकारला गेल्यामुळे शैक्षणिक कार्यक्रम, पाठ्यपुस्तके, वाचन साहित्य व शैक्षणिक साधनांची निर्मिती, शिक्षकांचे प्रशिक्षण, अभ्यासक्रम पुनर्रचना, आणि परीक्षापद्धतीमध्ये सुधारणा या बाबींची अंमलबजावणी करणे सुलभ होईल.

४अ.३ १०+२+३ या आकृतिबंधाचे मुख्य वैशिष्ट्ये :-

१०+२+३ या आकृतिबंधाचे मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्राथमिक शिक्षणाचा कालावधी १० वर्षाचा असावा त्यामध्ये इयत्ता IX व X ला सामान्य शिक्षण दिले जाते.

२) उच्च माध्यमिक शिक्षण हे इयत्ता ११ वी ते १२ वीचे आहे.

३) १२ वर्षाच्या शैक्षणिक कालावधीनंतर प्रथम पदवीचा कालावधी ३ वर्षाचा.

४) शिक्षणाच्या १५ वर्षानंतर प्रथम पदवी साध्य करणे आवश्यक.

५) यामध्ये विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्र, दोन भाषा आणि कार्यशिक्षण हे विषय अनिवार्य करण्यात आले.

६) इयत्ता X आणि XII च्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाबद्दल आवड निर्माण करणे.

७) इयत्ता X आणि XII च्या विद्यार्थ्यांना विविध कौशल्यावर आधारित शिक्षण देणे.

४अ.४ १०+२+३ या शिक्षणपद्धतीचे फायदे :-

हा आकृतिबंध म्हणजे शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण अशी सुधारणा होय. शैक्षणिक विचारांवर आधारित असा हा आकृतिबंध निश्चितपणे पूर्वी अस्तित्त्वात असलेल्या आकृतिबंधापेक्षा सरस किंबहुना श्रेष्ठ असा आहे. १०+२+३ या आकृतिबंधाचे विविध फायदे पुढीलप्रमाणे :

१) सर्व देशभर समान अशा या आकृतिबंधामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्या गतीस, आदानप्रदानास उत्तेजन मिळून राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्यास मोठी मदत होईल. अशी अपेक्षा आहे.

२) या आकृतिबंधामुळे परिपक्व, अधिक ज्ञानसंपन्न व ज्ञानलालसा असलेल्या मुलांचा विद्यापीठ शिक्षणात प्रवेश होऊ शकेल. त्यामुळे विद्यापीठ शिक्षणाच्या दर्जा निश्चितच सुधारेल.

३) या आकृतिबंधामुळे शालेय शिक्षणाला तात्विक बैठक प्राप्त होऊन शालेय शिक्षणात सुधारणा होऊन त्यास बळकटी प्राप्त होईल.

४) या आकृतिबंधाच्या स्वीकृतीमुळे समृद्ध असे अभ्यासक्रम तयार करावे लागतील. विशेषत: गणित, विज्ञान यांचे प्रगत ज्ञान अभ्यासक्रमात समाविष्ट केले गेल्यामुळे माध्यमिक शिक्षणाची दर्जाही सुधारेल अशी अपेक्षा आहे.

५) माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण होण्यासाठी या आकृतिबंधातील +२ हा स्तर निश्चितच उपयोगी ठरणारा आहे.

६) या आकृतिबंधामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमाकडे धाव न घेता व्यावसायिक क्षेत्रात पदार्पन करण्याची संधी उपलब्ध होईल.

७) या आकृतिबंधामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण स्तराच्या अखेरीस विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी उपलब्ध झाल्याने विद्यापीठ वाढत्या विद्यार्थीसंख्येचा पडणारा ताण निश्चितच कमी होण्यास मदत होईल.

८) या आकृतिबंधाच्या स्वीकृतीमुळे शालेय व महाविद्यालयीन स्तरावर अभ्यासक्रम हा शास्त्रशुद्ध पद्धतीने अधिकाधिक आधुनिक व दर्जेदार करण्याची संधी प्राप्त होईल. तसेच युवक वा कुमार यांच्या सामाजिक व आर्थिक गरजा अधिक चांगल्या रीतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने या आकृतिबंधाची मदत होईल.

९) देशात सातत्याने वाढत जाणाऱ्या स्थलांतरित समाजातील मुलांच्या शिक्षणातील अडचणी नाहीशा करण्यासाठी या आकृतिबंधाची मदत होईल.

१०) अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक समस्या दूर होण्यास या आकृतिबंधाची मदत होईल. उदा. अल्पसंख्यांकाच्या भाषेतील पुस्तकनिर्मिती, अल्पसंख्यांकाच्या शिक्षणाचे माध्यम इत्यादी.

११) भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकसमान आकृतिबंध स्विकारला गेल्यामुळे शैक्षणिक कार्यक्रम, पाठ्यपुस्तके, वाचन साहित्य व शैक्षणिक साधनांची

निर्मिती, शिक्षकांचे प्रशिक्षण, अभ्यासक्रम पुनर्रचना आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा या बाबींची अंमलबजावणी करणे सुलभ होईल.

१२) उच्च माध्यमिक स्तराअखेरीस विद्यार्थ्याला आपल्या आवडीनुसार व्यवसाय अथवा निवडता येण्याची संधी प्राप्त होऊ शकेल.

१३) विद्यापीठ शिक्षणावर विद्यार्थी संख्येचा पडणारा ताण या आकृतिबंधामुळे कमी होईल. साहजिकच महाविद्यालयीन शिक्षणाचा विस्तार करावा न लागल्याने त्यासाठी होणाऱ्या आर्थिक खर्चाची बचत होईल.

१४) दोन वर्षाचे पदवी शिक्षण याऐवजी तीन वर्षाचे पदवी शिक्षण ही या आकृतिबंधातील निश्चितच चांगली बाब आहे. तीन वर्षाच्या पदवी शिक्षणामुळे इतर देशांच्या तुलनेत आपली पदवी कनिष्ठ मानली जाणार नाही.

१५) या आकृतिबंधाचा भर प्रामुख्याने कार्यानुभव शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुविधा विद्यार्थ्यांना पुरवून शिक्षण व उत्पादकता त्यांच्यात संबंध प्रस्थापित करणे यावर आहे. एखाद्या व्यवसायाचे प्रात्यक्षिक कौशलय व ज्ञान विद्यार्थ्यांना त्यातून उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांना नोकरीसाठी अथवा स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी त्याचा निश्चित फायदा होऊ शकेल.

४अ.५ १०+२+३ या आकृतिबंधाच्या मर्यादा किंवा उणीवा :-

१०+२+३ या आकृतिबंधाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

१) या आकृतिबंधाच्या अंमलबजावणीबरोबर नवीन अभ्यासक्रम स्विकारण्यात आला. त्यामध्ये अनेक विषयाचा समावेश केल्याने हा फार बोजड झाला अशी टिका होत आहे. तसेच नव्याने राखण्यास फारशे यश आले नाही. अभ्यासक्रम बोजड झाल्याने सहशालेय उपक्रमाच्या आयोजनासाठी फारच थोडा वेळ उपलब्ध होत आहे. काही विषयांना फारच कमी महत्त्व दिले गेल्याने त्यांचा दर्जा पूर्वीच्या आकृतिबंधात त्या विषयाला मिळणाऱ्या दर्जापेक्षा खालावला.

२) कार्यानुभव हा नव्या आकृतिबंधानुसार तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वपूर्ण विषय हाय. परंतू काही हस्तोद्योग व कार्यानुभव विषय हे स्थानिक परिसराशी मिळतेजुळते नाही. कार्यानुभव व व्यवसाय शिक्षण यासाठी आवश्यक असणारे साहित्य शाळांमध्ये उपलब्ध नाही. कार्यानुभव हा विषय शिकविण्यासाठी शिक्षकांना यथायोग प्रशिक्षण सुविधासाठी उपलब्ध झाल्या नाहीत. व्यापार, कृषी व औद्योगिक गरजाशी कार्यानुभव व व्यवसाय शिक्षण जोडण्यातही फारशे यश प्राप्त होऊ शकले नाही.

३) उच्च माध्यमिक स्तरांच्या निर्मितीमुळे या स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा, कार्यशाळा, ग्रंथालये विकसित होणे आवश्यक आहे/होते. मात्र सुरुवातीच्या काळात व आजही या बाबतीत फारशी प्रगती झाल्याचे दिसत नाही.

४) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण करण्यात फारशे यश आलेले नाही. त्यामुळे स्तराच्या अखेरीस जेवढे विद्यार्थी व्यवसाय शिक्षणाकडे वळविणे अभिप्रेत होते ते शक्य झाले नाही. शैक्षणिक अभ्यासक्रमाकडेच विद्यार्थ्यांचा जास्त कल आजही

दिसत आहे. उच्च माध्यमिक स्तरावर जेवढ्या प्रमाणात व्यावसायिक कोर्सेस सुरु करणे अपेक्षित होते तेवढ्या प्रमाणात ते सुरु झाले नाहीत.

५) नव्या आकृतिबंधामुळे काही प्रशासकीय समस्यांही निर्माण झाल्या. हायस्कूलमधील तसेच महाविद्यालयातील काही शिक्षक अतिरिक्त ठरले त्यांना सामावून घेण्याचा नवीन प्रश्न निर्माण झाला. तर काही विषयांसाठी प्रशिक्षित शिक्षक मिळने दुरापास्त झाले.

६) नव्या आकृतिबंधामुळे उच्च माध्यमिक हा नवीन स्तर निर्माण झाला. या स्तरांच्या निर्मितीमुळे केंद्र व राज्यशासनाच्या आर्थिक बोजात वाढ झाली.

वरील अनेक मर्यादा १०+२+३ या नव्या आकृतिबंधाच्या अंमलबजावणीमुळे निर्माण झाल्या असल्या तरी समाजाच्या गरजा व अपेक्षा, ज्ञानाच्या क्षेत्रात झालेली प्रचंड वाढ व जगातील इतर देशाची तुलना करता आपणास आकृतिबंधात बदल करणे अपरिहार्यच होते. हा आकृतिबंध म्हणजे शिक्षणाच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण सुधारणा होय असेच मानावे लागेल.

४अ.६ प्रश्न :-

१) उच्च माध्यमिक शिक्षणातील विकासाबाबत सविस्तर विश्लेषण (पृथ्थकरण) करा.

२) भारतीय शिक्षणातील नवीन आकृतिबंधांची आवश्यकतेचे वर्णन करा.

३) उच्च माध्यमिक शिक्षणाच्या दर्जात्मक विकासासाठी योगदानाचे मार्ग सूचवा.

संदर्भ ग्रंथ :-

१) माध्यमिक शिक्षण - डॉ. मोहन जाधव.
प्रा. आरती भोसले.

❖❖❖❖

४ब

भारतातील तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचा विकास

घटकाचे स्वरुप :-

४ब.० उद्दिष्ट्ये

४ब.१ उच्च माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

४ब.२ व्यावसायिक शिक्षणाची व्यापक संकल्पना

४ब.३ आवश्यकता आणि महत्त्व

४ब.४ ऐतिहासिक पार्श्वभूमी

४ब.५ महत्त्वाचे मुद्दे

४ब.६ सारांश

४ब.७ प्रश्न

४ब.० उद्दिष्ट्ये :-

- व्यावसायिक शिक्षणाची संकल्पना समजून घेणे.
- व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता ओळखणे.
- तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या पार्श्वभूमीचे वर्णन करणे.
- आमलात आणण्यासाठी वापरात येणाऱ्या कौशल्याचे पृथ्थकरण करणे.
- तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या विस्तारासाठी आवश्यक ते प्रस्ताव पुरविणे.

४ब.१ उच्च माध्यमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर व्यवसाय संबंधी शिक्षणाचा समावेश नव्हता पण स्वातंत्र्यानंतर भारतीय आयोग आणि विविध समित्या यांच्या समावेश नव्हता पण स्वातंत्र्यानंतर भारतीय आयोग आणि विविध समित्या यांच्या प्रयत्नामुळे शिक्षणपद्धतीमध्ये व्यवसायशिक्षणाच्या समावेश करण्यात आला.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा निरीक्षणवरुन असे आढळून येते की पूर्वनियोजित आणि व्यवस्थितरित्या मांडलेल्या व्यावसायिक शिक्षणाचा समावेश बऱ्याचशा संस्थामध्ये दिसून येतो.

४ब.२ व्यावसायिक शिक्षणाची संकल्पना :-

UNESCO (1974) च्या मते, "व्यावसायिक शिक्षण ही एक व्यापक संकल्पना असून त्यामध्ये सामान्य शिक्षण, प्रायोगिक कौशल्य, तंत्रज्ञान आणि संबंधित विज्ञान इत्यादींचा यामध्ये समावेश होतो."

व्यावसायिककरणामुळे लोकांतील रोजगारी क्षमता वाढीस लागून शेती, कंपन्या आणि त्यास पूरक अशा कला, कौशल्य इत्यादिंचा समावेश होतो.

व्यावसायिक शिक्षण हे केवळ प्रशिक्षण नसून ते शिक्षण आणि विविध कौशल्याचा विकास या दोघांचे मिश्रण आहे.

४ब.३ आवश्यकता आणि महत्त्व :-

व्यावसायिक शिक्षण व्यक्तीला अशा पद्धतीने सक्षम बनविते जेणेंकरुन त्याला त्याची आवडीची नोकरी करता येईल. किंवा तो स्वतःच्या आवडीचा व्यवसाय सुरु करु शकतो यामुळे पूर्ण समाजाच्या गरजा भागविल्या जातील.

म. गांधीजींच्या मते, शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे साधन असून हस्तकौशल्य आणि करमणूक हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. याबद्दल बऱ्याच लोकांमध्ये गैरसमज आहेत. त्यांच्या मते, व्यावसायिक शिक्षण हे दुय्यम दर्जाचे असून ते शिक्षणात कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच आहे. अशाप्रकारची धारणा आहे. पण बदलत्या समाजरचनेमुळे आणि तांत्रिक विकासामुळे व्यावसायिक शिक्षणाके बघण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन बदलला आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात जेथे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे दालन खुले आहे. व्यापर व उद्योगधंद्याची वाढ होत आहे. यासाठी व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता भासत आहे.

व्यावसायिक शिक्षणाचे उद्दिष्ट्ये म्हणजे सामाजिक दृष्ट्या उपयोगी आणि उत्पादित कार्याशी संबंधित कार्यानुभव या विषयाचा समावेश इयत्ता १० वी पर्यंत केला जातो.

अशाप्रकारे ज्याचे कार्यानुभव, SUPW, हे विषय व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित आहेत ज्याचे सामाजिक आणि आर्थिक विकासात योगदान लाभते एवढेच नसून विद्यार्थ्यांच्या काम करण्याच्या क्षमतेत वाढ करते.

४ब.४ ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भारतीय शिक्षणपद्धतीचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांना त्यांच्या गुरुसोबत आश्रमात रहावे लागे. जगण्यासाठी आणि पैसे कमावण्यासाठी त्यांना शिक्षणाचा आधार घ्यावा लागे. म्हणजेच त्याकाळी शिक्षणाला जीवनापासून वेगळे करता येऊ शकत नव्हते.

ब्रिटिशांनी भारतीयांनी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची ओळख करुन दिली ज्यामुळे 'व्हाईट कॉलर जॉब' मिळू लागले.

१८५४ च्या वूड्सच्या खलित्याने पूर्वव्यावसायिक शिक्षण हे माध्यमिक स्तरावर असावे असे सुचित केले.

प्रसिद्ध कवी आणि समाजसूधारक रविंद्रनाथ टागोर यांनी सुद्धा हस्तकौशल्य आणि व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व पटवून दिले.

म. गांधीच्या मते, व्यावसायिकीकरण हे फक्त अभ्यासक्रमात न ठेवता तो एक उत्पादित घटक आणि जीवनाचा मार्ग असला पाहिजे.

१९४४ मध्ये 'सार्जंट रिपोर्ट' याने बेरोजगारी या भयंकर अशा समस्येचे निराकरण शोधण्याचा आणि तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये दोन बाजू आहे. १) शैक्षणिक २) तांत्रिक.

१९४८ च्या राधाकृष्ण आयोगानुसार जुनियर कॉलेजची स्थापना मोठ्या प्रमाणावर केली जावी जेणेंकरुन इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन करता येईल.

१९६४-६६ च्या शैक्षणिक आयोगानुसार मूलभूत शिक्षण आणि सहशालेय कार्यक्रम हे आजच्या शिक्षणपद्धतीचा गाभा आहे. कोठारी आयोगाने गांधीजीच्या शिक्षणविषयक विचारांना दुजोरा दिला.

१९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणातील सुधारण्यांमध्ये वाढ केली पाहिजे तसेच शिक्षण आणि मानवी जीवन यांची सांगड घालून आवश्यक त्या कोर्सेसचा समावेश करण्यात आला पाहिजे. जसे शेती, कारखाने, व्यापार, औषधे, सार्वजनिक आरोग्य, गृहण्यव्यवस्थापन, कला आणि कौशल्य इत्यादी.

शिक्षणाचे केंद्रिय सल्लागार मंडळ (The Central Advisory Board of Education) याने इ.स. १९७५ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर व्यावसायिक शिक्षणपद्धतीचा समावेश केला. या मंडळाने १०+२+३ ह्या शिक्षणपद्धतीचा अवलंब केला.

CBAE आणि NCERT यांनी संपादित केलेल्या डाक्यूमेंटस् (अहवाला) मध्ये जे 'उच्चशिक्षण आणि त्याचे व्यावसायिकरण' यावर आधारित होते. त्यामध्ये व्यावसायिक शिक्षण, लवचिकता, विविध कामाच्या संधी, सूक्ष्म नियोजन, मानवी शक्तीच्या गरजा, ग्रामीण भागातील विविध सोयी सुविधांमध्ये सुधारणा इ. वैशिष्ट्यांचा समावेश होता.

इ.स. १९७७ च्या ईश्वरभाई पटेल समितीने SUPW या विषयाऐवजी अभ्यासक्रमामध्ये कार्यानुभव या विषयाचा समावेश केला. ज्याचा मूलभूत आधार विज्ञान, कार्य आणि मानवता हे होते. तसेच १९७७ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेमध्ये, संचालक श्रीराम नारायण यांनी ५०% शाळेचा वेळ हा उत्पादित आणि कृतिशील व इतर कृतियुक्त कार्यांना द्यावा असे मांडण्यात आले.

४ब.५ महत्त्वाचे मुद्दे :-

परिणामकारक अंमलबजावणीसाठी खालील मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत.

१) NCERT नुसार

- सामान्य शिक्षणपद्धतीचा अवलंब करावा.
- व्यावसायिक शिक्षण पद्धती अवलंब केला जावा.
  या दोन पद्धतीचा समावेश आहे. ज्या पूर्णपणे लवचिक आहे.

२) निवडक विषयाचा समावेश करताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

- सामान्य शिक्षण
- व्यावसायिक शिक्षण
- सामान्य आणि व्यावसायिक शिक्षण

३) व्यावसायिक कोर्स - यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

- कोर्सेसची कालावधी (वेळ)
- भाषा १५%
- झनरल फाऊंडेशन कोर्स १५%
- निवडलेले विषय ७०%

४) ७० शिक्षण हे आठवड्याच्या शेवटी व ५० प्रायोगिक ज्ञान.

५) सल्लागाराची नियुक्ती केली पाहिजे जेणेंकरुन विद्यार्थ्यांना विषय निवडण्यास मदत होईल.

अशाप्रकारे माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचा समावेश असणे महत्त्वाचे आहे.

४ब.६ सारांश :-

संपूर्ण शिक्षणपद्धतीमध्ये शिक्षक हा महत्त्वाची भूमिका बजावत असतो. शिक्षक फक्त ज्ञान देण्याचे काम न करता विद्यर्थ्यांच्या मनात परिवर्तन घडवून आणण्यात शिक्षकाचा महत्त्वाचा वाटा आहे.

व्यावासायिक शिक्षणाचा फायदा आणि यश हे नोकरीच्या संधी यावर अवलंबून आहे. म्हणूनच जास्तीत जास्त भर हा प्रशिक्षणावर असतो व जास्तीत जास्त व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देतो.

४ब.७ प्रश्न :-

१) शाळेत व्यावसायिक शिक्षणाचा विकास करण्सयासाठी कोणता कार्यक्रम सुरु करणे गरजेचे आहे ?

२) भारतातील व्यावसायिक शिक्षणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर चर्चा करा.

३) योग्य वाक्य निवडा.

   १) शिक्षणात व्यावसायिकरण आंमलात आणण्यासाठी समाजसेवा आणि चा अवलंब करावा.

   २) व्यक्तीची एकात्मता वाढवावी.

   ३) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करु नये.

तांत्रिक शिक्षण

घटकाचे स्वरुप :-

४ब.८ उद्दिष्ट्ये
४ब.९ प्रस्तावना
४ब.१० तांत्रिक शिक्षणाची संकल्पना
४ब.११ ऐतिहासिक पार्श्वभूमी
४ब.१२ तांत्रिक शिक्षणातील समस्या
४ब.१३ समस्येवरील उपाय
४ब.१४ सारांश
४ब.१५ प्रश्न

४ब.८ उद्दिष्ट्ये :-

- तांत्रिक शिक्षणाची संकल्पना समजावून घेणे.
- तांत्रिक शिक्षणाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करणे.
- तांत्रिक शिक्षणाचा ऐतिहासिक विकास समजून घेणे.
- तांत्रिक शिक्षणाच्या मर्यादा, ओळख, त्यामध्ये सुधारणा करण्याचे मार्ग समजून घेणे.

४ब.९ प्रस्तावना :-

कोणत्याही घटकाचा विकास हा तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती व उपलब्धतेवर आवलंबून असतो. जसे. भौतिक सुविधा आणि मानवी साधनसंपत्ती इत्यादि.

वरील सर्व गोष्टीच्या अभावी कोणताही राष्ट्र स्वत:ची प्रगती करु शकत नाही.

देश हा नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण असेल पण त्या संपत्तीच्या कच्च्या मालाचे रुपांतर चांगल्या उत्पादनात (Finished products) करण्यास मनुष्यभळाची गरज लागते. म्हणूनच चांगले तांत्रिक शिक्षण भारतासारख्या विकसनशील देशाला श्रीमंत आणि संपन्न बनविण्यास फायदेशीर ठरेल.

४ब.१० तांत्रिक शिक्षणाची संकल्पना :-

कृतिशिल उपक्रम हा या शिक्षणाचा पाया असून, ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या निम्न माध्यमिक स्तरापासूनच तयार (सक्षम) करतात. यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि केरळ इत्यादि राज्यांचा समावेश आहे. शाळेच्या अभ्यासक्रमात विविध विषयांचा समावेश आहे. जसे लोहारकाम, मोल्डींग, वेल्डींग, फिटिंग, टर्निंग, बिल्डिंग कन्ट्रक्टशन, ग्रामीण तंत्रज्ञान, वायरमन इ., इ.स. १९९९-२००० मध्ये ५७२० शाळांमध्ये ४,०४,१०४ एवढ्या विद्यार्थ्यांची पटनोंदणी झाली.

तांत्रिक शिक्षण :-

तांत्रिक शिक्षण डक्ष एक उपपद्धती असून ती Poly-technique या विषयाची साखळी आहे. म्हणजेच अभियांत्रिकी या क्षेत्रासाठी हा एक पाया आहे. जवळ जवळ ५०० पॉलिटेक्नीक शाळांची वर्षाची पटनोंदणी ६५,००० एवढी आहे.

कारागिरांसाठी प्रशिक्षण पद्धती :-

जवळ जवळ २००० खाजगी आणि शासकीय शाळांपासून कारागिरांना प्रशिक्षण दिले जाते. इ.स. १९८७-८८ मध्ये या प्रशिक्षणासाठीची विद्यार्थीसंख्या जवळजवळ ३,२७,००० एवढी होती. यामध्ये X+ आणि VIII+ या क्षमतेचा समावेश होतो.

उमेदवारीसाठी प्रशिक्षण पद्धती :-

यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश होतो.

१) अभियांत्रिकी पदवीधरांसाठी पदवीधर उमेदवारी.

२) पॉलिटेक्नीक पासून पदविधारक.

३) ITI चे पदवीधारक आणि व्यापारी उमेदवारी.

४) उच्च माध्यमिक स्तरांवरील व्यावसायिक कोर्सेससाठी तांत्रिक उमेदवारी.

भविष्यातील व्यापारांच्या वाढत्या व्यवसायानुसार तांत्रिक उमेदवारी ही वेगवेगळ्या २० क्षेत्रामध्ये पसरली आहे.

आरोग्य आणि वैद्यकीय व्यवसाय :-

प्रशिक्षण कार्यक्रमांना राष्ट्रीय स्तरावर मार्गदर्शन करण्यासाठी खालील तीन सल्लागार केंद्रे आहेत.

१) **कृषी / शेती :-** भारतीय कृषी (शेती) संशोधन केंद्र मुख्यतः पदवीधर आणि उच्च पदवीधारक कृषी व्यवसाय आणि संशोधन यांच्याशी संबंधित आहे. खूप अल्प असे अनौपचारिक प्रशिक्षण केंद्र आहेत जेथे कृषी विज्ञान आणि कृषी विद्यापीठातर्फे ग्रामीण भागातील तरुणांना मार्गदर्शन दिले जाते. बऱ्याचशा राज्यामध्ये शासनातर्फे कृषीशाळा चालविल्या जात आहेत.

२) **व्यापार आणि दळणवळण :-** व्यापार आणि दळणवळण या क्षेत्रामध्ये प्रशिक्षणपद्धती खूप मोठ्या संख्येने संस्था, सेल्समनशीप आणि मार्केटिंग उपलब्ध आहे.

इतर संस्था :-

यामध्ये अपंगासाठी शिक्षण, संगीत, चित्रकला, वनविभागातीवल शिक्षण, औद्योगिक शिक्षण इत्यादिचा समावेश होतो.

४ब.११ भारतातील तांत्रिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भारतामध्ये तांत्रिक शिक्षण प्राचीन काळापासून अवगत आहे. एवढेच नसून वैदिक काळामध्ये सुद्धा तांत्रिक शिक्षणाचे वेगवेगळे रुप दिसतात पण कालांतराने या शिक्षणाचा ऱ्हास झाला.

वैदिक काळ :-

या काळातील ऋग्वेदामध्ये आपल्याला सुंदर अशा राजवाड्याचे, दळणवळणाची साधने, कालवे, बंदरे इत्यादींचे वर्णन आढळून येतात. अथर्ववेदामध्ये मेडिकल सायन्सची व्यवस्थित माहिती मांडलेली आढळून येते.

वैदिक काळानंतरचा काळ :-

वैदिक काळानंतरच्या काळातील 'रामायन' या ग्रंथामध्ये पूलाची बांधणी आणि रामाने ज्या पुष्पक विमानातून प्रवास केला त्याचे वर्णन केले आहे.

महाभारताच्या काळामधील मोहोंजदडो संस्कृती आणि हडप्पा संस्कृतीमधील तांत्रिक कौशल्यांचा विकास यांचे वर्णन आढळून येते.

गौतम बुद्धाच्या काळात बुद्धिष्ट साहित्याबरोबरच वैदिक साहित्याचा अभ्यास केलेला आहे. वैद्यकशास्त्र, चित्रकला, शिल्पकला, रसायनशास्त्र यामधील लक्षणीय प्रगती पाहावयास मिळते. धर्माचे वर्चस्व बाजूला ठेऊन व्यावसायिक शिक्षणाला या काळात खूप महत्त्व दिले गेले.

मुस्लिम काळ :-

या काळामध्ये व्यावसायिक शिक्षण प्रचलित नसूनसुद्धा त्यांचे भव्य राजवाडे, मस्जिद, कारपेट्स, भांडी इत्यादिवर तांत्रिक कौशल्य दिसून येते.

ब्रिटिश काळ :-

ब्रिटिश काळात कुशल कारागीर (तंत्रज्ञ) यांचे महत्त्व वाढत गेले. इ.स. १८४७ मध्ये 'रुरकी' येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यात आले. त्यानंतर कालांतराने इ.स. १९०२ पर्यंत देशामध्ये ८० तांत्रिक आणि व्यावसायिक शाळा सुरु झाल्या.

इ.स. १९१७ च्या कलकत्ता विद्यापीठ आयोगानुसार तांत्रिक आणि व्यावसायिक विषयांचा समावेश विद्यापीठीय अभ्यासक्रमात केला जावा असे सूचित करण्यात आले आणि त्यानुसार वैद्यकीय, अभियांत्रिकी, कायदा, कृषी आणि शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

इ.स. १९२९ च्या हंटर आयोगाने व महात्मा गांधी यांनी सुद्धा व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाला महत्त्व दिले होते. आणि म्हणून इ.स. १९४६ मध्ये 'आखिल भारतीय तांत्रिक शिक्षण संघटनेची' स्थापना करण्यात आली. जेणेंकरुन तांत्रिक शिक्षणामध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

स्वातंत्र्योत्तर काळ :-

भारताच्या स्वातंत्र्यांनंतर भारतीय नेत्यांनी तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. इ.स. १९४७ मध्ये वैज्ञानिक मनुष्यबळ समितीची स्थापना करण्यात आली.

विद्यापीठीय आयोग (१९४८-४९) :-

तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या प्रसारासाठी विद्यापीठीय आयोगाने खालील शिफारशी केल्या.

१) शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर कृषी विषयाचा अभ्यास असला पाहिजे.

२) अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना प्रायोगिक शिक्षण दिले गेले पाहिजे.

३) ग्रामीण भागात विद्यापीठाची स्थापना केली पाहिजे.

समाजाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमामध्ये आवश्यक ते बदल करणे आवश्यक आहे.

माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३) :-

तांत्रिक शिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी माध्यमिक शिक्षण आयोगाने खालील शिफारशी सूचित केल्या.

१) माध्यमिक शाळांचे रुपांतर बहुउद्देशिय शाळांमध्ये केले पाहिजे.
२) तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून करियर (कारकीर्द) करण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

कोठारी आयोग (१९६४-६६) :-

तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत कोठारी आयोगाच्या खालील शिफारशी आहेत.

१) असंख्य प्रमाणात तांत्रिक आणि व्यावसायिक शाळा स्थापन केल्या पाहिजेत.
२) शिक्षण उत्पादनक्षम असले पाहिजे.
३) शिक्षकांना उन्हाळी प्रशिक्षण, रिफ्रेशर, कोर्स, अंतर्गत प्रशिक्षण द्यावे जेणेंकरुन नव-नवीन आण उद्ययावत माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचेल.

४ब.१२ तांत्रिक शिक्षणातील समस्या :-

पूर्वी जरी असंख्य तांत्रिक आणि व्यावसायिक संस्था स्थापन झाल्या असल्या तरी त्यामध्ये गुणात्मक आणि दर्जात्मक शिक्षण समाधानकारक नव्हते.

तांत्रिक शिक्षणाचा अभ्यासक्रम कृषीप्रधान विभागातील लोकांच्या गरजा भागवू शकला नाही. विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा या विषयाची आवड निर्माण करता आली नाही.

तांत्रिक शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे बोलीभाषेतील (मातृभाषेतील) विद्यार्थ्यांना ते अवघड वाटू लागले.

कोणत्याही शिक्षण पद्धतीवर चांगले प्रशासन आणि ताबा हा आवश्यक आहे. तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत योग्य असे नियोजन नसल्यामुळे मूल्यमापन करणे अवघड जाते.

४ब.१३ समस्येवरील उपाय :-

समाजाच्या गरजेनुसार व्यापार आणि शिक्षण असणे आवश्यक आहे.

तांत्रिक शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा करण्यासाठी चांगल्या प्रतीची पुस्तके प्रादेशिक भाषेत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. आणि जास्तीत जास्त मनुष्यबळाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

४ब.१४ सारांश :-

संपूर्ण शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. जोपर्यंत तो विषयाच्या प्रती किंवा प्रत्येक व्यवसायाच्या प्रती आदर दाखवदत नाही तोपर्यंत शिक्षक विद्यार्थ्याला प्रोत्साहित करु शकत नाही.

तांत्रिक शिक्षणाचे यश त्यातील नोकरी संधीमधील नियुक्तीवर अवलंबून असते. बेरोजगारी आणि गरिबी या समस्या भारताच्या प्रगतीला ग्रासल्या असून तांत्रिक विकासामध्ये सुद्धा त्याचा अडथळा निर्माण होतो आहे. तरीही जगामध्ये भारताचा वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रातील प्रगतीमध्ये तिसरा क्रमांक लागतो. महासागरीय तंत्रज्ञान (Ocean Technology) मध्ये चांगले संशोधन केल्यामुळे भारताचे त्यात वेगळेपण दिसून येते.

४ब.१५ प्रश्न :-

१) भारतातील तांत्रिक शिक्षणाच्या विकासाचे पृथ्थकरण करा.

२) तांत्रिक शिक्षणाच्या प्रगतीच्या काही वैशिष्ट्यांवर चर्चा करुन त्यावर उपाय सूचवा.

३) भारतातील तांत्रिक शिक्षणाच्या मर्यादा कोणत्या आहेत ? व त्या कशाप्रकारे सोडविल्या पाहिजेत ?

४) तांत्रिक शिक्षणाची व्यापक व्याख्या लिहा.

❖❖❖❖

४क

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणातील समस्या आणि सद्यस्थिती

घटकाचे स्वरुप :-

४क.० उद्दिष्ट्ये

४क.१ प्रस्तावना

४क.२ शिक्षणातील विविध समस्या

४क.३ सारांश

४क.४ प्रश्न

४क.० उद्दिष्ट्ये :-

पाठानुसार याचे पहिले उद्दिष्ट्ये म्हणजे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणातील समस्या समजासून घेणे हे आहे आणि त्याचबरोबर या घटकांची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) शिक्षण पद्धतीतील मूलभूत समस्या समजावून घेणे.

२) समस्यांचे कारण ओळखण्यास मदत करणे.

३) भारतीय शिक्षणपद्धतीतील विविध आव्हाने ओळखण्यास मदत करणे.

४) आधुनिक शिक्षणपद्धतीतील सद्यस्थितीचे वर्णन करणे.

४क.१ प्रस्तावना :-

माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे शिक्षणामध्ये बराचसा बदल झालेला आढळून येतो. शिक्षण आणि संप्रेषण या संकल्पना पूर्णपणे बदलल्या आहेत. डिजिटल नेटवर्क, आंतरजाल (Internet), सॅटेलाइट (उपगृह) या नवीन तंत्रज्ञानाच्या पद्धतीमुळे जागतिकीकरणाची (सार्वत्रिकीकरणाची) दालने खूली झाली आहेत. म्हणूनच पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये बदल होणे गरजेचे आहे. तसेच त्यामध्ये शिक्षण, शिक्षक आणि शासनाच्या विविध योजनांची भूमिका सध्याच्या बदलत्या परिस्थितीनुसार बदलणे गरजेचे आहे.

म्हणूनच शिक्षणसंस्था ह्या फक्त शिक्षण देण्याचे केंद्र नसून त्या एक प्रकारच्या नामांकित संस्था म्हणून ओळखल्या जातात. ज्याठिकाणी सध्याच्या पिढीला, व्यक्तिमत्त्वाला आकार दिला जातो.

४क.२ शिक्षणातील विविध समस्या :-

शिक्षणातील निरीक्षणातून असे आढळून आले की, मोजकीच मुले प्राथमिक स्तरावर प्रवेश घेऊन शाळा (शिक्षण) पूर्ण करतात.

हार्टिज आयोगाच्या निरीक्षणानुसार, जे विद्यार्थी इयत्ता १ ली या वर्गात प्रवेश घेतात त्यापैकी १८% विद्यार्थी हे इयत्ता ५ वी पर्यंत पोहोचतात.

विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण आणि स्थगितीचे प्रमाण यालाच शिक्षणपद्धतीत अकार्यक्षमता (wastage) असे म्हणतात. म्हणजेच शिक्षणाचा दर्जा हा कमी किंवा हलक्या प्रतीचा आहे असे समजले जाते.

शिक्षणातील दर्जा या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती ज्यामुळे ६५% मुले शाळा सोडून जातात. मुलींमध्ये त्याच्या भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी पडत असल्यामुळे त्यांना घरी राहावे लागते म्हणून ते शिक्षणापासून वंचित राहतात ग्रामीण भागातील बरीचशी मुले शेतीकाम व गुन्हे (जनावरे) राखणे या कामामध्ये असतात. आणि अशाप्रकारची मुले शिक्षणासाठी आवश्यक तेवढा वेळ देऊ शकत नाहीत. आणि त्याचे फळ नापास होण्यातच मिळते.

भारतातील बराचसा ग्रामीण भाग हा पारंपारिक जातीव्यवस्था आणि रुढी परंपरेच्या विळख्यात अडकलेला आहे. उच्च स्तरातील लोक त्यांच्या मुलांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यास पाठवितात पण खालच्या वर्गातील (निम्नस्तर) लोक त्यांच्या पाल्यांना विविध प्रकारच्या कामासाठी शाळेतून लवकर काढतात व त्यांचे शिक्षण खंडित करतात.

थोडक्यात शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती, पारंपारिक रुढी व परंपरा इत्यादी कारणे विद्यार्थ्यांच्या गळतीसाठी कारणीभूत आहेत. या व्यतिरिक्त काही शैक्षणिक घटकही यासाठी कारणीभूत आहेत त्यासाठी खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. विद्यार्थ्यांना शाळेकडे आकर्षित करण्यासाठी आपल्या शाळेचा दर्जा तशा प्रकारचा आहे काय ?
२. आपल्या शाळा किती प्रमाणात समाज व त्यांच्या गरजांशी निगडीत (संबंधित) आहेत ?
३. शालेय शिक्षण हे विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत करण्यासाठी उपयोगी आहे काय ?
४. चालू शैक्षणिक वर्षामध्येच सर्व विद्यार्थी प्रवेश घेतात का ?

वरील प्रश्नांचे उत्तर होकारार्थी (positive) देणे हे जमणार नाही.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील अपूऱ्या भौतिक सोयीसुविधेमुळे विद्यार्थी संख्या टिकून राहत नाही. उदा. अपुरे बँचेस, बैठकव्यवस्था, स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ.

व्यवसाय पूर्व प्रशिक्षण आणि शिक्षक व्यवसायात असतांना प्रशिक्षण (सेवांतर्गत प्रशिक्षण) हे शासनाने लागू केले जेणेंकरून बदलत्या परिस्थितीनुसार व शिक्षणाच्या वाढत्या स्वरुपानुसार शिक्षक स्वत:ला अद्ययावत ठेवतील.

अभ्यासक्रम जो नेहमी जास्तीचा आहे आणि तो त्या जीवनाशी निगडीत असला तरी सहशालेय कार्यक्रमात रस घेऊन शिकविले जात नाही. आरोग्य तपासणी आणि मध्यंतराचे जेवण (मिड-डे मिल) हे क्वचित शाळेतच आपल्याला पाहायला मिळते.

प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व्यवस्थित प्रोत्साहन न दिल्यामुळे तसेच बंदिस्त वातावरण, पारंपारिक अध्यापनपद्धती यामुळे सुद्धा विद्यार्थी शाळेत दाखल (येत) नाहीत.

योग्य संशोधनाचा अभाव ही एक शिक्षणातील समस्या आहे. गांधीजींच्या मते, शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमात लवचिकता असली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कृतीशिलतेला वाव दिला गेला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आणि तेथील समाजाच्या गरजा लक्षात ठेऊन आपले ज्ञान अद्ययावत ठेवले पाहिजे.

४क.३ सारांश :-

विद्यार्थ्यांचा किंवा समाजाचा आर्थिक दर्जा उंचावला तर नक्कीच शाळेतील गळतीचे प्रमाण कमी होईल. शिक्षणाचे महत्त्व समजण्यासाठी लोकसंख्याशिक्षण, प्रौढ शिक्षण, (मार्गदर्शनाद्वारे त्यांच्या रुढी व परंपरा, धार्मिक कल्पना यामधून विद्यार्थ्यांना बाहेर काढता येते. शाळेमधील भौतिक सुविधांमध्ये सुधारणा केली गेली पाहिजे.

४क.४ प्रश्न :-

कोणत्या प्रकारचा बदल तुम्ही खालील बाबतीत सूचवाल? जेणेंकरून शिक्षणातील समस्या दूर होतील?

१. शालेय शिक्षणातील प्रवेश (पटनोंदणी)
२. शालेय वातावरण (भौतिक सुविधा)
३. अभ्यासक्रम
४. शिक्षक-अध्ययन-अध्यापन पद्धती
५. समाजाचा सहभाग
६. मूल्यमापन पद्धती
७. शालेय वेळापत्रक (दैनिक वेळ, सुट्ट्या, इतर सुविधा)

❖❖❖❖

४ड

शिक्षण पद्धतीतील नवीन प्रथा

घटकाचे स्वरुप :-

४ड.१ शिक्षणामध्ये झालेला बदल आणि त्यातील आव्हाने

४ड.२ शैक्षणिक तंत्रज्ञान

४ड.३ कला आणि शिक्षण कौशल्य

४ड.४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सांमजस्यासाठी शिक्षण

४ड.५ प्रश्न

४ड.१ शिक्षणामध्ये झालेला बदल आणि त्यातील आव्हाने :-

शिक्षणाला महत्त्वाचे कार्य करावे लागते. शिक्षणपद्धती ही बदलत्या परिस्थितीनुसार व बदलत्या समाजानुसार बदललीच पाहिजे. जेणेंकरुन समोर येणाऱ्या प्रत्येक आव्हांनाना सामोरे जाता येईल.

डॉ. श्रीमती यांच्या मते, समाजातील बदलत्या आर्थिक आणि सामाजिक गरजानुसार जर शिक्षणपद्धती बदलत नसेल किंवा विकास घडवून आणत नसेल तर शिक्षण जीवंत राहणार नाही.

भारतातील सद्यस्थितीनुसार ज्याठिकाणी जागतिकीकरण वाढत आहे त्याठिकाणी शिक्षणाची भूमिका खूप महत्त्वाची, कृतीशील आणि आव्हानात्मक बनली आहे.

आधुनिक शिक्षण पद्धतीतील चालू समस्या :-

साक्षरता हा मानवी विकासाचा एक टप्पा नसून ती एक मूलभूत गरज बनली आहे. साक्षरता आणि विकास या दोन बाबी एकमेकांवर अवलंबून आहेत आणि एकमेकांशी जोडल्या आहेत. साक्षरतेशिवाय आधुनिकीकरण किंवा लोकशाहीकरण या गोष्टी साध्य करता आल्या नसत्या.

स्वातंत्र्यानंतर युनेस्को (UNESCO), युनिसेफ आणि काही पाश्चात्त्य संघटना यांच्या सहकार्यामुळे इ.स. १९७४ साली मूलभूत साक्षरता (Fundamental Literacy) ला महत्त्व प्राप्त झाले.

त्याच काळात अनौपचारिक शिक्षण पद्धती पायाभूत शिक्षण पद्धतीचे सार्वत्रिकीकरण आणि निरक्षरता निर्मूलन यामध्ये महत्त्वाचे समजले जाते.

इ.स. १९८८ मध्ये भारतात साक्षरता अभियान सुरु करण्यात आले पण त्यापूर्वी इ.स. १९७८ मध्ये त्यावर पुनर्विचार करुन त्याच्या विकासावर टिका करण्यात आल्या होत्या. इ.स. १९९१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ४२% एवढे होते.

भारतीय साक्षरता कार्यक्रम ज्याला कालांतराने 'राष्ट्रीय साक्षरता अभियान' म्हणून संबोधण्यात आले. त्याने त्याच्या विविध रुपे, विविध हेतू, आकार यामुळे जगाचे लक्ष वेधून घेतले.

युनेस्कोने Plan of Action सुरुवात केले जेणेंकरुन जगाच्या प्रत्येक भागातील राज्यांना मदत करुन इ.स. २००० पर्यंत निरक्षरता निर्मूलन करता येईल.

म्हणूनच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटन (संस्था) यांच्या मदतीने भारताने सातव्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी २०,००० 'जनशिक्षणालये' यांची स्थापना केली. आणि आठव्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी 'सर्वशिक्षा अभियान' ची सुरुवात केली.

१९८६ च्या धोरणाने आणि 1986 (POA) Plan of Action यांनी साक्षरता अभियानाची आखणी केली.

प्रौढ शिक्षण :-

भारताने स्वत:ला सार्वभौम लोकशारी प्रजासत्ताक राज्य म्हणून घोषित केले पण लोकशाही हे एक शासनाचे स्वरुप नसून ते एक जीवन जगण्याचा मार्ग आहे. कोणत्याही स्तरावर आणि कोणत्याही वयामध्ये प्रौढशिक्षण घेता येते.

इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगानुसार शालेय स्तरावर शिक्षणाचा अंत नसून ती एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. म्हणून प्रौढ व्यक्तिंना वाढत्या बदलानुसार स्वत:ला बदलणे गरजेचे आहे.

आखणी - वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

- साक्षरता म्हणजे केवळ वाचणे आणि लिहणे नसून उत्पादकता वाढविण्यासाठी कौशल्य संपादन करणे होय.
- शिकणाऱ्यांनी स्वत: उत्सुक असले पाहिजे तेव्हाचि प्रौढ शिक्षण यशस्वी होईल.
- शिक्षणामध्ये प्रौढांचा सहभाग असणे आवश्यक आहे.
- साक्षरता अभियान अमलात आणण्यासाठी कार्यालयीन व बाह्यसहकार्य असणे गरजेचे आहे.
- साक्षरता अभियान या संबंधी शिक्षकांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

१९८६ च्या आयोगानुसार शिक्षण हे एक माध्यम आहे जे लैंगिक दरी, आर्थिक व सामाजिक दरी कमी करण्याचे कार्य करते.

या अभियानाद्वारे विविध मूल्य, व तत्त्वे रुजवली पाहिजेत. जसे, सहकार्य, सद्भावना, श्रमप्रतिष्ठा, एकत्रकाम इत्यादी.

शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे :-

प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यात अखंडपणे शिकत राहिले पाहिजे. UNESCO ने चार गृहीतके दिली आहेत ती खालीलप्रमाणे :

१) आंतरराष्ट्रीय एकात्मता
२) लोकशाहीवर विश्वास
३) व्यक्तीचा सर्वांगीण विकास
४) अखंड शिक्षण हे आयोगांसाठी मार्गदर्शक नसून त्यावर परिणामकारक असावे.

राष्ट्रीय साक्षरता अभियान (National Literacy Mission) **:-**

राष्ट्रीय साक्षरता अभियानामध्ये शासनाने खालील तांत्रिक गोष्टी सुरुवात केल्या.

१) ग्रामीण भागात पिण्याचे पाणी
२) रोग, संसर्ग यापासून सुरक्षितता
३) तेल बिया
४) संप्रेषण
५) राष्ट्रीय साक्षरता अभियान

वरील सर्व गोष्टींचे पूर्वनियोजन केले गेले जेणेंकरून राष्ट्रांच्या कमीतकमी गरजांची पूर्तता होईल.

सातव्या पंचवार्षिक योजनेनुसार विकास हा फक्त कारखाने, धरणे, किंवा रस्ते यांचा नसून तो खरे तर तेथील लोकांचा आहे.

राष्ट्रीय साक्षरता अभियानाची उद्दिष्ट्ये :-

८० दशलक्ष निरक्षर लोकांना साक्षर बनविणे हा या अभियानाचा उद्देश असून तो १५ ते ३५ वर्षे वयोगटातील लोकांसाठी मर्यादित आहे.

इ.स. १९९० पर्यंत ३० दशलक्ष जनता साक्षर करणे व इ.स. १९९५ पर्यंत ५० दशलक्ष जनता साक्षर करण्याचे उद्दिष्ट्य साध्य करणे होय.

उद्दिष्ट्ये :- खालीलप्रमाणे :

१) लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व त्यांना आत्मनिर्भर करणे.
२) शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांच्या कारणाबाबत जागरुकता निर्माण करणे.
३) विविध संघटनाद्वारे परिस्थितीत सुधारणा करणे.
४) आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध कौशल्य रुजविणे.
५) एकात्मता, पर्यावरण संरक्षण, एकता, छोटी कुटुंब पद्धती इत्यादी मूल्ये रुजविणे.

सर्वात कठिण गोष्ट म्हणजे राष्ट्रीय साक्षरता अभियानाचा अवलंब करण्यास लोकांना प्रोत्साहित करणे.

४ड.२ शैक्षणिक तंत्रज्ञान :-

वाढत्या शिक्षणाच्या प्रसारानुसार शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. ज्याचा शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी उपयोग होतो. जेणेंकरुन जागृत राहतील. शैक्षणिक तंत्रज्ञान हे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये मूल्यांची भर घालते.

यामध्ये शिक्षणपद्धती आणि साहित्य, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर आणि सर्व प्रसारमाध्यमांचा समावेश होतो.

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी भारत सरकारने आणि त्यानंतर शिक्षण मंत्रालय व सामाजिक वेल्फेअर विभाग यानी एक प्रकल्प सादर केला जेणेंकरुन शिक्षणाचा दर्जा सुधारेल. त्यामध्ये त्यांनी चित्रपण, आकाशवाणी, दुरदर्शन दृकश्राव्य इत्यादिचा समावेश करण्यात आला.

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी रेडिओसारख्या (आकाशवाणी) प्रसारमाध्यमांचा वापर केला जे आतापर्यंत १०० आकाशवाणी केंद्रे सुरु झाली आहेत. यामध्ये ४४ केंद्रे ही फक्त शैक्षणिक कार्यक्रम सादर करतात. तर ३० आकाशवाणी केंद्रे ही फक्त प्राथमिक व माध्यमिक शाळांपुरते मर्यादित आहेत.

Unisef ने झोपडपट्टी व ग्रामीण भागातील आर्सपासून मुलांमध्ये संक्रमण होणाऱ्या रोगांविषयी जागृती निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

दूरदर्शन हे खूप शक्तीशाली व प्रभावी माध्यम आहे. ज्याद्वारे शैक्षणिक कार्यक्रम सादर करुन लोकांना जागृत करण्याचे कार्य केले.

विविध शैक्षणिक संघटनानेसुद्धा (CIET, NCERT, ET) वेगवेगळे शैक्षणिक चित्रपट, फिल्मस्ट्रिप (चित्रफित्ती) आणि स्लाइड टेप्स सुरु केल्या.

सर्वांत नवीन शैक्षणिक सुधारणा म्हणजे उपगृहाच्या माध्यमातून होणारे शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रसारण होय.

४ड.३ कला आणि शिक्षण कौशल्य :-

छोटे मुल हे मोठ्या माणसाचे रुप आहे.
जसे उष:काल (अंधार) तिमिराचे प्रतिक आहे.

मुले ही मोठ्या माणसापेक्षा पुढेच असतात. ते समाजाचे उद्याचे नागरिक असतात. ते विश्वाचे निर्माते व आधारस्तंङ आहेत.

म्हणूनच मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला व्यवस्थित आकार देण्यासाठी त्यांना कला, साहित्य, खेळ, क्रिडा इत्यादिमध्ये संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि म्हणूनच विविध समित्या आणि आयोगाने कला हा अनिवार्य विषय माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला आहे.

सर्व समित्या व आयोगांच्या शिफारशी लक्षात घेऊन अभ्यासक्रमामध्ये १०+२+३ हा आकृतिबंधाची अभ्यासक्रम पद्धती ठेवण्यात आली आहे. म्हणूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांने असे मत मांडले आहे की, नवीन पिढी ही नवीन कल्पनांना आत्मसात करणारी असली पाहिजे ज्यामध्ये त्यांच्या कृतिशिलतेला वाव असून, महत्त्व असून त्यांना स्वत:ला त्यांचे मत मांडता आले पाहिजे.

४ड.४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सांमजस्यासाठी शिक्षण :-

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरु यांनी म्हटले आहे की, भारतासाठी पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशाची एकता टिकवून ठेवणे, ही एकता फक्त राजकीयच नसून जनतेच्या मनाची आणि ह्रदयाची एकता असली पाहिजे.

विविधतेने नटलेले राष्ट्र म्हणजे आपला भारत देश होय. भारतात भाषावादामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच देशाच्या संरक्षणासाठी आणि संपन्नतेसाठी राष्ट्रीय एकात्मता असणे खूप महत्त्वाचे आहे.

इ.स. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पद्धतीतून राष्ट्रीय आणि सामाजिक एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला आहे तसेच 'सर्वसामान्य शाळा' स्थापण्याची शिफारससुद्धा केली.

मे १९६१ मध्ये भारत सरकारने भावनिक एकात्मता नावाची समिती स्थापन केली. त्याच्या नुसार शिक्षण हे असे माध्यम आहे ज्या द्वारे आपण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधू शकतो. म्हणूनच शिक्षणाचा उद्देश हा केवळ ज्ञान देणे हा नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होय. विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णूता, त्यागाची भावना, राष्ट्रप्रेम आणि आंतरराष्ट्रीय सांमजस्य राखण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये रुजविली पाहिजे.

याचाच परिणाम म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाने 'सर्वसाधारण शिक्षण पद्धतीचा' अवलंब केला.

आणि आंतरराष्ट्रीय व्यक्तिच्या चारित्र्याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच राष्ट्राच्या समस्या, सांस्कृतिक वारसा तसेच भारतीय शूर विरांच्या कथांचाही समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर शाळांमध्ये पथनाट्य, तसेच सर्व राष्ट्रीय सण साजरे करण्यात येतात ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजविली जाते.

४ड.५ प्रश्न :-

१) आधुनिक शिक्षण पद्धतीची आव्हाने कोणती ?

२) विविध समित्या आणि आयोग विविध आव्हानांना तोंड कसे देणार आहेत ?

३) आधुनिक शिक्षणाच्या नवीन प्रथांचे वर्णन करा.

४) आधुनिक् शिक्षण पद्धतीचे उद्दिष्ट्ये थोडक्यात लिहा.

❖❖❖❖

४इ

शिक्षण आणि मानवी गरजा

घटकाचे स्वरुप :-

४इ.० प्रस्तावना

४इ.१ उद्दिष्ट्ये

४इ.२ संकल्पना (अमूर्त मांडणी)

४इ.३ मानवी साधनाच्या विकासाचे कौशल्य

४इ.४ सारांश

४इ.० प्रस्तावना :-

स्वातंत्र्यपूर्व भारताला बऱ्याचशा समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यामध्ये दारिद्र्य, निरक्षरता यांचा प्रामुख्याने समावेश होतो आणि म्हणून भारतीय समाजाने या समस्या सोडविण्यासाठी खूप शक्तीशाली साधन वापरले ते म्हणजे शिक्षण होय.

शिक्षणाचा संख्यात्मक आणि गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी बऱ्याचशा समित्या व आयोगांनी प्रयत्न केले. त्यामध्ये त्यांनी अभ्यासक्रम, मूल्यमापन तंत्राचा उपयोग केला.

पारंपारिक शिक्षण पद्धती आणि आरक्षित शिक्षणपद्धती सुधारण्यास बऱ्याचशा प्रमाणात अभ्यासक्रम नियोजनकर्ते, शिक्षणमंत्री, शिक्षक प्रशिक्षक, शिक्षणतज्ज्ञ यांनी खूप प्रयत्न केले.

४इ.१ उद्दिष्ट्ये :-

लोकशाही राष्ट्रात मानवी संसाधनाच्या भूमिका पुढीलप्रमाणे :-

- मानवी संसाधन विकासाची संकल्पना स्पष्ट करुन देणे.
- मानवी संसाधनाची गरज व महत्त्व ओळखणे.
- एकविसाव्या (२१व्या) शतकातील मानवी संसाधनाच्या विकासाच्या कौशल्याची मांडणी करणे.

४इ.२ मनुष्यबळ विकासाची संकल्पना :-

ज्ञानाच्या उत्क्रांतीमुळे आणि ज्ञानाच्या विस्फोटामुळे स्पर्धात्मक युग सुरु झाले आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला त्यांची इच्छा नसताना जबरदस्तीने कृतीशील

बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रत्येक ठिकाणी त्यांच्याकडून चांगल्या सादरीकरणाची अपेक्षा केली जात आहे.

आजचा अध्ययनकर्ता (विद्यार्थी) ज्ञान आणि शहाणपणा या दोन गोष्टी मनुष्याची शस्त्रे आहेत असे मानतो तसेच तंत्रज्ञान आणि तर्कशक्ती ह्या मानवी मेंदूची कवच आहेत.

प्रत्येक चार वर्षाला ज्ञानामध्ये दुप्पट भर पडते. आणि अध्ययनकर्त्यांला ते ज्ञान आणि विविध कौशल्या स्वत:ला सिद्ध करण्यासाठी परिणामकारकरित्या आत्मसात करावी लागतात. फक्त उत्पादनशील म्हणजेच कौशल्यपूर्ण कामगार आजच्या बदलत्या समाजामध्ये टिकू शकतो.

तंत्रज्ञान आणि ज्ञानातील प्रगतीमुळे व्यापकता, जागतिकीकरण आणि खाजगीकीकरण या गोष्टींना वाव मिळत आहे. म्हणूनच शिक्षण आणि उद्योगधंद्यातील गुणात्मक व संस्थात्मक वाढीला प्रोत्साहन दिले जात आहे.

लाँगवर्थ आणि डेविस यांच्या मते, मानवी शक्तीचा विकास हा त्याला केलेल्या सतत साह्यामुळे व प्रोत्साहनामुळे होतो. यामध्ये शिक्षण ग्रहण करणे, विविध कौशल्य व मूल्ये आत्मसात करणे ही होय. आणि मिळालेल्या ज्ञानाचा वापर खूप आत्मविश्वासाने, कृतीशीलतेने व तेथील पर्यावरणात आनंद घेऊन करावे.

तरुण पिढी खूप स्पर्धात्मक युगात प्रवेश करत आहे. ज्यामध्ये प्रत्येक स्तरावर व पैलूंमध्ये बदल होत आहे. जसे वैज्ञानिक, तांत्रिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि उद्योगधंद्यात होणारा बदल आणि अशा बदलत्या जगामध्ये अध्ययनकर्त्यांला फक्त समाजाशी दक्ष असले पाहिजे.

२१ व्या शतकातील अध्ययनकर्त्यातंला खालील गोष्टी आत्मसात कराव्या लागतील जेणेंकरुन त्यांचा सर्वांगीण विकास होईल.

१) वाचन
२) लेखन
३) संख्यात्मक प्रगती (मोजणी करणे)
४) तोंडी संप्रेषण
५) वैयक्तिक मूल्ये – नम्रता आणि विश्वसनीयता
६) समस्या निराकरण
७) युक्तिवाद (कारणे शोधणे)
८) नेतृत्त्वगुण आणि प्रेरणा
९) विविध मानसशास्त्रीय विषय सोडविण्याची क्षमता
१०) व्यावसायिक क्षमता
११) व्यक्तिगत क्षमता (कौशल्य, मूल्य, वृत्ती इत्यादी)

४इ.३ मानवी संसाधनाच्या विकासाची कौशल्य – पुढीलप्रमाणे :-

- अध्ययनकर्त्यांची खरी क्षमता ओळखणे.
- योग्य प्रशिक्षणाची योजना ज्यादृारे समाजातील विद्यार्थ्यांना तयार करणे.
- उच्च शिक्षणापेक्षा तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्य वाढविणे.
- जागतिक पर्यावरणाच्या गरजा व आकांक्षानुसार अभ्यासक्रमाचा क्रम ठरविणे.
- घटकाचे वेळोवेळी मूल्यमापन करणे जेणेंकरुन सतत प्रगती साधता येईल.
- शिक्षणामध्ये अध्ययनकर्त्याला लवचिकता पूरविणे.

२१व्या शतकाच्या अध्ययनकर्त्यांमध्ये प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांचे आकलन होण्यासाठी खालील पाच शिस्तप्रिय बाबींचा अवलंब केला पाहिजे.

- व्यक्तिगत प्रभुत्व
- मानसिक चित्ररुप
- सहविचारात्मक दृष्टी
- गट अध्ययन पद्धती आणि गट चर्चा
- पद्धतशीर विचारसरणी

समाजाच्या दृष्टिकोनातून मनुष्यबळाच्या विकासासाठी योग्य असे प्रशिक्षण आवश्यक आहे. जेणेकरून समाजातील दारिद्र्य, निरक्षरता, जातीवाद, वर्गविषमता, दहशतवाद, साम्यवाद, प्रादेशिकवाद, लिंगभेद आणि इतर सामाजिक समस्या ज्या राष्ट्राच्या विकासास आणि आंतरराष्ट्रीय सांमजस्यासाठी घातक आहेत आणि अशा प्रकारच्या समस्या अध्ययनकर्ता योग्य प्रशिक्षणाद्वारे सोडवू शकेल.

मनुष्यबळ-अस्तित्त्व बाबतची पेचप्रसंग सोडविण्याची क्षमता :-

२१व्या शतकातील तंत्रज्ञानामधील प्रगतीमुळे प्रत्येक व्यवसायात काम करणाऱ्या लोकांमध्ये त्यांच्या ओळखीबाबत पेचप्रसंग निर्माण झाला आहे. प्रशिक्षित व्यक्तिमध्ये तेवढे धैर्य आणि क्षमता आली पाहिजे जेणेंकरुन तांत्रिक आव्हानांवर ताबा मिळविता येईल.

मनुष्यबळाची जागतिक दृष्टी व वेग (तीव्रता) :-

व्यावसायिक मनुष्यबळ हे जागतिक समाजामध्ये यश मिळविण्याचे साधन आहे. २१व्या शतकातील अध्ययनकर्त्यांला जगाच्या गतीची जाणीव असली पाहिजे व त्यानुसार त्यांनी आपली दृष्टी जागरुक ठेवली पाहिजे.

मनुष्यबळ आणि व्यवस्थापन कौशल्य :-

व्यवस्थापन कौशल्यामध्ये मनुष्य हा चांगला संवाद साधणारा असावा. या माहितीच्या युगामध्ये एखाद्या व्यक्तीला स्वत:चे मत व कल्पना व्यवस्थितपणे दुसऱ्यासमोर मांडता याव्यात.

४इ.४ सारांश :-

२१ व्या शतकात मानवाची भूमिका एकदम बदलली आहे. मनुष्याला प्रशिक्षणाची खूप गरज आहे तसेच त्याने त्याची कर्तव्य ही व्यवस्थित पार पाडली पाहिजेत. त्याने बदलत्या परिस्थितीनुसार चांगले नागरिक निर्माण करायला पाहिजेत. जे पुढे चालून विज्ञानातील संशोधन, तंत्रज्ञानातील प्रगतीमध्ये हातभार लावतील.

तुमची प्रगती तपासा :-

१) मनुष्यबळ ही संकल्पना स्पष्ट करा.

२) आधुनिक समाजासाठी मनुष्यबळातील विकासावर चर्चा करा.

३) कामामध्ये (कार्यामध्ये) शिक्षणातील पेचप्रसंग कसा निर्माण होतो, स्पष्ट करा.

❖❖❖❖

५अ

अनौपचारिक शिक्षण

घटकाचे स्वरुप :-

५अ.० उद्दिष्ट्ये

५अ.१ प्रस्तावना

५अ.२ अनौपचारिक शिक्षणाची संकल्पना

५अ.३ अनौपचारिक शिक्षणाची आवश्यकता

५अ.४ अनौपचारिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये

५अ.५ अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व

५अ.६ अनौपचारिक शिक्षणाचा ऐतिहासिक विकास

५अ.७ अनौपचारिक शिक्षण-सद्यस्थिती

५अ.८ सारांश

५अ.० उद्दिष्ट्ये :-

आपण हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्यात पुढील बदल दिसून येतील.

- अनौपचारिक शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करणे.
- अनौपचारिक शिक्षणाच्या आवश्यकतेविषयी चर्चा करणे.
- अनौपचारिक शिक्षणाचे उद्दिष्ट्य स्पष्ट करणे.
- अनौपचारिक शिक्षणाच्या महत्त्वाविषयी चर्चा करणे.
- औपचारिक व अनौपचारिक शिक्षण याबाबत तुलना करणे.
- अनौपचारिक शिक्षणाच्या ऐतिहासिक विकासाबाबत पुर्नविचार करणे.
- अनौपचारिक शिक्षणाच्या सद्यस्थितीविषयी चर्चा करणे.

५अ.१ प्रस्तावना :-

शिक्षण मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे. प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच आपल्या राज्यघटनेच्या ४५व्या कलमामध्ये 'ही राज्यघटना अमलात आल्यापासून दहा वर्षाच्या आत या देशशतील सर्व मुलांमुलींना त्याच्या वयाची १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्यासाठी हे शासन प्रयत्नाची पराकाष्ठा करील' अशी ग्वाही देण्यात आली आहे.

व्यक्ती आणि राष्ट्राच्या विकासामध्ये शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाची मुख्य फायदे खालीलप्रमाणे :-

१) सुधारित उत्पादनाची विभागणी सामाजिक गतिशीलता
२) वर्तन आणि मूल्य यामध्ये बदल
३) राजकीय नेतृत्त्व
४) अल्प बेरोजगारी
५) मानवी कौशल्य
६) जास्त आणि चांगल्या प्रतिचे संशोधन

मुले शाळेत दाखल न होण्याची आणि गळतीची अनेक कारणे आहेत. यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. आर्थिक अडचणींमुळे वयाच्या ७व्या / ८व्या वर्षी काही मुलांवर कुटुंबाची जबाबदारी येते. यावेळी या कामकरी मुलांसाठी ही पूर्णवेळ भरणारी पारंपारिक शाळा उपयोगी पडत नाही.

अशा वेळी घटनेमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करण्यासाठी पूर्णवेळ शाळांना काही पर्याय शोधणे आवश्यक आहे. साधारणपणे शिक्षणाचे तीन प्रकार पडतात.

१) सहज शिक्षण (Informal Education)
२) औपचारिक शिक्षण (Formal Education)
३) अनौपचारिक शिक्षण (Non-Formal Education)

१) सहज शिक्षण :-

शिक्षण ही एक नैसर्गिक व स्वयंपूर्ण प्रक्रिया आहे. माणूस सतत शिकत असतो. घर, शेजारी, समाज यातूनही व्यक्ती शिकत असते. अगदी सहजपणे जे काही ज्ञान मिळते त्यालाच सहजशिक्षण असे म्हणतात. कधी ही शिकण्याची प्रक्रिया नकळत होते तर कधी जाणीवपूर्वक जीवन जगत असताना व्यक्तीला अनेकविध अनुभव येत असतात.

२) औपचारिक शिक्षण :-

'औपचारिक शिक्षण म्हणजे वय, स्थळ, वेळ, अभ्यासक्रम व मूल्यमापन याबाबत साचेबद्धपणे दिले जाणारे शिक्षण होय.' पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या औपचारिक शिक्षणामध्ये समावेश होतो.

३) अनौपचारिक शिक्षण :-

'जे शिक्षण सहजही नाही आणि औपचारिकही नाही त्या शिक्षणाला अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात.'

५अ.२ अनौपचारिक शिक्षणाची संकल्पना :-

'जे शिक्षण मुद्दाम दिले जात नाही, ज्यासाठी ठराविक अभ्यासक्रम नाही, ज्यात चाकोरीचा अभाव असतो व जे सहजपणे मिळते ते अनौपचारिक शिक्षण होय.'

५अ.२.१ व्याख्या :-

१) कम्बस आणि अहमद यांच्या मतानुसार, "अनौपचारिक शालेय शिक्षणाच्या चौकटीबाहेर संघटित केलेली, पद्धतशीर शैक्षणिक कृती म्हणजे अनौपचारिक शिक्षण होय."

२) इव्हान इलिच यांच्या मतानुसार, "अनौपचारिक शिक्षण म्हणजे ज्ञानाचा, कौशल्याचा हवा त्यावेळी निश्चित उपयोग करावयास लावणारे समाज परिवर्तनाचे साधन होय."

३) जे. पी. नाईक यांच्या मतानुसार, "लोकांनी, लोकांसाठी केलेले लोकांचे शिक्षण म्हणजे अनौपचारिक शिक्षण होय."

- अनौपचारिक शिक्षणातील कार्यक्रम हे व्यवस्थित व नियोजनबद्ध अंमलात आणले पाहिजे.
- अनौपचारिक शिक्षण हे कृतिशील असले पाहिजे.
- अनौपचारिक शिक्षण हे उद्दिष्टांना धरुन नाविण्यपूर्ण असावे.
- ही सोपी त्याचबरोबर अवघड पद्धती आहे.
- ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.
- ही बहुउद्देशीय व शिस्तप्रिय प्रक्रिया आहे.
- यामुळे लोकांचे जीवन सुधारण्यास मदत होते.
- याच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांचा अभ्यास करता येतो.
- औपचारिक शिक्षण पद्धतीला अनौपचारिक शिक्षण हा एक पर्याय आहे.

५अ.२.२ अनौपचारिक शिक्षणाचे स्वरुप :-

अनौपचारिक शिक्षणामध्ये विशिष्ट असा ठराविक साचा नसल्यामुळे, सर्जनशीलता व नवनवीन प्रयोगांना वाव असतो. यामध्ये विविधता, सहजता व लवचिकता असते. शिकण्याची इच्छा असणारा शिक्षण घेतो. प्रत्येकजण आपल्या आवडीप्रमाणे, कुवतीप्रमाणे, सोईप्रमाणे, इच्छेप्रमाणे शिक्षण घेत असतो. या शिक्षणाला ठराविक चौकट नसते. पण यामध्ये योग्य पद्धतीचाच वापर केला जातो.

- अनौपचारिक शिक्षण हे गरजानुवर्ती असते.
- यामध्ये लवचिकता असते.
- अनौपचारिक शिक्षणामध्ये स्थानिक संदर्भ असतात.
- यामध्ये शिकणाऱ्यांच्या सोई-सुविधाचा विचार करण्यात येतो.

- यामध्ये स्थानिक जनतेचा सहभाग असतो.
- शिकणाऱ्यांच्या गरजेनुसार, वेळेत लवचिकता आणून त्या-त्या ठिकाणचे स्थानिक संदर्भ लक्षात घेऊन हे शिक्षण दिले जाते.
- शिक्षण घेणाऱ्या मुलां-मुलींच्या घरापासून जवळच शिक्षणाची सोय केली जाते.
- गावातील लोक मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतात.
- या वर्गात शिकणारी मुले काहीतरी काम करुन घराला हातभार लावत असतात.
- प्रत्येक व्यक्तिला शिक्षणाची संधी मिळते.

अनौपचारिक शिक्षण वर्गात येणारे विद्यार्थी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे आहेत. त्यांचा वयोगट, कुवत, शारीरिक, भावनिक, बौद्धिक भेद या सर्वांचा अभ्यास अनौपचारिक शिक्षण वर्गाच्या शिक्षकाला करावा लागतो.

५अ.२.३ अनौपचारिक शिक्षणाचे खास वैशिष्ट्ये :-

- लवचिकता
- अभ्यासक्रमाशी संबंधित
- विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्ययन-अध्यापन पद्धती
- व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण
- शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
- शिक्षणाबद्दल गोडी निर्माण करणे.
- पुढील शिक्षणास प्रवृत्त करणे.
- जीवनाचा दर्जा सुधारणे.
- जीवनमूल्यांची जाणीव करुन देणे.
- उत्तम नागरिकत्वांची जाणीव निर्माण करणे.
- निरोगी जीवनासाठी आवश्यक क्षमता व वृत्ती विकास करणे.
- वाढत्या लोकसंख्येच्या परिणामाची जाणीव करुन देणे.
- वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याची जाणीव निर्माण करणे.

५अ.२.४ अनौपचारिक शिक्षणाचे वर्गीकरण :-

अनौपचारिक शिक्षणाचे वर्गीकरण दोन विभागात करण्यात येते. ते पुढीलप्रमाणे :-

१) केंद्रीभूत घटक
२) शिकण्याची धारणाशक्ती



५अ.२.५ अनौपचारिक शिक्षणाच्या संस्था :-

१) महाविद्यालये आणि विद्यापीठ
२) केंद्र, राज्य आणि स्थानिक सरकार
३) निम-सरकारी विभाग
४) बँक
५) सार्वजनिक क्षेत्र
६) खाजगी क्षेत्र
७) व्यापारी संघटना
८) अशासकीय संस्था

५अ.२.६ अनौपचारिक शिक्षणाच्या अध्यापनातील कार्यक्रम :-

अनौपचारिक शिक्षणाच्या अध्ययनातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे :-

१) निरक्षर प्रौढांचे शिक्षण
२) बाळाची काळजी घेणारे केंद्र व शिक्षण केंद्र
३) शाळा आणि महाविद्यालयातील शिक्षण आणि प्रशिक्षणातील गळती
४) बेकार व बेरोजगारांना प्रशिक्षण
५) कृषिविषयक प्रशिक्षण
६) आरोग्य सेवा पुरविणाऱ्यांना प्रशिक्षण
७) कुटुंबनियोजनात्मक प्रशिक्षण
८) गाव पातळीवर काम करणाऱ्या ग्रामसेवकांना प्रशिक्षण
९) व्यवस्थापन प्रशिक्षण
१०) गिरणी कामगार प्रशिक्षण

तुमची प्रगती तपासा :

१) शिक्षणपद्धतीतील तीन नावे लिहा.
२) औपचारिक व अनौपचारिक शिक्षणातील फरक स्पष्ट करा.

३) अनौपचारिक शिक्षणातील दोन केंद्रीभूत घटकाची नावे लिहा.

४) अनौपचारिक शिक्षणातील कोणत्याही पाच कार्यक्रमाची चर्चा करा.

५) अनौपचारिक शिक्षणाची चार खास वैशिष्ट्ये लिहा.

५अ.३ अनौपचारिक शिक्षणाची आवश्यकता :-

राज्यघटनेतील ४५व्या कलमाच्या तरतूदीनुसार सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी १९८६ च्या शैक्षणिक धोरणात अनौपचारिक शिक्षणाचा एक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

अनौपचारिक शिक्षणात वयाची ,कालावधीची, पूर्वशिक्षणाची अट अतिशय लवचिक असते. शिक्षणाऱ्यांच्या गरजेनुसार विषय ठरलेले असतात. त्याच्या शिकण्याच्या गतीनुसार कालमर्यादा निश्चित केली जाते. पास–नापासीचे बंधन नसते. शिक्षणाचे ठिकान व वेळ, समाजाची गरज, आवड व सवड यावर ठरविली जाते.

मानवाला जेव्हा कुटुंबातून होणारे सहज शिक्षण अपुरे वाटू लागले. औद्योगिक प्रगती आणि प्रचंड लोकसंख्येला असणारी शिक्षणाची गरज औपचारिक शिक्षाच्या चौकटीमुळे भागेनाशी झाली. तेव्हा अनौपचारिक शिक्षणाची गरज वाटू लागली. खालील कारणांसाठी अनौपचारिक शिक्षणाची गरज भासू लागली.

१) राष्ट्र, समाज, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी

२) नवीन ज्ञान संपादन करण्यासाठी

३) अध्ययनार्थी व पालक यांच्या गरजा भागविण्यासाठी

४) अध्ययनार्थीला आपल्या आवडीचा विषय शिकण्यासाठी

५) ऐपतीप्रमाणे शुल्क देऊन एखादे कौशल्य शिकण्यासाठी

६) अध्ययनार्थीच्या सोईच्या वेळेत शिक्षण मिळण्यासाठी

७) स्वावलंबी होण्यासाठी कौशल्याची प्राप्ती करण्यासाठी

८) नोकरी मिळविण्यासाठी

९) स्वत:च्या व्यवसायात प्रगती करण्यासाठी

१०) बेकारी कमी करण्यासाठी

११) लोकशाहीच्या तत्त्वाचे पालन करण्यासाठी

अनौपचारिक शिक्षणामुळे अशा अनेक गरजांची पूर्ती होत असल्यामुळे आज अनौपचारिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

५अ.४ अनौपचारिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

अनौपचारिक शिक्षणपद्धतीची खालील उद्दिष्ट्ये सांगता येतील.

१) जे विद्यार्थी प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे व गळती कमी करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल गोडी निर्माण करणे.

३) मुलांच्या भाषिक विकास करुन श्रवण, भाषण, वाचन, लेखन या क्षमता विकसित करणे.

४) विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणास प्रवृत्त करणे.

५) मुलांमध्ये किंवा विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

६) जीवनाचा दर्जा सुधारणे.

७) विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक दृष्टिकोन विकसित करणे.

८) विद्यार्थ्यांना जीवन मूल्यांची जाणीव करुन देणे.

९) उत्तम नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे.

१०) विद्यार्थ्यांच्या निरोगी जीवनासाठी आवश्यक क्षमता व वृत्तींचा विकास करणे.

११) वाढत्या लोकसंख्येच्या परिणामांची जाणीव करुन देणे.

१२) वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याची जाणीव निर्माण करणे.

अनौपचारिक शिक्षण ही संघटित व पद्धतशीर व्यवस्था आहे. अनौपचारिक शिक्षणातून व्यक्तीचा, समाजाचा व राष्ट्राचा सर्वांगीण विकास करणे हे प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) अनौपचारिक शिक्षणाच्या आवश्यकतेविषयी चर्चा करा.

२) अनौपचारिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये लिहा.

_____

_____

_____

_____

_____

५अ.५ अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व :-

अनौपचारिक शिक्षण पद्धतीचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) साक्षरता वाढविणे.
२) सामाजिकदृष्ट्या अप्रगत घटकातील विद्यार्थ्यांची गळती कमी करणे.
३) उत्पादकता वाढविणे.
४) अनौपचारिक शिक्षणासाठी वयाची अट नाही.
५) व्यक्तीच्या आवडी व सवडीप्रमाणे शिक्षण घेता येते.
६) या पद्धतीतील शिक्षणासाठी पूर्वीच्या शिक्षणाची अट नाही.
७) स्वयं अध्ययनासाठी अधिकाधिक प्रेरणा व मार्गदर्शन करण्यात येते.
८) विद्यार्थ्यांच्या सोईनुसार शाळेच्या वेळेत, अध्यापन पद्धतीमध्ये बदल केला जातो.
९) विद्यार्थ्यांमध्ये जीवन मूल्यांची जाणीव निर्माण करणे.
१०) उत्तम नागरिकत्त्वाची निर्माण करणे.
११) शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांना मदत करणे.
१२) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास करणे.
१३) प्रत्येक व्यक्तीला पारंपारिक व्यवसायाचे शिक्षण देणे.
१४) बेकारी कमी करण्यासाठी.

तुमची प्रगती तपासा :

१) राष्ट्राच्या विकासासाठी अनौपचारिक शिक्षण आवश्यक असण्याची कारणे लिहा.

_____

_____

_____

_____

_____

५अ.६ अनौपचारिक शिक्षणाचा ऐतिहासिक विकास :-

५अ.६.१ ब्रिटिश पूर्व काळ :-

भारतीय समाजामध्ये अनौपचारिक शिक्षणपद्धती हा अविभाज्य घटक होता. कुटुंबातील वडीलधारी मंडळी स्वतः आत्मसात केलेली कौशल्य त्यांच्या कुटुंबातील इतर

सदस्यांमध्ये रुजवत असत तसेच तरुण मुले विविध व्यावसायिक कौशल्यात (शिक्षणात) वडीलधाऱ्या माणसांना हातभार लावायचे. अशा प्रकारे प्राचीनकाळी अनौपचारिक शिक्षणपद्धतीची देवाणघेवाण होत असे.

- शारीरिक शिक्षण व त्याचे प्रशिक्षण व्यायामशाळा किंवा आखाडा यामार्फत दिले जात होते.
- अनौपचारिक शिक्षण पद्धतीत साक्षरता महत्त्वाची नसून तोंडी संवाद (संप्रेषण) आणि प्रत्यक्ष सहभाग आवश्यक आहे.
- वेगवेगळ्या वयोगटानुसार विविध अनौपचारिक शिक्षणपद्धती समाजामध्ये चालू होत्या.

५अ.६.२ ब्रिटिश काळ :-

ब्रिटिश प्रशासनाने पारंपारिक शिक्षणपद्धतीच्या ठिकाणी आधुनिक औपचारिक शिक्षण पद्धती सुरु करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा उद्देश पाश्चात्य विज्ञान आणि साहित्याचा इंग्रजी माध्यमाद्वारे प्रसार करणे हा होता. अनौपचारिक शिक्षणपद्धतीकडे त्यांचे पूर्णपणे दूर्लक्ष होते.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटीपर्यंत फक्त बडोदा, म्हैसूर, त्रावणकोर इत्यादी शहरामध्ये अनौपचारिक शिक्षणपद्धती चालू होती.

इ.स. १९३७ मध्ये जेव्हा काँग्रेस सरकार स्थापन झाले. त्याकाळी कांही प्रांतातच प्रौढ शिक्षण आणि साक्षरता अभियान चालू झाले.

इ.स. १९३९ मध्ये CABE समिती नियुक्त करण्यात आली. ज्याचा उद्देश साक्षरता अभियानातील समस्या सोडविणे हा होता. या समितीने खालील बाबी सूचित केल्या.

अ) मोठ्या प्रमाणात प्रौढ शिक्षणाचा प्रसार

ब) मोफत आणि सक्तीचे शिक्षण

क) ऐच्छिक संस्थाचा सहभाग

५अ.६.३ स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७-१९६४) :-

अनौपचारिक शिक्षणाबाबत वेगळे असे प्रयत्न करण्यात आले नाहीत पण शिक्षण हे दोन्ही पद्धतीने चालू होते.

आधुनिक अनौपचारिक शिक्षण हे खालील दोन क्षेत्रांवर नियोजित करण्यात आले.

१) शेतीविषयक

२) कुटुंबनियोजनविषयक

५अ.७ अनौपचारिक शिक्षणातील सद्यस्थिती :-

अनौपचारिक शिक्षणाबाबत महत्त्वाचा बदल झाला जेव्हा कोठारी आयोगाने नमूद केले की शिक्षणाची औपचारिक शाळेसोबत तुलना करता येत नाही त्याचबरोबर अनौपचारिक शिक्षणाच्या विकासाची आवश्यकता आहे. जसे,

१) पायाभूत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

२) प्रौढ निरक्षरतेचे निर्मूलन (उच्चाटन)

३) गरीब आणि कामगार वर्गासाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा पुरविणे.

४) सर्वांसाठी आयुष्यभर चालणाऱ्या शिक्षणाची सुविधा निर्माण करणे.

५) शिकणाऱ्या समाजाची निर्मिती करणे.

अनौपचारिक शिक्षणाचा प्रसार आणि त्यात सुधारणा झाल्या त्यामुळे खालील गोष्टी पूर्ण झाल्या.

अ) १६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना अनौपचारिक शिक्षण मिळाले आणि

ब) १५ ते ३५ वर्षे वयोगटातील प्रौढांना प्रौढशिक्षण

एकूण ११० दुर्बल जिल्ह्यांची निवड करुन तेथे विविध प्रकारचे कार्यक्रम सुरुवात करण्यात आले होते. ज्यामध्ये राज्य आणि केंद्रशासनाने पूरविलेल्या आर्थिक निधीतून एकूण ६००० केंद्रे कार्यरत होती.

५अ.७.१ १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-

- शाळेतील गळती थांबविण्यासाठी आणि कामकरी मुलांमुलीसाठी (जे शाळेमध्ये जाऊ शकत नाहीत) बरेचशे शैक्षणिक कार्यक्रम १९८६ च्या राष्ट्रीय धोरणाने आखले आहेत.
- विषमता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक सुसंधी सर्वांना समान करण्यासाठी विशिष्ट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. एवढेच नव्हे, तर अनुसूचित जाती व जमातीतील लोकांचा शैक्षणिक दर्जा व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला ज्यामध्ये सहशालेय कार्यक्रमांना महत्त्वाचे स्थान दिले गेले. ज्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आकर्षक व रुचकर बनली.
- समाजातून निस्वार्थी आणि हुशार व्यक्तींची मार्गदर्शक (शिक्षक) म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि त्यांना प्रत्येक वर्षी २० ते ३० दिवसाचे प्रशिक्षण दिले गेले.
- यामध्ये विशिष्ट लक्ष दिले गेले ते मार्गदर्शक म्हणून निवडलेल्या स्त्रियांकडे.
- यामध्ये पर्यवेक्षकांनासुद्धा योग्य पद्धतीने प्रशिक्षण दिले गेले.
- चांगल्या प्रतीच्या शैक्षणिक साहित्याचा विकास करुन ते अनौपचारिक केंद्रातील विद्यार्थ्यांना मुफ्त वाटप करण्यात आले.
- शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल अशा एकूण १० राज्यामध्ये केंद्रशासनातर्फे अनौपचारिक केंद्र सुरु करण्यात आली.

- राज्यसरकार तसेच ऐच्छिक संघटनांना विशिष्ट मदत दिली गेली. ज्यामध्ये १.५ लाख केंद्रे सुरु करण्यात आली. ती खालीलप्रमाणे :
  अ) अनौपचारिक सामान्य केंद्रे – ५०%
  ब) मुलींसाठी अनौपचारिक केंद्रे – ९०%
  क) प्रकल्प – ऐच्छिक संघटना (संस्था) – १००%
  ड) नवीन प्रकल्प – १००%
- यामध्ये कष्ट करणाऱ्या मुलांसाठी शैक्षणिक प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे.

५अ.७.२ सुधारित योजना :-

- अनौपचारिक शिक्षणाचे कार्यक्रम आता प्रकल्परुपात आंमलात आणले जात आहेत.
- यामध्ये ऐच्छिक संस्था व पंचायत राज यांचा समावेश आहे.
- या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा विकास करण्यात आला.

तुमची प्रगती तपासा :

१) ब्रिटिशांनी अनौपचारिक शिक्षणात त्यांचे योगदान दिले नाही असे का म्हटले जाते ?
२) भारतातील अनौपचारिक शिक्षणाच्या विकासात कोठारी आयोगाला मौल्यवान मोती असे का म्हणतात ?
३) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अनौपचारिक शिक्षणातील योगदान यावर चर्चा करा.

५अ.८ सारांश :-

- व्यक्तिच्या आणि राष्ट्राच्या विकासात शिक्षण खूप महत्त्वाची भूमिका बजावते.
- भारतातील प्रचंड अशा लोकसंख्येच्या शैक्षणिक गरजांसाठी औपचारिक शिक्षणपद्धती ही औपचारिक शिक्षणपद्धती ही औपचारिक शिक्षण पद्धतीची एक आदर्श पद्धत म्हणून ओळखली जाते.
- औपचारिक शिक्षणपद्धती व्यतिरिक्त अनौपचारिक शिक्षण पद्धती ही नियोजित शैक्षणिक योजना आहे.

- प्रवेशप्रक्रिया, कालावधी (कार्यकाल), शैक्षणिक कार्यक्रमाच्या वेळा यासाठी ती एक लवचिक पद्धत आहे.
- अनौपचारिक शिक्षणपद्धती ही समाजातील दुर्लक्षित घटकांच्या गरजा पूर्ण करते.
- अनौपचारिक शिक्षणपद्धती व्यक्तीच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यास मदत करते.
- अनौपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये अध्यापनापेक्षा अध्ययनावर जास्त भर दिलेला असतो.
- अनौपचारिक शिक्षणपद्धती जर व्यवस्थितपणे नियोजित असेल तरच ती यशस्वी होऊ शकते.
- मार्गदर्शक (शिक्षक) आणि पर्यवेक्षकांना व्यवस्थित प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.
- अनौपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये निरक्षरांना शिक्षण, प्रौढ शिक्षण, विद्यार्थ्यांची शाळेतील गळती, स्त्री शिक्षण आणि बेरोजगारांना प्रशिक्षण इत्यादी समस्यांचे निराकरण केले जाते.
- प्राचीन भारतामध्ये अनौपचारिक शिक्षण पद्धती ही महत्त्वाचा शैक्षणिक घटक होता.
- खऱ्या अर्थाने अनौपचारिक शिक्षणाला कोठारी आयोगाच्या शिफारशी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळेच वेगळेपण आणि महत्त्व अशा प्रकारचे स्वरुप प्राप्त झाले.

❖❖❖❖

५ब

प्रौढ शिक्षण

घटकाचे स्वरुप :-

५ब.० उद्दिष्ट्ये

५ब.१ प्रौढ शिक्षणाचा ऐतिहासिक विकास

५ब.२ इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU)

५ब.३ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (VCMOU)

५ब.४ मुक्त आणि पारंपारिक (रुढीबद्ध) विद्यापीठाने पूरविलेले शिक्षण

५ब.० उद्दिष्ट्ये :-

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्यात पुढील बदल दिसून येतील.

- भारतातील प्रौढ शिक्षणाचा विकास स्पष्ट करणे.
- कोठारी आयोगाच्या शिफारशी स्पष्ट करणे.
- राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करणे.
- राष्ट्रीय साक्षरता मिशननी केलेल्या कार्याची चर्चा करणे.
- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्य सांगणे.
- मुक्त विद्यापीठाने दिलेले व पारंपारिक (रुढीबाह्य) विद्यापीठाने दिलेल्या शिक्षणामध्ये फरक स्पष्ट करणे.

५ब.१ प्रौढ शिक्षण :-

५ब.१.१ पूर्व ब्रिटिश काळ :-

- शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे जी भेटीद्वारे, वादविवादाद्वारे व परिषदेच्या माध्यमातून दिले जाते.
- प्रवास आणि सहल हे प्रौढ शिक्षणाचे महत्त्वाचे माध्यम होते.
- रामायण आणि महाभारत या महाकाव्यातून लोकशिक्षणाला भरभराटी आली.
- किर्तनाच्या माध्यमातून बऱ्याच संतांनी, कवींनी आणि धार्मिक संतांनी शिक्षणाचा प्रसार केला.

- सिनेमा गृहे, नृत्य (नाट्यगृहे), रामलिला आणि लोकसंस्कृती इत्यादीद्वारे शिक्षण आणि करमणूक या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे साधल्या गेल्या.

५ब.१.२ ब्रिटिश काळ :-

- या काळात काही प्रमाणात प्रौढ शिक्षण अस्तित्त्वात होते. म. गांधीनी प्रत्येक जिल्हा साक्षर करण्यासाठी खूप मोहिमा राबविल्या.
- बडोदा येथील राज्यकर्त्यांने साक्षरतेचा प्रचार केला एवढेच नव्हे तर तेथील लोकांना ग्रंथालयेसुद्धा उपलब्ध करुन दिली. त्याकाळचे सुरत हे राज्य पूर्ण साक्षर म्हणून ओळखले जाऊ लागले पण सातत्याच्या अभावामुळे साक्षरता मिशन अयशस्वी ठरली.
- इ.स.१९२२ मध्ये पंजाब सरकारने प्रौढ शिक्षण केंद्रे स्थापन केली.
- कर्नाटका प्रौढ शिक्षण मंडळ, गुजरात सामाजिक शिक्षण समिती, बाम्बेसिटी सामाजिक शिक्षण इत्यादी ऐच्छिक संघटना प्रौढशिक्षणामध्ये कार्यरत होत्या.

५ब.१.३ स्वातंत्र्योत्तर काळ :-

- स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून निरक्षरतेचे उच्चाटन करणे हे भारत सरकारचे उद्दिष्ट्य होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रौढ शिक्षणाला मौलाना आझादचे सामाजिक शिक्षण असे नाव दिले गेले आणि तो समाज विकासाचा एका अविभाज्य घटक बनला.
- सर्व राज्यांनी साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी बरेचशे प्रयत्न केले. इ.स.१९५९ साली सातारा जिल्ह्यात सुरु झालेली ग्राम शिक्षण मोहिम ही एक यशस्वी मोहिम समजली जाते.
- दिल्ली विद्यापीठाने इ.स.१९६२ मध्ये अवांतर शैक्षणिक कोर्सेस सुरु केले.
- एवढ्या प्रयत्नानंतरही प्रौढ शिक्षणामध्ये प्रौढ साक्षरतेला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही.

५ब.१.४ कोठारी आयोग (१९६४-६६) :-

कोठारी आयोगाने खालील बाबी सूचित केल्या.

- ६ ते ११ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार.
- ११ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थी जे शाळेपासून वंचित आहेत. व ज्यांनी शाळेतील प्रवेश रद्द केला आहे अशा विद्यार्थ्यांसाठी अर्धवेळ शाळा असावी.
- १५ ते ३० वर्षे वयोगटातील प्रौढ विद्यार्थ्यांना अर्धवेळ आणि व्यावसायिक शिक्षणाच्या सुविधा.
- प्रसार माध्यमे ही फार शक्तीशाली माध्यमे असून त्याचा साक्षरतेच्या प्रसारासाठी उपयोग व्हावा.
- ग्रंथालयाची निर्मिती केली जावी.
- शैक्षणिक कार्यक्रमात सातत्य हवे.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील विद्यापीठ आणि ऐच्छिक शिक्षण संघटनांचा सक्रिय सहभाग.

१९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-

१९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने कोठारी आयोगांच्या शिफारशींना मान्यता देऊन साक्षरतेचे सार्वत्रिकीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्याचबरोबर खालील तीन बाबींना महत्त्व दिले.

अ) मुख्यतः ० ते १४ वर्षे वयोगटातील पायाभूत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण.

ब) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यात अनौपचारिक शिक्षणाचे विविध कार्यक्रम राबविणे.

क) राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या उद्दिष्टानुसार इ.स.१९९७ पर्यंत १०० मिलियन प्रौढांना साक्षर बनविणे.

प्रौढ शिक्षणातील तीन महत्त्वाचे घटक :-

१) साक्षरता

२) कर्तव्य

३) नागरिकत्त्वाची जागरुकता

शिक्षण चालूच ठेवण्यासाठी "Each one, Teach one" प्रत्येकजण प्रत्येकाला शिकवा अशाप्रकारचे सुविचार वापरुन विद्यार्थी व शिक्षित व्यक्तींच्या कल्पनांना दुजोरा (वाव) दिला. पण शेवटी हळूहळू हा कार्यक्रम अयशस्वी (निष्फळ) ठरला.

५ब.१.५ राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम (NAEP) :-

राष्ट्रीय प्रौढ शिक्षण हा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ रोजी सुरुवात करण्यात आला. प्रौढशिक्षण कार्यक्रम राबविणे हा याचा मुख्य उद्देश होता. १५ ते ३५ वर्षे वयोगटातील जवळजवळ १०० मिलियन प्रौढांना साक्षर बनविणे हा होता.

व्यक्तिचा स्वतःचा व त्याच्या सभोवतालच्या परिसरांचा विकास करण्यासाठी त्यांचा कृतिशील सहभाग व स्वयं-अध्ययन याची आवश्यकता होती आणि हा कार्यक्रम काही प्रमाणात यशस्वीसुद्धा झाला.

५ब.१.६ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :-

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने प्रौढशिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन खालील तीन घटकातील निरक्षरता दूर करणे आवश्यक आहे हे सांगितले.

अ) १५ ते ३५ वर्षे वयोगटातील प्रौढ (तरुण)

ब) स्त्रिया

क) ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती

वरील बाबींमध्ये राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते (समाजसेवक) आणि ऐच्छिक आणि ऐच्छिक संघटना यांचा सहभाग आवश्यक आहे हे सुद्धा नमूद केले.

५ब.१.७ जनशिक्षण नियलामस (JSM) (Jana Shikshan Nilayams) :-

अनेक खेड्यांना एकत्र करुन तेथे साक्षरत अभियान चालू ठेवण्यासाठी जनशिक्षण निलयामस ची स्थापना करण्यात आली. याद्वारे खेड्यांमध्ये ग्रंथालय, वाचनालय, चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, दूरदर्शन व दूरचित्रवाणी इत्यादींची सुविधा पुरविण्यात आली.

राज्य संशोधन केंद्र (SRC), जिल्हा संशोधन केंद्र (DRC) आणि जिल्हास्तरीय शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था (DIET'S) इत्यादीने चांगल्या दर्जाचे शैक्षणिक साहित्य तयार केले. तसेच उच्चशिक्षित व गुणवान शिक्षकांची, मार्गदर्शकांची नियुक्ती प्रशिक्षण व संशोधन केंद्रामध्ये करण्यात आली.

५ब.१.८ राष्ट्रीय साक्षरता मिशन (NLM) (National Literacy Mission):-

- निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी इ.स.१९८८ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय साक्षरता अभियानाची सुरुवात केली. याद्वारे इ.स.१९१५ पर्यंत कमीत कमी आठ (८) करोड निरक्षर लोकांना साक्षर बनविण्याचे ध्येय होते.
- लोकांना जागृत करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक राज्यामार्फत चळवळी करण्यात आल्या.
- राष्ट्रीय साक्षरता अभियान यशस्वी करण्यासाठी त्यांनी स्वयंसेवी संघटना, प्रसार माध्यम, शैक्षणिक संस्था, व सैन्यदलाची मदत घेतली.
- पहिल्यांदा विशिष्ट भागांसाठी हे अभियान मर्यादित करुन, त्यासाठी वेळेचे बंधन ठेवून तसेच स्वयंसेवी संघटनेमार्फत अनेक मोहिमा राबवून हा उपक्रम राबविण्यात आला आणि समाजाला स्वतःची प्रगती साधण्यासाठी व जबाबदारीने कार्य पार पाडण्यास भाग पाडले.
- इ.स.१९९९ मध्ये UNESCO (युनेस्को) NOMA ने दिलेल्या बक्षिसानंतर राष्ट्रीय साक्षरता मिशनने आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त केला.
- यानंतर २००५ सालापर्यंत सुमारे ७५% लोकांना साक्षर बनविण्याचे ध्येय राष्ट्रीय साक्षरता मिशनने ठरविले.
- विकेंद्रीकरण करण्यासाठी साक्षरता अभियानाचे कार्य राज्य स्तरावर विभागून दिले गेले, जेणेंकरून जिल्हा व तालुका स्तरावर शैक्षणिक प्रकल्पाद्वारे उपक्रम राबविले जातील तसेच स्वयंसेवी संघटनांना साक्षरतेसंबंधी प्रकल्प राबविण्याची परवानगी मिळाली. एवढेच नव्हे तर वरील सर्व घटकांना आर्थिक साहाय्य देण्यात आले.
- साक्षरता अभियानावर नियंत्रण व त्याचे मूल्यमापन व्यवस्थित होण्यावरही राष्ट्रीय साक्षरता मिशनचा भर होता.
- ० ते १४ वर्षे वयोगटातील मुले जी अनौपचारिक शिक्षणामध्ये समाविष्ठ नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय साक्षरता अभियानाने उपक्रम राबविण्याचे ठरविले.
- राष्ट्रीय साक्षरता अभियानाच्या माध्यमातून स्त्रिया व अनुसूचित जाती-जमाती मधील लोकांकडे विशिष्ट लक्ष दिले गेले जेणेकरुन कमीतकमी त्यांची मुले शिक्षण घेतील.

५ब.१.९ प्रौढशिक्षण अयशस्वी होण्याची कारणे :-

भारतामध्ये प्रौढशिक्षण अयशस्वी होण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१) उपक्रम राबविण्यामध्ये समस्या.

२) अपूरा आर्थिक पुरवठा

३) अध्यापन शास्त्रातील समस्या (कारण १९५२ पर्यंत असंख्य मातृभाषा नावारुपाला आल्या पण त्यापैकी फक्त १५ भाषांना राजकीय आधार दिला गेला.

४) कथाकथनातील समस्या :- अर्थातच एखादा व्यक्ती प्रौढ शिक्षणाचे महत्त्व ओळखू शकत नव्हता कारण अपूर्ण शिक्षणाअभावी आणि कमी आत्मविश्वासामुळे बदलत्या सामाजिक, आर्थिक व पर्यावरणाच्या स्थितीत हे उपक्रम टिकाव धरु शकले नाहीत.

तुमची प्रगती तपासा :-

१) साक्षरतेच्या प्रसारामध्ये कोठारी आयोगाने सूचविलेल्या शिफारशी कोणत्या ?

२) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रौढ शिक्षणातील योगदान स्पष्ट करा.

३) राष्ट्रीय साक्षरता अभियान (NLM) ची महत्त्वाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) प्रौढ शिक्षण अयशस्वी होण्यामागची कोणतीही तीन कारणे लिहा.

_____

_____

_____

_____

_____

५ब.२ इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU) :-

- इ.स.१९८५ मध्ये उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. बहुसंख्य लोकांना चांगल्या प्रतीचे व अतिशय परिणामकारक शिक्षण पुरविणे हा उद्देश या मुक्त विद्यापीठाचा होता.
- इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाने अवघ्या २० वर्षात आपल्या देशातील अव्वल (अग्र) क्रमांकाची शैक्षणिक संस्था म्हणून ओळखली जाऊ लागली. दूरस्थ शिक्षणाची सुरुवात या विद्यापीठानेच पहिल्यांदा केली.
- ४८ प्रादेशिक केंद्र, ४ उप-प्रादेशिक आणि १४०३ अभ्यासकेंद्र इत्यादी बाबींचे जाळे असून ज्याद्वारे अध्ययन करण्यास चांगली मदत झालेली आहे.

- यामध्ये विशिष्ट अभ्यासकेंद्र (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक, सैन्यदल, कारागीर) इत्यादीसाठी तसेच विशिष्ट कार्यक्रम अभ्यास केंद्र ही आहेत.
- या विद्यापीठाने जास्तीत जास्त लक्ष शैक्षणिक दृष्ट्या मागासभागाकडे दिले. यामध्ये विशेषतः उत्तर पूर्व राज्य आणि सिक्कीम यांचा समावेश होता. याच्या प्रयत्नामुळेच मूलभूत गरजा पुरविल्या जाऊ लागल्या व माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानामध्ये खूप प्रगती झाली. समानता आणि दर्जात्मक शिक्षण देणे ही त्यांची तत्त्वे होती.

वैशिष्ट्ये :-

वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) मुक्त आणि दूरस्थ शिक्षणाला अनुकूल (योग्य) माध्यमाद्वारे शिक्षण आणि ज्ञान देणे.

२) उच्च शिक्षण हे फक्त मोठ्या लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणाला न पुरविता जो भाग शिक्षणापासून वंचित आहे त्या विशिष्ट समाजाला द्यावे.

३) मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षणाला प्रोत्साहन देणे.

४) शिक्षणाद्वारे मानवी आणि नैसगिक साधनसंपत्तीला बळकटी आणून देणे व राष्ट्रीय एकात्मता साध्य करणे.

कार्ये :-

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातर्फे विविध प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात ज्यामुळे प्रमाणपत्र (Certificate), पदविका (Diploma), पदवी (Degree) पूर्ण करता येते. एवढेच नव्हे तर या विद्यापीठाद्वारे संशोधन क्षेत्रासाठी प्रशिक्षण केंद्रे आणि विविध आवांतर कार्यक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

२) यामध्ये अपेक्स बॉडी (Apex Body) प्रमाणे क्षमता असून ते जगभरातल्या दूरस्थ शिक्षण पद्धतींवर नियंत्रण ठेवते व त्यांना सहकार्य करते.

वैशिष्ट्ये :-

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) राष्ट्रीय अधिकारक्षेत्र

२) लवचिक प्रवेशप्रक्रिया

३) वैयक्तिक अभ्यास-ठिकाण, अभ्यासाची वेळ इत्यादिमध्ये लवचिकता

४) नवीन शैक्षणिक आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर.

५) विद्यार्थी मार्गदर्शन

६) मूल्याधिष्ठित कार्यक्रम

७) इतर मुक्त विद्यापीठासोबत सहकार्याची भावना आणि एकत्र कार्य करण्याची पद्धती

इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाने त्याच्या स्थापनेपासूनच म्हणजेच इ.स.१९८५ पासून देशात उच्च शिक्षणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. विद्यार्थी केंद्री दृष्टिकोन ठेवून या विद्यापीठाने शैक्षणिक पात्रता, लागणारा वेळ आणि अभ्यासाचे ठिकाण याबाबत नेहमी लवचिकता ठेवली आहे.

कार्यक्रमाची रुपरेषा :-

- या विद्यापीठातून ८५४ कोर्सेसद्वारे एकूण ८० शैक्षणिक अभ्यासक्रम राबविले जातात.
- हे शैक्षणिक कार्यक्रम डॉक्टर पदवी, मास्टर पदवी अशा प्रकारच्या क्षेत्रात राबविले जातात.
- विद्यार्थ्यांला त्याने पूर्ण केलेल्या पदवीनंतर डिग्री (प्रमाणपत्र) दिले जाते.
- पूर्ण भारत देशातून अनेक विचारवंत या विद्यापीठात कार्यरत आहेत. जेणेकरुन अभ्यास साहित्य, चांगल्या दर्जाचे व परिणामकारक बनविले जातील.
- शिक्षणाचा प्रसार फक्त पारंपारिक क्षेत्रात न करता येणाऱ्या नव-नवीन क्षेत्रांमध्ये जास्त होत आहे. जसे पर्यावरण, मानवी हक्क, पर्यटन, स्त्रीयांचे अधिकारक्षेत्र, बालविकास, ग्राहक संरक्षण, पुनर्वसन, शिक्षक शिक्षण, अन्न आणि पौष्टिकता, मेडिकल, आणि आरोग्य शिक्षण, HIV/AIDS, प्रयोगशालीन तंत्रे, ऑनलाईन शिक्षण इत्यादी. एवढेच नव्हे तर शारीरिक, नैसर्गिक विज्ञान, नर्सिंग, आरोग्य, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, संगणक, B.Ed, ग्रंथालयीन तसेच माहिती तंत्रज्ञान इत्यादि क्षेत्रामध्ये शिक्षणाचा प्रसार जास्त प्रमाणात झाला आहे.

व्याप्ती (Outreach) :-

- या विद्यापीठाचा प्रसार देशाच्या कानाकोपऱ्यात झाला तसेच देशाबाहेरही झाला. या विद्यापीठाला बाहेरच्या बऱ्याचशा देशाचे सहकार्य व त्यांची मदत लाभलेली आहे. यामध्ये आशिया, आफ्रिका, दुबई, कतार, कुवेत, अबुधाबी, सिचेलस, मॉरिशयस, मालदीव, इथिओपीय, मडागास्कर आणि लायबेरिया यांचा समावेश होतो.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्य जोपासण्यासाठी आशियातील मुक्त विद्यापीठासोबत शैक्षणिक संगत व सहकार्याची योजना आखलेली आहे. यामध्ये 'आंतरविद्यापीठीय कर्मचारी बदल' ही योजना कार्यरत आहे.
- हे विद्यापीठ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद भरविते. त्यामध्ये सहभाग होते तसेच दुसऱ्या विद्यापीठाना सहकार्य करते ज्यामुळे संशोधन आणि शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळेल.

प्रशिक्षण पद्धतीचे शास्त्र :-

- या विद्यापीठाने प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केलेले आहे. विविध शाखा व तेथील कर्मचारी वर्गासाठी, राज्यातील इतर मुक्त विद्यापीठासाठी तसेच दूरस्थ अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करते आणि
- शासकीय संघटनांचा (agencies) कर्मचारी वर्ग, कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण आणि दूरस्थ शिक्षणाच्या संशोधन संस्था, दूरस्थ शिक्षण संघटना आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षण संघटना.

मदत :-

विद्यापीठीय शैक्षणिक कार्यक्रमासाठी प्रसारमाध्यमाची मदत घेतात.

- विद्यापीठात ऑडिओ, व्हिडीओ, रेडिओ (आकाशवाणी), दूरदर्शन तसेच व्हिडिओ काऊन्सलिंग (समुपदेशन) आणि टेलिकान्फरन्सीनच्या सुविधा येथे उपलब्ध आहेत.
- उच्च शिक्षणासाठी अन्य संस्थाच्या मदतीने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने 'ज्ञानदर्शन' ही २४ तास चालणारी शैक्षणिक दूरदर्शन वाहिनी चालू केली आहे.
- यामुळे भारतातील अनेक विद्यापीठाशी सहकार्य करणे शक्य झाले आहे.
- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या सर्व प्रादेशिक आणि अभ्यासकेंद्राना आवश्यक साहित्याची मदत दिली जाते जेणेंकरुन शिक्षणाचा प्रसार होण्यास मदत होईल.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची मूल्ये :-

विद्यापीठाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी संस्थेचे काही मार्गदर्शक मूल्ये आहेत. ते पुढीलप्रमाणे :

- विद्यार्थी केंद्री शिक्षणपद्धती
- व्यावसायिक एकात्मता
- व्यावहारिक स्वायत्तता आणि एकसंघ निर्णयपद्धती
- संपूर्ण दर्जात्मक व्यवस्थापन
- कार्यकालीन जाळे, सहकार्य आणि संशोधनातील सहभाग.
- सातत्यपूर्ण स्वयं मूल्यमापन पद्धती आणि स्वयं सुधारणा.

शिक्षणाचे माध्यम :-

स्वयं-अध्ययन साहित्य, समुपदेशन विभाग आणि टेलिकान्फरन्सीज इत्यादिंच्या माध्यमातून थेट व्यक्तिशी शिक्षण पुरविले जाते. त्याचबरोबर विज्ञान, संगणक, नर्सिंग तसेच अभियांत्रिकी, तंत्रज्ञान इत्यादिसाठी प्रात्यक्षिक कार्य (Practicle Work) घेतले जाते.

लवचिकता :-

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेशप्रक्रिया, पात्रता, ठिकाण, अभ्यासक्रमाचा कालावधी इत्यादिमध्ये लवचिकता आहे.

जसे, B.A, B.Com, B.Sc हा तीन वर्षाचा कोर्स ८ वर्षामध्ये विद्यार्थी पूर्ण करु शकतात.

मूल्यमापन :-

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे दोन पद्धतीनुसार केले जाते.

१) विद्यार्थ्यांना दिलेल्या स्वाध्यायाला (Assignments) संगणकाद्वारे किंवा ट्युटरद्वारे (मार्गदर्शक) गुणदान दिले जाते. तसेच प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प आणि सत्र परीक्षाद्वारे सातत्यपूर्ण मूल्यमापन केले जाते.

२) स्वाध्याय (Assignments) आणि सत्र परीक्षा ह्या सक्तीच्या असतात पण या दोन्ही मूल्यमापनाला सारखेच महत्त्व आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून सर्वात जास्त मार्क्स (गुण) ज्या विद्यार्थ्यांने मिळविले असतील त्याला सुवर्णपदक दिले जाते.

विद्यार्थ्यांसाठी मदत केंद्र :-

देशातील विविध ठिकाणच्या विद्यार्थ्यांपर्यंत समुपदेशन केंद्रातर्फे शिक्षण पोहोचविण्याचे कार्य इंदिरा गांधी राष्ट्रीय विद्यापीठ करते. शैक्षणिक समुपदेशन केंद्र हा एक दूरस्थ शिक्षण पद्धतीचा अविभाज्य घटक आहे. देशाच्या अनेक भागात अशा प्रकारची केंद्रे स्थापन केली आहेत.

विद्यार्थ्यांना खालील प्रकारच्या सुविधा समुपदेशन केंद्रावर दिल्या जातात.

- अर्धवेळ शैक्षणिक सल्लागारातर्फे विशिष्ट विषयावर सल्ला किंवा मार्गदर्शन दिले जाते.
- येथे दृक आणि श्राव्य तंत्रज्ञानाच्या सुविधा पुरविल्या जातात.
- ग्रंथालयाची सुविधा.
- टेलिकान्फरन्सीगमध्ये सहभाग.
- विद्यापीठाचे नियम, कायदे, पद्धती याबाबत माहिती पुरविली जाते.
- स्वाध्याय (Assignments) सादर करुन मार्गदर्शकाकडून टिकाटिप्पणी आणि सुधारणा सुचविल्या जातात.
- विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा घेतल्या जातात.

५ब.३ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) :-

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या कलम २०(XX-१९८९) नुसार जुलै १९८९ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. हे विद्यापीठ देशातील पाचव्या क्रमांकाचे असून डिसेंबर १९९२ मध्ये याला UGC ची मान्यता मिळाली.

- या विद्यापीठाला इ.स.२००२ मध्ये 'ॲवार्ड ऑफ एक्सलन्स फॉर इन्स्टिटट्युशनल अचिवमेंट' या मौल्यवान सन्मानाने सन्मानित करण्यात आले. हे ॲवार्ड कॅनडाच्या 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग' या संस्थेकडून प्राप्त झाले.

- वरील मिळालेला सन्मान हा या विद्यापीठाने दिलेल्या योगदानाबाबत होता. या विद्यापीठाने नवनवीन आणि परिणामकारक अध्ययनतंत्राचा वापर करुन शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला.
- देशातील हे पहिले किंवा एकमेव विद्यापीठ आहे ज्याला अशा प्रकारचा सन्मान प्राप्त झाला.
- या विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांला फक्त आकर्षित किंवा प्रभावित करण्यासाठी म्हणून नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला नसून त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहकार्य करण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार, गरजेनुसार येथे विविध प्रकारचे सराव करुन घेतले जातात.
- विद्यापीठाचे प्रमुख केंद्र महाराष्ट्रातील 'नाशिक' या ठिकाणी असून त्यांच्या नियंत्रणाखाली आणखी ८ (आठ) प्रादेशिक केंद्रे कार्यरत आहेत. ते म्हणजे अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नाशिक आणि पूणे हे आहेत.
- या विद्यापीठामध्ये प्रवेशप्रक्रिया साधी आणि सोपी असली तरी यामध्ये परीक्षेचा दर्जा व्यवस्थित ठेवला गेला आहे. एखादा विद्यार्थी दूसऱ्या बोर्डात किंवा विद्यापीठात शिकत असेल किंवा व्यावसायिक कोर्स चालू ठेवला असेल तरी अशा विद्यार्थ्यांना या विद्यापीठात प्रवेश दिला जातो. त्यांच्याकडून शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र याची मागणी केली जात नाही.

कार्यक्रम :-

या विद्यापीठामध्ये एकूण ५४ विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात म्हणजेच सर्टिफिकेट (प्रमाणपत्र) कोर्सपासून ते Ph.D पर्यंत तसेच २०४ विविध विषयाचे ज्ञान या विद्यापीठातून दिले जाते.

- शेतीविषयक शिक्षण, सामान्य शिक्षण, शिक्षकांचे शिक्षण, पत्रकरिता, ग्रंथालयविज्ञान, व्यवस्थापन, व्यवस्थापन इलेक्ट्रानिक्स अभियांत्रिकी आणि इतर व्यावसायिक शिक्षण दिले जाते.
- प्रत्येक वर्षी जवळजवळ एक लाख विद्यार्थी विविध व्यावसायिक शिक्षणासाठी प्रवेश घेतात आणि शिक्षण घेत असलेली एकूण विद्यार्थी संख्या चार (४) लाखांच्या जवळ पोहोचते.

पराक्रम संपादन :-

- शैक्षणिक उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावरील जाळे.
- कृषीक्षेत्रात जवळजवळ ३६,००० विद्यार्थी कार्यरत.
- सहकारी क्षेत्रात सुमारे ८०,००० विद्यार्थी कार्यरत.
- २,००,००० विद्यार्थ्यांचा व्यावसायिक शिक्षणासाठी विद्यापीठामध्ये प्रवेश.

विद्यार्थी सहकार्य :-

- विद्यार्थ्यांना ऑनलाईन समुपदेशन पुरविले जाते.
- विद्यार्थी मूल्यमापनात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून दर्जात्मक शिक्षण पुरविले जाते.

- या विद्यापीठाने सुरुवातीला फक्त ३ शैक्षणिक उपक्रम (कोर्स) सुरुवात केली. त्यावेळी एकूण १५९० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. आज मात्र १४५० अभ्यासकेंद्राद्वारे ७५ शैक्षणिक उपक्रम (कोर्स) राबविले जातात व दरवर्षी एकूण विद्यार्थी संख्या १,००,००० लाखापर्यंत पोहोचते.
- जवळजवळ ४,३०० मार्गदर्शक इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करतात.

तुमची प्रगती तपासा :-

१) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे उद्दिष्ट्य स्पष्ट करा.

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संपादनावर प्रकाश टाका.

४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांना कशाप्रकारे सहकार्य करते ?

५ब.४ मुक्त व पारंपारिक विद्यापीठाने पुरविलेले दुरस्थ शिक्षण :-

प्रस्तावना :-

पारंपारिक विद्यापीठे औपचारिक शिक्षणपद्धतीचा अवलंब करतात पण सध्या एकूण १०६ विद्यापीठे आहेत, ज्यांनी दुरस्थ शिक्षण सुरु केले आहे. जेणेंकरुन जे विद्यार्थी नियमित उपक्रमांना उपस्थित राहू शकत नाहीत तसेच जे विद्यार्थी दूर ठिकाणी राहतात अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या परिस्थितीनुसार शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी दुरस्थ शिक्षणपद्धतीची सुरुवात केली गेली.

उदा. मुंबई विद्यापीठाने इ.स.१९७१-७२ मध्ये 'डिरेक्टोरेट करस्पॉंडस कोर्स' सुरुवात केले यालाच इ.स.१९८५ मध्ये 'डायरेक्टोरिट ऑफ डिसटन्स एज्युकेशन' असे नाव देण्यात आले.

भारतात कोठेही स्थायिक असणाऱ्या व्यक्ती यामध्ये प्रवेश घेऊ शकतात तसेच व्यावसायिक, गृहिणी, शारीरिकदृष्ट्या अपंग आणि इतर लोकंसाठी याचा खूप फायदा होतो.

खास वैशिष्ट्ये :-

१) अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती आणि पदवी ह्या सर्व बाबी मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयामध्ये सारख्या आहेत.

२) मुंबई विद्यापीठाला UGC-NAAC ने पंचतारांकित (Five Star) ही पदवी बहाल केली.

३) खास ग्रंथालय, वाचनालय इत्यादी सोयी मुंबई आणि रत्नागिरी या ठिकाणी आहेत.

४) पुस्तके घरपोच मिळतात.

५) इंग्रजी आणि मराठी भाषेतील पुस्तके उपलब्ध.

६) प्रवेशप्रक्रिया, परीक्षा फार्म भरण्याचा दिनांक, वेळापत्रक, केंद्र, निकाल, मार्गदर्शक, वर्ग इत्यादिची माहिती संगणकाच्या आंतरजालातून पुरविली जाते. ती म्हणजे http//www.mu.ac.in या वेबसाईटवर आपल्याला माहिती पाहायला मिळते.

७) विद्यानगरी येथे दृक-श्राव्य केंद्रे आहेत. जेथे अभ्यासक्रमावर आधारित कॅसेट्स पुरविल्या जातात.

अध्ययन सोयी सुविधा :-

अ) ग्रंथालय : विद्यापीठाच्या कॅम्पसमधील ग्रंथालय आणि वाचनालयाचा उपयोग विद्यार्थी चांगल्या पद्धतीने घेऊ शकतात.

ब) P.C.P. (Personal Contact Programme) : वैयक्तिक संपर्क कार्यालय – प्रत्येक वर्षी प्रत्येक केंद्रावर एकदा वैयक्तिक भेटीचा कार्यक्रम आखला जातो. ज्यामुळे विद्यार्थी त्याठिकाणी जाऊन आपल्या समस्या त्यांच्यापुढे मांडून मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन घेतात.

परीक्षा पद्धती :-

प्रत्येक परीक्षेसाठी घेतल्या जातात. IDE (Institute of Distance Education) दूरस्थ शिक्षण विभाग या मार्फत परीक्षा ठरविल्या जातात व त्या विविध केंद्रावर घेतल्या जातात. आणि अशाप्रकारे इ.स.१९८५ मध्ये याला Directorate of Distance Education हे नाव पडले व कालांतराने म्हणजेच इ.स.१९९३ मध्ये याला 'Institute of Distance Education' (दूरस्थ शिक्षण विभाग) असे उच्च पदस्थ नाव मिळाले. आणि यालाच University Institute असे स्थान प्राप्त झाले.

गेल्या तीस (३०) वर्षापासून हे विद्यापीठ औपचारिक शिक्षणापासून वंचित असलेल्या लोकांना त्यांच्या आवश्यकतेनुार शिक्षण पुरविण्याचे काम करीत आहे. जरी हे शिक्षण पारंपारिक पद्धतीचे असले तरी ज्या लोकांना नवनवीन गोष्टी शिकण्याची व स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवण्याची सवय आहे अशा विद्यार्थ्यांसाठी हा विभाग खूप उपयोगी पडतो. यामध्ये नोकरवर्ग, गृहिणी, अपंग इत्यादिचा समावेश होतो. याचाच परिणाम म्हणजे येथील पटनोंदणी दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. ही पटसंख्या इ.स.२०००-२००१ मध्ये ३८,००० एवढी होती.

उपलब्ध कोर्सेस :-

Institute of Distance Education दूरस्थ शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी खालील कोर्स उपलब्ध करुन दिले आहेत ते फक्त स्थानिक असणाऱ्या लोकांसाठी कोर्सेस पुढीलप्रमाणे :

अ) पदवीधारक कोर्सेस (Graduate Courses)

१) B.A (E.Y.,S.Y.,T.Y.) - ३ वर्षाचा कालावधी असणारा अभ्यासक्रम, अभ्यासाच्या साहित्यासोबत उपलब्ध आहे.

पात्रता – H.S.C. बारावी.

२) B.Com (E.Y.,S.Y.,T.Y.) - ३ वर्षाचा कोर्स + अभ्यास साहित्य.

पात्रता – बारावी कोमर्स.

ब) (पदव्युत्तर पदवी) – Post-Graduate Course पारंपारिक विद्यापीठातर्फे पुरविलेले दुरस्थ शिक्षण.

❖❖❖❖

६

प्रात्यक्षिक कार्य
(Practicle Work)

विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक कार्यासाठी पुढीलपैकी दोन उपक्रम ठेवलेले आहेत.

अ) शाळेतील गळतीसंबंधी कोणत्याही पाच शाळेला भेटी देऊन मुलाखत घेणे.
ब) कोणत्याही एका अनौपचारिक शिक्षण केंद्राच्या भेटीचा अहवाल सादर करणे.

वरील प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. शाळेतील गळतीचे प्रमाण शोधण्यासाठी कोणत्याही एका शाळेतील कोणत्याही एका इयत्तेच्या किंवा कोणत्याही सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीच्या शाळेमधून -

अ) पाच शाळेतील गळतीसंबंधी मुलाखत -

प्रश्नावली -

१) विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव -
२) वय -
३) लिंग -
४) पूर्वी शिक्षण घेतलेला वर्ग -
५) पूर्वी शिक्षण घेतलेल्या शाळेचे नाव -
६) शाळेचा प्रकार - खाजगी / शासकीय / अनुदानित / महापालिका
७) कौटुंबिक माहिती -
   अ) १) वडीलाचे नाव -
      २) व्यवसाय -
      ३) वार्षिक उत्पन्न -
   ब) १) आईचे नाव -
      २) व्यवसाय -
      ३) वार्षिक उत्पन्न -
   क) एकुण मुलांची संख्या (कुटुंबातील) -
   ड) मुलांचा जन्मानुसार क्रमांक -
   ई) सामाजिक - आर्थिक पार्श्वभूमी - कमी / मध्यम / अधिक
८) गळतीचे कारण - (योग्य ठिकाणी ✓करा.) एकापेक्षा अधिक असेल तरीही
   अ) आर्थिक कारण -
   ब) मुलगी -

क) शिक्षणामध्ये कमी आवड -

ड) घरकाम

इ) छोट्या भावंडाना सांभाळण्याची कौटुंबिक जबाबदारी

फ) गृहपाठाचा ताण (बोझा)

ग) घरापासून दूर अंतरावरील शाळा

ह) शिक्षण आव्हानात्मक नसल्यामुळे

त) यापेक्षा वेगळे कारण (असल्यास उल्लेख करा.)

९) शाळा पुन्हा चालू ठेवायला आवडेल का ? - होय / नाही.

१) जर होय असेल तर का ?

२) जर नाही असेल तर का ?

१०) पुन्हा पूर्वी शिकत असलेल्या शाळेत जायला आवडेल का ?
दुसऱ्या कोणत्या शाळेत शिक्षण घेण्याची इच्छा आहे का ?

ब) अनौपचारिक शिक्षण केंद्राच्या भेटीचा अहवाल -

मार्गदर्शक तत्त्वे -

१) अनौपचारिक केंद्राचे नाव -

२) स्थळ / पत्ता -

३) स्थापना केव्हा झाली -

४) यामध्ये किती उपक्रम (कोर्स) आहेत ?

अ) किती - १/२/३/४/ यापेक्षा जास्त -

ब) उपक्रमाचे (कोर्स) चे नाव -

५) उपक्रमाचा कालावधी

अ) _____ ब) _____ क) _____ ड)_____

६) उपक्रमाचे (अभ्यासक्रमाचे) शुल्क -

अ) _____ ब) _____ क) _____ ड)_____

७) उपक्रमाचा (कोर्स) अभ्यासक्रम -

८) अभ्यासाच्या साहित्याची उपलब्धता -
अतिउत्तम / उत्तम / साधारण

९) मार्गदर्शक सुविधा -

अ) ई - मेल ब) आंतरजाल (Internet)

क) वैयक्तिक इ) यापैकी सर्व

१०) प्रत्येक कोर्सची विद्यार्थी संख्या -

११) ग्रंथालयीन सुविधा - आहे / नाही

१२) विद्यार्थी एकावेळी किती पुस्तके घेऊ शकतात ?

१३) ग्रंथालयीन पुस्तके परत करण्याचा कालावधी

१४) सर्व विषयांना मार्गदर्शक आहेत काय ?
कांही विषयांना / थोड्या विषयांना / सर्वच विषयांना

१५) प्रत्याभरण त्वरीत (ताबडतोब) मिळते काय ?
(feed back)

१६) स्वाध्यायाचे मूल्यमापन -

१७) प्रात्यक्षिकांची सोईसुविधा -
समाधानकारक / चांगला / उद्राम

❖❖❖❖